



फा. फ्रान्सिस दिब्रिटो



डॉ. स्नेहलता देशमुख

# शब्द रुची

४१


ऑगस्ट २०२४ | मूल्य १० रु. | पृष्ठे ५२




बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या सॅन होजे येथील अधिवेशनाचे उद्घाटन– समन्वयक प्रकाश भालेराव आणि अध्यक्ष संदीप दीक्षित



राज ठाकरे यांच्या हस्ते 'शब्द रुची' मासिकाच्या विशेषांकांचे प्रकाशन झाले.




शास्त्रीय गायिका विदुषी अश्विनी भिडे–देशपांडे यांच्या हस्ते, शरद काळे लिखित अल्मित्रा पटेल यांच्या मराठी चरित्राचे प्रकाशन सॅन होजे अधिवेशनात झाले. त्यावेळी अल्मित्रा पटेल यांची कन्या, जावई आणि नात उपस्थित होते. सोबत ग्रंथाली कार्यकर्ते



महाराष्ट्र शासन
MIDC
MAGNETIC MAHARASHTRA
नरेंद्र मोदी
प्रधानमंत्री
एकनाथ शिंदे
मुख्यमंत्री
जागतिक आर्थिक परिषद २०२४, दावोस येथे
मॅग्नेटिक महाराष्ट्राची जागतिक स्तरावर ओळख निर्माण
जागतिक आर्थिक परिषद २०२४ मध्ये गुंतवणूक करारांवर स्वाक्षरी
₹ ३ लाख कोटी (उद्योग विभाग)
₹ ७२ हजार कोटी (इतर)
₹ ३.७२ लाख कोटी (एकूण)
सुमारे २ लाख रोजगार निर्मिती
हायटेक (ESDM आणि IT)
₹ १,१४,६०० कोटी
मॅन्युफॅक्चरींग
₹ १,०४,५८३ कोटी
जेम्स् ॲण्ड ज्वेलरी
₹ ५०,००० कोटी
ग्रीन हायड्रोजन ॲण्ड रिन्यूएबल
₹ २५,००० कोटी
लॉजिस्टीक्स ॲण्ड ॲग्री
₹ ६,०५० कोटी
उदय सामंत
उद्योगमंत्री
देवेंद्र फडणवीस
उपमुख्यमंत्री
अजित पवार
उपमुख्यमंत्री
Connect with us : www.midcindia.org gmmarketing@midcindia.org MIDC, Udyog Sarathi, Andheri (E), Mumbai-93

ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक

शब्द रुची ४९

ऑगस्ट २०२४, वर्ष बारावे
अंक चौथा, मूल्य १० रु.

संपादक : **सुदेश हिंगलासपूरकर**
कार्यकारी संपादक : **अरुण जोशी**
मुखपृष्ठ : **ग्रंथाली संगणक विभाग**

**कार्यालयीन संपर्क**
कॉम्प्युटर युनिट – योगिता मोरे, अनिरुद्ध गद्रे
shabdruchee24@gmail.com
जाहिरात प्रसिद्धी – धनश्री धारप
वितरण – हरिप्रसाद जयस्वाल, सौमित्र शिंदे
वेबसाइट डिझाइन व डिजिटल एडिटिंग
समीर कदम

संपर्क
ग्रंथाली, १०१, १/बी विंग, 'द नेस्ट', पिंपळेश्वर को–ऑप. हौसिंग सोसायटी, टायकलवाडी, स्टार सिटी सिनेमासमोर, मनोरमा नगरकर मार्ग, माहीम (प.), मुंबई ४०००१६
फोन : २४२१६०५० **(वेळ : दुपारी १ ते ६.३०)**

अंकासाठी लेख व प्रतिक्रिया खालील मेलवर पाठवावी.
shabdruchee24@gmail.com

ऑफिस वेळ : दुपारी १ ते सायं. ७
संपर्क/फोन/पुस्तके खरेदी करण्यासाठी

अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'शब्द रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.

## अनुक्रम

**डॉ. निर्मोही फडके / ५**
भारत–सेवक

**डॉ. मंगेश बनसोड / १०**
अर्जुन डांगळे यांच्या कृतकृत्य जीवनाचे सार 'छावणी'चे प्रकाशन

**डॉ. अविनाश सुपे / १३**
डॉ. स्नेहलता देशमुख : तेजस्वी व्यक्तिमत्त्व

**डॉ. लतिका भानुशाली / १५**
'काय बे!' सॅन होजेमधील मराठीचा जागर

**प्रदीप चंपानेरकर / २०**
सुनीति जैन : एक संयमित मनस्विनी

**डॉ. अंजली पटवर्धन–कुलकर्णी / २२**
औपचारिक शिक्षणाला पर्याय : अनवट वाटेचा शिक्षणानुभव

**समरेंद्र निंबाळकर / २५**
काजळी पुसण्या निघालो!

**फ्रान्सिस डिमेलो / २९**
ख्रि. फादर फ्रान्सिस दिब्रिटो : व्यक्तिमत्त्व आणि कार्य

**संजीवनी खेर / ३२**
दुर्दैवाचे दशावतार ते वैभवशाली जीवन पंजाबी लेखिका अजित कौर

**शरद काळे / ३६**
रंगही रंग दाखवतात!

**प्रकाशने / वृत्तांत ४० ते ४६**

**चांगदेव काळे / ४७ ते ५०**
ग्रंथपाने

**'शब्द रुची' मासिक मार्च २०२५ पासून बंद करत आहोत. त्यामुळे मनीऑर्डर अथवा ऑनलाइन कुठल्याही पद्धतीने वर्गणी पाठवू नये. स्वीकारली जाणार नाही.**

**– सुदेश हिंगलासपूरकर**
**विश्वस्त, संपादक**

# संपादकीय...

ग्रंथाली याही वर्षी अमेरिकेतील बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या अधिवेशनाला उपस्थित राहिली. सॅन होजे इथे झालेले बीएमएमचे हे एकविसावे अधिवेशन. मराठी संस्कृती, भाषा यांचे स्वरूप बदलत असताना, मराठी पुस्तक, नाटक, सिनेमा यांना रसिकांची वानवा असताना, सॅन होजे अधिवेशनासाठी सहा हजार सभासद नोंदणी होऊन तीन दिवस भरगच्च कार्यक्रम होत आहेत ही बाब समाधान देणारी होती. हे सभासद केवळ त्या भागातले नव्हते, विविध स्टेटमधून आले होते... दादरला कार्यक्रम असेल तर ठाणे, पारले याच्यापुढून किंवा उलटपक्षी, येणाऱ्यांची संख्या किती असते हे आपण पाहतो. अखिल भारतीय म्हणून होणाऱ्या साहित्य संमेलनाला त्या गावातील रसिकही असावा त्या संख्येत दिसत नाही... यामागे कारणे असतात, ती योग्यही असतील, परंतु त्याबाबत ओढ आणि उत्सुकता तरी राहिली आहे का, हा प्रश्न आहे. वाचलेले पुस्तक, पाहिलेला सिनेमा, पाहिलेले नाटक यावर चर्चाही होताना दिसत नाही... काळाच्या या टप्प्यावर, अमेरिकेसारख्या ठिकाणी, मराठीतून घडणाऱ्या तीन दिवसांच्या महोत्सवाला मिळणारा प्रतिसाद महत्त्वाचा होता. संमेलनाच्या एकूणच आयोजनात सहभाग घेतलेल्या साऱ्यांचे अभिनंदन करायला हवे. डॉ. लतिका भानुशाली यांनी या अंकात लिहिलेल्या सविस्तर वृत्तांतातून ते दिसेल.

ग्रंथाली १९९३पासून संमेलनात सहभागी होत असल्याने ती मराठी साहित्याचा दुवा राहिली आहे. अनेक वर्षे ग्रंथालीच्या स्टॉलला भेट देणारे किंवा येऊ शकले नाहीत ते सुहृद आस्थेने विचारपूस करत होते. त्यांनी सहकार्य केले ते मोलाचे होते.

गेल्या काही वर्षांत समाजावर प्रभाव टाकलेली, विविध क्षेत्रांतली माणसे काळाच्या पडद्याआड गेली. गेल्या काही दिवसांत डॉ. स्नेहलता देशमुख, सुनीति जैन, फादर फ्रान्सिस दिब्रिटो यांचे झालेले निधन क्लेशकारक आहे. डॉ. अविनाश सुपे, प्रदीप चंपानेरकर आणि फ्रान्सिस डिमेलो यांनी त्यांचे कार्य आणि व्यक्तित्व सांगणाऱ्या आठवणी अंकात जागवल्या आहेत.

केशव देशमुख यांनी १९२७ मध्ये ठाण्यातील दुसरे (खरे तर आधीचे १९०४ ते १९०८ पर्यंत चालवलेले 'महाराष्ट्र कवि' हे मासिक बंद झाल्याने पहिलेच) मासिक 'भारत-सेवक' या नावाने सुरू केले. त्या विषयी उद्बोधक लेख त्यांच्या नात डॉ. निर्मोही फडके यांनी लिहिला आहे. तत्कालीन मराठीची स्थिती, साहित्यसंमेलन आदी घडामोडींबद्दल माहिती त्यातून मिळते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचे पाईक, दलित चळवळीतले अग्रणी, समग्र समाजाचे भान असलेले ज्येष्ठ कार्यकर्ते, लेखक आणि सौहार्दपूर्ण व्यक्ती अर्जुन डांगळे यांनी वयाची पंचाहत्तरी पार केली. त्यांचे जीवनचरित्र 'छावणी' या शीर्षकात प्रसिद्ध झाले. कार्यक्रमाचा वृत्तांत मंगेश बनसोड यांनी लिहिला आहे.

अशोक देशमाने अमेरिकेत आमच्यासोबत होते. त्यांचे 'स्नेहवन' या संस्थेचे निर्माण आणि ते करत असलेले काम याविषयी समारेंद्र निंबाळकर यांनी लिहिले आहे.

शरद काळे यांचा 'रंगही रंग दाखवतात' हा लेख तसेच, डॉ. अंजली पटवर्धन-कुलकर्णी, संजीवनी खेर यांची सदरे, ग्रंथपाने ही नेहमीची सदरे आहेत.

**– अरुण जोशी**



# भारत-सेवक

**डॉ. निर्मोही फडके**

मराठी भाषेच्या स्थित्यंतरांमध्ये आणि मराठी साहित्याच्या विकसनशील टप्प्यांवर मराठी नियतकालिकांनी महत्त्वाचा हातभार लावलेला आहे. ब्रिटिशकालीन महाराष्ट्रात एखादे नियतकालिक चालवणे ही सोपी गोष्ट मुळीच नव्हती. तंत्रज्ञानाच्या पातळीवरच नव्हे, तर आर्थिक पातळीवरही निम्न स्तरावर असलेल्या अनेक मराठी नवशिक्षितांनी, समाजसुधारकांनी मोठ्या धाडसाने ह्या नियतकालिकांच्या प्रकाशनात आपले पाऊल टाकले. त्यांतील अनेक जण यशस्वीही झाले. ब्रिटिशांच्या राज्यात, एकोणिसाव्या शतकात सुरू झालेली नियतकालिकांची परंपरा विसाव्या शतकातही चालू राहिली.

अनेक प्रथितयश नियतकालिकांच्या जोडीने गावागावांत इतरही काही नियतकालिकांनी महाराष्ट्रातील सांस्कृतिक पर्यावरण सुदृढ करण्यासाठी आपले योगदान दिले. भले ती अल्पायुषी ठरली असली, तरी त्यांनी दिलेले योगदान नजरेआड करता येण्यासारखे नाही. अशाच एका अल्पायुषी, परंतु काही काळ आपला ठसा उमटवणाऱ्या मासिकाबद्दल इथे बोलू काही...

'भारत-सेवक' म्हटले, की साहजिकच आपल्याला गोपाळकृष्ण गोखले ह्यांच्या 'भारत-सेवक समाज' ह्या संस्थेची आठवण होते. १९२७ साली ब्रिटिशकालीन ठाणे शहरात केशव देशमुख ह्यांनी 'भारत-सेवक' ह्याच नावाचे एक मराठी मासिक सुरू केले. विजयादशमीच्या मुहूर्तावर चालू केलेल्या ह्या मासिकाची छपाई मुंबईहून होऊ लागली.

'भारत-सेवक' मासिकाच्या पहिल्या अंकाचे पहिले संपादकीय वाचल्यावर ब्रिटिशकालीन ठाणे शहरातील सांस्कृतिक पर्यावरणाविषयी आपल्याला अंदाज येतो. महाराष्ट्रीय साधुसंतांच्या खडतर तपश्चर्येची स्मृती आरंभीच जागवणारे भारत-सेवकचे संपादक केशव देशमुख ह्यांच्या पहिल्या संपादकीयामधील हा एक वाचनीय मजकूर...

'ठाणे मराठी ग्रंथसंग्रहालय या संस्थेने महाराष्ट्र कवि या नांवाचे मासिक सुप्रसिद्ध इतिहाससंशोधक व वाङ्मय-सेवक विनायक लक्ष्मण भावे यांनी १९०४ ते १९०८ पर्यंत चालविले. ते बंद पडल्यानंतर ठाणे येथे आजपर्यंत कोणतेही मासिक जन्माला आलें नाहीं. ही उणीव आज कित्येक दिवस आम्हां ठाणे शहरवासियांस भासत होती. ती दूर करण्याचा आज सुयोग येत आहे.'

सदर परिच्छेदावरून लक्षात येते, की 'महाराष्ट्र सारस्वत'कार वि.ल. भावे ह्यांच्या 'महाराष्ट्र कवि' ह्या मासिकाने कदाचित ठाणे आणि परिसरातील कविताप्रेमींची चार वर्षे का होईना कवितेविषयीची भूक भागवली. ह्या मासिकाचे जतन झाले आहे का, हा आणखी एक संशोधनाचा विषय आहे. तसेच, 'महाराष्ट्र कवि' आणि 'भारत-सेवक' ह्या दोन मासिकांदरम्यान जवळजवळ दोन दशके ठाण्यात कोणतेही मासिक प्रकाशित होत नसल्याची उणीव वाचकांना होत होती, ह्याचा अर्थ मासिक-वाचनासाठी वाचक उत्सुक असत.

विसाव्या शतकाचा हा पूर्वार्ध होता. ब्रिटिशांविरुद्ध सुरू झालेल्या चळवळींनी जोर धरला होता. राष्ट्रीय सभा अर्थात काँग्रेसची स्थापना होऊन तिची पस्तिशी चालू झाली होती. महाराष्ट्रात टिळकयुगाचा अस्त होऊन गांधीयुगाचा उदय झालेला होता. कधी एकमेकांना छेद देणाऱ्या, कधी समांतर जाणाऱ्या जहाल आणि मवाळ विचारसरणींचा प्रभाव एकूणच जगण्यावर आणि पर्यायानं लिहिण्यावरही होऊ लागला होता. 'भारत-सेवक' मासिकातील लेख वाचताना ही पार्श्वभूमी लक्षात घ्यायला हवी. किंबहुना मागच्या शतकातील कोणतेही राजकीय, वैचारिक लेखन वाचत असताना हे मुद्दे लक्षात घेऊन तारतम्याने वाचायला हवे. तसेच, त्या काळातील लेखनाविषयी टीका-टिप्पणी करताना, वाद घालताना - खरे तर आता तसे करणे हे निरर्थकच ठरावे - त्या वेळच्या साधनांची, तंत्रांची मर्यादा ध्यानात घ्यावी. आपल्याकडे असलेले धर्माचे, रूढी-

परंपरांचे प्राबल्य, ब्रिटिशांविरुद्ध चालू असलेला लढा, पहिल्या महायुद्धाचे थेट नसले, तरी नकळत झालेले परिणाम, इंग्रजी वाचनामुळे, शिक्षणामुळे झालेला ज्ञानाचा परिस्फोट आणि त्यातूनच आपलेही स्वत्व मिळत असल्याची झालेली जाणीव इत्यादी उभ्या-आडव्या-तिरक्या वैचारिक गुंफणीतून निर्माण झालेले हे लेखन आहे, हे लक्षात ठेवायलाच हवे.

'भारत सेवक' मासिकाच्या अंकांतील लेखांमधून आपल्यासमोर विविध विचारांसह भावनांचाही कोलाज उभा राहतो. ह्या लेखांमधून विशेषत्वाने लक्षात येते ती विचारांमध्ये आलेली आधुनिकता, जी खऱ्या अर्थाने विज्ञाननिष्ठ, पर्यावरणनिष्ठ आहे. धर्माच्या अवडंबराविषयी, रूढींविषयी मासिकाच्या लेखकांनी वेळोवेळी केलेल्या टिप्पण्या ह्या खऱ्या अर्थाने विचारप्रवर्तक आहेत.


कोणत्याही मासिकाचे 'संपादकीय' हे त्या मासिकाचा अंतरंग उजळ करणारे असते. मासिकात वाचकांना काय वाचायला मिळेल हे सांगण्याव्यतिरिक्त संपादक स्वतःची काही निरीक्षणे अभ्यासपूर्ण रितीने मांडत असतात. ती त्या काळातील घटनांवरची भाष्ये असतात. संपादकाच्या लेखणीला एका अर्थी चौफेर नजर ठेवावी लागते. 'भारत-सेवक'चे संपादक केशव आप्पाजी देशमुख हे बुद्धिवादी आणि व्यासंगी होते. देशसेवा, समाजसेवा करण्याचे व्रत घेऊन ते पूर्णत्वास नेण्यासाठी त्यांनी 'लेखणी' हे माध्यम स्वीकारले. संसाराची आर्थिक जबाबदारी पार पाडण्यासाठी त्यांनी भोर संस्थानच्या संस्थानिकांच्या सल्लागारपदाची आलेली नोकरी स्वीकारली. ठाणे नगरपालिकेतही ते निवडून आले. ठाण्यात ग्रंथवाचनपरंपरेचा प्रारंभ करणाऱ्या मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे ह्या संस्थेच्या कार्यवाहपदाची धुरा त्यांनी सांभाळली. समकालीन घटनांवर व्यक्त होण्यासाठी आणि इतरांनाही तसे करता यावे ह्यासाठी त्यांनी 'भारत-सेवक' मासिक काढायचे ठरवले. त्यांच्या पहिल्याच संपादकीयात त्यांनी लिहिल्याप्रमाणे त्यांना लोकमित्र, मराठा मित्र, इंदुप्रकाश, ज्ञानप्रकाश, नवाकाळ इत्यादी तत्कालीन वृत्तपत्रांतून लेख लिहिण्याचा अनुभव होता. जनसेवा हीच ईश्वरसेवा हे ब्रीद त्यांनी अंगी बाणवले, असे त्यांनी ठामपणे मांडले.

भारत-सेवकच्या स्वरूपात वैचारिक आणि ललित लेखनाचे मिश्रण दिसते. वैचारिक निबंध, काव्य, कथा, ललित लेखनपर गद्य, समकालीन घटनांवर टिप्पण्या, विविध विषयांबद्दल माहिती, स्थानिक, राष्ट्रीय आणि काही प्रमाणात आंतरराष्ट्रीय बातम्या, एका ओळीपासून एका पानापर्यंत असलेल्या जाहिराती, आता दुर्मिळ असलेली छायाचित्रे इत्यादी लेखन प्रकारांची रेलचेल असे 'भारत-सेवक'चे स्वरूप दिसते.

वैचारिक निबंधांची काही उदाहरणे-

'आमचें जे मुळापासून आहे तेंच उत्तम, त्यांत फरक




करण्याची आमची इच्छा नाही, असल्या विचारानें आपली सुधारणा होणें शक्य नाहीं. या जगतांत परिवर्त (Change) फार काय तर विश्वाचाहि परिवर्त आहे, हे तत्त्व आधुनिक कालांतहि बर्गसन प्रभृति पाश्चात्य तत्त्वज्ञांनी मान्य केलें आहे. तेंव्हा एकाकाळी उत्तम व आदर्शवत् वाटणारी गोष्ट तिन्ही काळ तशीच राहील, ही कल्पनाच खोटी व तसा अभिमान धरणें हेंही प्रगतीच्या मार्गांत विघ्न उत्पन्न करण्यासारखे आहे.'

- प्रो. नारायण केशव भागवत, एम. ए.

वरील लेखात व्यक्त झालेले विचार कोणत्याही काळात अनुसरण्यासारखे आहेत.

प्रासंगिक विचार (संपादकीय - केशव आप्पाजी देशमुख)

'ठाणें शहर हें मलेरियाचें आगार आहे असा या शहराला शिक्काच बसलेला आहे. त्यामुळें सरकारी अधिकारीवर्गांस येथील हवापाणी आरोग्याच्या दृष्टीने अपायकारक वाटल्यामुळे व इतर सरकारी कामाच्या सोयींकरता ठाणें जिल्ह्याचे ठाणें येथून हालविण्याचा विचार ९/१० वर्षांपूर्वी घाटत होता. पुढे सरकारलाही खर्चाच्या अडचणीमुळे ही योजना रद्द करावी लागली. व सरकारी अधिकारीवर्गासाठी कोपरी येथें स्वतंत्र व हवाशीर बंगले बांधून मलेरियाच्या त्रासांतून त्यांची मुक्तता केली.

...मलेरियासारख्या विषयावर स्त्रीपुरुषांच्या आरोग्याच्या दृष्टीने रावबहादूर प्रोफेसर महादेव गणेश डोंगरे यांनी दिलेल्या व्याख्यानाप्रमाणे जितकी व्याख्यानें होतील तितकीं हवींच आहेत.'

- वरील लेखात उल्लेख केलेले बंगले हे ठाणे पूर्व येथील प्रसिद्ध बारा बंगले होत. आजही ते सरकारी अधिकाऱ्यांची निवासस्थाने म्हणून वापरात आहेत.

'पुणे येथे अलीकडे ज्या अनेक परिषदा भरल्या त्यांत

शेट वालचंद यांच्या अध्यक्षतेखाली भरलेली व्यापारी परिषद, कारखानदारांची सभा व त्याच सुमारास भरलेलें सहावे स्वदेशी प्रदर्शन यांचा अगदी निकट संबंध असल्यामुळे उद्योगधंद्यांत पडणाऱ्या प्रत्येक व्यक्तीस अशा प्रसंगी बराच बोध घेण्यासारखा असतो.

हिंदुस्थानची सद्यःस्थिती लक्षांत घेऊन हिंदी कारागिरांनी केवळ नोकरीवर अवलंबून न राहता न शक्य तितके स्वतंत्र उद्योग काढल्यास व धनिक वर्गानें त्यांस योग्य आश्रय दिल्यास बरेंच कार्य होईल यांत शंका नाहीं.'

'हिंदुस्थानचे पहिले व्हाइसरॉय जाऊन त्यांच्या जागी नवीन व्हाइसरॉय आले. त्यांनी आपले राज्यशकट हांकण्याचे धोरण एकदम बदललें. त्यामुळें तिसरी राउंड टेबल कशी होईल ह्याची अटकळ सर्वांनाच झालेली होती.

जगांत हल्ली एकतंत्री राज्यपद्धती जिकडे तिकडे सुरूं होऊं पहात आहे. ही गोष्ट लक्षांत बाळगूनच हिंदुस्थानची राज्यपद्धति आखण्यांत येत आहे असें स्टेट सेक्रेटरी साहेब सांगत आहेत. पण ह्याच त्यांच्या राज्यपद्धतींतून भावी परिस्थिति हिंदुस्थानला हवी असलेली 'स्वायत्त-सत्ता' निर्माण करणार नाही म्हणून कशावरून?'

संपादक संमेलन -

'पुणे शहरांत जे अनेक समारंभ साजरे होतात व ज्या नवीन कल्पना मूर्त स्वरूपांत बहुजन समाजापुढे मांडल्या जातात त्यांतलाच वरील संमेलनाचा एक प्रकार होय.

या संमेलनापासून कार्य निष्पत्ति काय होणार याचें भविष्य सामान्य माणसालाहि अजमावण्यासारखें होतें व त्याप्रमाणें तें खरेंही ठरलें असें म्हणावयास हरकत नाही.

विद्वान संपादक मंडळाच्या संमेलनांत चर्चा चालू असतांना प्रत्येकाचे कल्पनातरंग विविध प्रकारचे निघून कविवर्गावरहि ताण करण्यास कित्येकांची मजल गेली याबद्दल सखेदाश्चर्य वाटतें'.

---

'साहित्य संमेलन' हा मराठी साहित्यप्रेमींचा जिव्हाळ्याचा विषय आहे. वादग्रस्त नक्षत्रावरच जणू त्याचा जन्म झाला असावा. महादेव गोविंद रानडे ह्यांनी सुरू केलेल्या पहिल्याच ग्रंथकार संमेलनाबद्दल महात्मा जोतिबा फुले ह्यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नावरून विरोध दर्शवला होता. सध्या शंभरीच्या उंबरठ्यावर उभ्या असलेल्या मराठी साहित्य संमेलनाच्या सुरस, रम्य कथा इतिहासात नोंदवल्या गेल्या आहेतच. त्या कथांचा एक बोलका नमुना आपल्याला 'भारत-सेवक'च्या एका अंकात वाचायला मिळतो. तो वाचल्यावर हे लक्षात येते, की मराठी साहित्य संमेलन आणि त्याविषयी घडणारे वाद, घटना ह्यांचा कायमचा ऋणानुबंध असावा.

साहित्य संमेलन म्हणजे केवळ 'उत्सवी उरूस'(!) अशी जी टीका केली जाते, त्याचे मूळ शतकापूर्वीपासूनच रुजले असावे... आता तपशिलात फक्त फरक असतो.

१७ वे साहित्य संमेलन कोल्हापूर येथे भरले होते. ह्या साहित्य संमेलनाबद्दल लिहिलेल्या संपादकीयामधील हा काही भाग वानगीदाखल...

'सुरुवातीलाच सांगलीकर व कोल्हापूरकर यांची संमेलन कोठे भरवायचे याबद्दल रस्सीखेच सुरू झाली. परंतु अखेर कोणत्याही कारणानें कां होईना त्यांत कोल्हापूरकर विजयी झाले.

कोल्हापूरकरांना आधीच परवानगी फार उशिरा मिळालेली; आणि त्यांत प्लेगची साथ अशा दुहेरी अडचणीत बिचाऱ्या कोल्हापूरकरांची फारच त्रेधा उडाली यांत शंकाच नाही! परंतु स्वभाषाभिमानी कोल्हापूर दरबारनें व त्यांच्या हाताखालील इतर संस्थानिकांनीही आपुलकीच्या भावानें मदत केल्यामुळे जागेची व इतर सामानसुमानाची कसलीही कमतरता न पडतां संमेलनाचा बहिरंग खरोखरच दरबारी थाटाचा उडाला.

प्रथम दिवशी संमेलनाच्या मंडपाजवळ एका आंगाला शृंगारलेलें ४ हत्ती, २ उंट व एका आंगाला शिकार करण्यासाठी बाळगलेला चित्त्यांचा शिकारखाना होता. चौघडा, शिंगे, कर्णे वगैरे वाद्ये होती. ६ घोड्यांच्या शृंगारलेल्या रथांत श्री छत्रपति राजाराम महाराज, त्यांच्यामागे घोडेस्वारांची पलटण होती. सुमारे ५-६ हजार साहित्यभक्त बसले आहेत अशा पांच भव्य दरवाजे, पताका व मायबोलीचें प्रेम व अभिमान बाळगणाऱ्या म्हणी लटकत आहेत; विजेची रोशणाई केलेली असून दूरध्वनिक्षेपक यंत्राची योजना केली आहे अशा तऱ्हेचा शृंगारलेला अती विस्तृत मंडप होता.

संमेलनाचे नियोजित अध्यक्ष विद्वान नरेश बडोदाधिपति सयाजी महाराज गायकवाड हे डॉक्टरी सल्ल्यावरून न आल्यामुळे सर्वांचा हिरमोड झाला.

यानंतर मात्र या संमेलनाबरोबरच नियतकालिके यांचे संमेलन, ग्रंथ प्रकाशकांचे संमेलन, कविसंमेलन यांची जी खिचडी झाली त्यायोगे आनंदाच्या ऐवजी दुःखच जास्त होते... खऱ्या साहित्य भक्तांचे मात्र यायोगें समाधान झाले नाही हें निखालस सत्य होय!

संमेलनात सालाबादप्रमाणे भाराभर कंठाळी ठराव पसार झाले हें सांगणें नकोच.

आता याबाबत महाराष्ट्र साहित्य परिषदेकडे दोष येतो म्हणावा तर तिनें आपला जो मागील अहवाल सादर केला तो इतका शोचनीय व केविलवाणा आहे कीं त्याची कींव करावी तेवढी थोडीच!

एकंदरीने पाहातां वेळेच्या अभावी विद्वानांचा उपयोग या संमेलनात फारसा झालाच नाही! काव्यगायनाचे बाबतींतही अद्याप सामान्य जनांचा ओढा काव्यापेक्षा गायनाकडेच

जास्त दिसतो. त्यामुळे बिन आवाजी कवींचा उपहास होतो. परंतु निरंकुश कवींनीं अशा प्रसंगी काळ-वेळ व जमलेल्या जनसमाजरूपी अंकुशाकडे तरी पाहून वागल्यास त्यांचे हंसे होणार नाहीं.

असो एकंदरीने दरबारी थाटाचें हे (?) साहित्य संमेलन पूर्णपणे यशस्वी रितीनें पार पडलें जे कोल्हापूरकरांस भूषणावह आहे!'

साहित्य संमेलनाच्या ह्या निरीक्षणांबद्दल आणि टिप्पण्यांबद्दल अधिक लिहिणे न लगे!

मराठी भाषेवरील कवने, निसर्गवर्णनपर कविता, राष्ट्रप्रेम व्यक्त करणाऱ्या कविता अशा अनेकविध प्रकारच्या काव्याची पेरणी 'भारत-सेवक'च्या अंकांमध्ये जागोजागी दिसते. ह्या मासिकातील बरेचसे काव्य बोधपर असले तरी, केशवसुत कालखंडातील कवितेची काही वैशिष्ट्ये ह्या कवितांमधून नक्की दिसतात.

लोकमान्य पुण्यस्मरण - गणेश बाळकृष्ण ताम्हणे
स्वातंत्र्याचा जप करितची स्वर्गिं गेलां निघून
तेथेंही बा! सगुणविभवें जाहला 'देवमान्य'!
फेंका आतां तरि तव कृपादृष्टि भूमीवरी या!
टाकायातें पुढति स्वपदा धीर येईल आम्हां

भारत-सेवकमधील विविधांगी लेखनाची शीर्षके वानगीदाखल --

दक्षिण-भारत अथवा महाराष्ट्र ही स्थल-माहितीपर लेखमाला -- लेखक सखाराम गणेश मुजुमदार.

परकी भाषा शिकण्याची आधुनिक भाविक नवीन पद्धत- जी. व्ही. भागवत/ भगवद्गीतेतील श्लोकांचे अर्थ-विवरण- गोपाळ महादेव सुळे

सुभाषित संग्रह - वसंत राजे / भोर संस्थानच्या कायदे मंडळांतील प्रश्नोत्तरे - केशव आप्पाजी देशमुख

युरोप खंडातील एकतंत्री राज्यपद्धती - रा. ग. बोरवणकर

विद्यार्थी आणि वाचनालये - लेख - मधुसुदन दळवी, बी.ए.

रघुनाथ यादवविरचित पाणीपतची बखर - यशवंत राजाराम गुप्ते, बी.ए.

'रडणे' - लेख - जे. दि. गांगल, बी.एससी.

बंगलोरी साडी आणि साहेबी टोपी! - कथा - कृ. प. तासकर, बी.ए.

माझी लहानशी मुशाफिरी - बंगालचे प्रवासवर्णन - शांताराम भगवंत शृंगारपुरे.

द्राविडी संस्कृतीचा हिंदू संस्कृतीवर झालेला परिणाम - अनुवादक - शिवराम रावजी खोपकर,बी.ए., बडोदे.

हुंड्याची आसुरी चाल - केशव आप्पाजी देशमुख.

संस्थानी हालहवाल / चां. का. प्रभु समाजाची पाहणी/ ठाणे म्युनिसिपालिटी

निवडणुका / मुंबईतील गिरणी कामगारांचा संप/ कोकणातील वनस्पती

टिप्पण्या - काही उदाहरणे -

'...खामगाव म्युनिसिपालिटीनें आपल्या शाळांतून लाठीचे शिक्षण देण्याची सोय केली आहे. ठाणें म्युनिसिपालिटी या बाबतींत काय करतें तें पहावें.'

'...पाली येथील श्री. बापूसाहेब लिमये यांनी अस्पृश्यता निवारण्याचे बाबतींत प्रामुख्याने पुढाकार घेतल्यामुळें तेथील ब्रह्मवृंदांनीं त्यांचेवर बहिष्कार घातला आहे.'

'...श्री छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळयाला दोनशे तोळे वजनाचा सोन्याचा हार ग्वाल्हेरच्या सरदारांनी व अधिकाऱ्यांनी अर्पण केला. स्तुत्य.'

जाहिरातींच्या गमतीजमती - काही उदाहरणे -

जाहिरात दर -- फुल पेज - बारा रुपये / हाफ पेज - साडेसहा रुपये / पाव पेज - साडेतीन रुपये.

* ओटोदिलबहारने सेंट व अत्तर या दोहोंचीहि गरज भागते.

* सौंदर्य केसानें खुलते आणि केस कामिनिया ऑईलने खुलू लागतात.

* स्वस्त विमा - हिंदुस्थानांतील प्रॉव्हिडंट कंपन्यांत अग्रगण्य सहा लक्ष रुपयांवर फंड असलेल्या व वीस वर्षे पूर्ण झालेल्या अशा कलकत्ता येथील धी इंडिया प्रॉव्हिडंट कंपनीनें गरीब व मध्यम वर्गातील लोकांचे सोईकरिता अत्यंत स्वल्प दराने वैद्यकीय तपासणीशिवाय स्त्रिया, पुरुष व मुले ह्यांना १०० रुपयांपासून पांचशे रुपयांपर्यंत पॉलिसी देण्याचे सुरू केलें आहे. तरी गरजूंनी ह्या एकच विश्वासपात्र कंपनीचा फायदा घ्यावा.

गांवोगांव हुशार मेहनती व प्रामाणिक एजंट पाहिजेत.

आर. एम. दिवाडकर आणि कंपनी. मुंबई नं. १०.

* डॉक्टरच्या तपासणीविना विमा - धी प्रेसिडेन्सी लाइफ इन्शुरन्स कंपनी लि., यॉर्क बिल्डिंग, पहिला मजला, हॉर्नबी रोड, फोर्ट-मुंबई.

* कॉंग्रेसने मान्य केलेल्या मिल्सचें कापड - ठक्कर प्रागजी रामजी, बाजारपेठ, ठाणे.

* ठाकुरद्वार मुंबई येथील सांडू ब्रदर्सच्या ब्राह्मी तेलाची, द्राक्षासवाची पानभर जाहिरात वाचताना खाली असलेला 'चेंबूर, जिल्हा ठाणे', हा पत्ता लक्ष वेधून घेतो.

* सीताबर्डी, नागपूर येथील अमृत फार्मसीची पानभर जाहिरात.

* 'कामशास्त्र' नांवाच्या १०० पानांच्या पुस्तकाची

जाहिरात – वैद्यशास्त्री मणिशंकर गोविंदजी, जामनगर–काठेवाड.
※ तांबे आरोग्यभुवन – गिरगांव, मुंबई.

प्रमाण–भाषा आणि बोली हा वाद सध्याच्या काळातला ऐरणीवरचा वाद वाटत असला तरी त्या वादालाही शतकी परंपरा लाभली असल्याचे पुढील लेखातून प्रत्ययास येते. ज्येष्ठ साहित्यिक न.चिं. केळकर ह्यांनी लो. टिळक चरित्रांतील अनुच्चारित अनुस्वारांना छाट दिल्यासंबंधी होणाऱ्या चर्चेविषयी 'भारत सेवक'च्या संपादकीयात संपादक लिहितात,

'मराठी भाषा ही चालतीबोलती जिवंत भाषा आहे हें कोणीही नाकबूल करणार नाही. तिचे व्याकरणही अर्थात देशकालवर्तमानानें बदलतच राहणार व अशा बदलानेंच तिचा जिवंतपणा दृष्टोत्पत्तीस येणार! भाषेच्या इतिहासाकडे पाहतां प्रथम भाषा अस्तित्वांत असते व ती पुढे व्याकरणाच्या नियमांनी बद्ध करण्यांत येते असेच आढळून येईल. ह्या बाबतींत येत्या साहित्य संमेलनांत विशेष खल होउन योग्य ती दिशा दाखवली जाईल अशी आशा आहे.'

आपल्या सर्वांचा जिव्हाळ्याचा(!) विषय म्हणजे लेखन आणि डोकेदुखीचा विषय म्हणजे प्रकाशन. आज ह्याबद्दल आतडी पिळवटत माणसे चर्चा करतात. ह्या क्षेत्रांत शंभर वर्षांपूर्वीही ह्या विषयांबद्दल आस्था ठेवून मांडलेले विचार वर्तमान परिस्थितीला जसेच्या तसे लागू होतात.

'हिंदुस्तान देशांत लेखन व प्रकाशन या धंद्यात पडणाऱ्या लोकांस किती नफा नुकसान होतें याची कल्पना त्या धंद्यांत काम करीत असणारांसच माहित. याला कारण म्हटलें म्हणजे देशाचं दारिद्र्य व वाचकांची उणीव या दोन मुख्य अडचणी होत.

वीस वर्षांपूर्वी जपानमधील एका शाळेंत अल्प वेतनावर काम करणारा मि. सिजी नोमा नावाचा पंतोजी हल्ली नऊ मासिकांचा चालक आणि शेंकडों पुस्तकांचा प्रकाशक झाला असून त्यांनीं ह्या धंद्यावर लक्षावधि रुपये कमविले आहेत! या धंद्यात पडणाऱ्या आम्हा महाराष्ट्रीयांच्या दैवाचे पांग कधीं फिटतील ते फिटोत.'

नऊ दशकांनंतरही हे पांग अजून फिटायचेच आहेत, हे खेदाने बोलावे लागते.

ब्रिटिशांच्या काळात दशकभर चालू असलेल्या, वाचकप्रिय झालेल्या, परंतु अलक्षित ठरलेल्या 'भारत–सेवक' मासिकाचे मराठी नियतकालिकांच्या इतिहासातील स्थान नक्कीच महत्त्वाचे आहे. मासिकाचा प्रसार महाराष्ट्र, गुजरात, वऱ्हाड आणि हिंदी संस्थाने ह्यांच्यापर्यंत पोहोचला होता हे नक्कीच अभिमानास्पद आहे.

ह्या मासिकासाठी संपादकांसह अनेक लेखक–कवींनी आपल्या लेखणीचे योगदान दिले आहे. छायाचित्रकारांनी काढलेली छायाचित्रे आजच्या घडीला 'दुर्मीळ' ठरावीत अशी आहेत. इतिहासातील घडामोडींचा हा दस्तऐवज आहे. इतिहास, साहित्य इत्यादीच्या अभ्यासकांसाठी आणि एकूणच वाचकांसाठीही तो मौलिक आहे. ह्या मासिकाच्या उपलब्ध असलेल्या अंकांची पाने जीर्ण झाली असली तरी – प्रारंभीच म्हटल्याप्रमाणे– ह्यांत मांडलेले विचार हे नव्वद वर्षांनंतरही 'ताजे' आहेत. हे मासिक का बंद पडले ह्यामागचे कारण माहीत नाही. कदाचित आर्थिक चणचण हेच कारण असावे. संपादक केशव आप्पाजी देशमुख ह्यांनी ज्या स्वदेशाच्या सांस्कृतिक उन्नतीचा, सेवेचा ध्यास आयुष्यभर घेतला, त्या आपल्या भारत देशाला स्वातंत्र्य मिळाले, हे पाहण्याचे समाधान त्यांना मिळाले, पण १५ नोव्हेंबर, १९४७ मध्ये त्यांचे दुःखद निधन झाले.

भारत–सेवक मासिकाचे काही अंक मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयाच्या संदर्भ विभागात जपून ठेवले आहेत.

काही ठरावीक वर्षांचे भारत–सेवकचे अंक बाइंड केलेल्या (आता जीर्ण होऊ लागलेल्या) स्वरूपात केशव आप्पाजी देशमुख ह्यांच्या पत्नी श्रीमती सत्यभामाबाई देशमुख ह्यांनी जपून ठेवले. त्यांच्या पश्चात त्यांचे पुत्र अशोक आणि सून शुभदा ह्यांनी ते जपून ठेवले. आता ते अशोक ह्यांच्या मुलीकडे म्हणजे माझ्याकडे सोपवले गेले आहेत.

मला सांगायला अभिमान वाटतो, की 'भारत–सेवक' मासिकाच्या संपादकांची – लेखक केशव आप्पाजींची मी नात आहे.

आपल्या भारताच्या स्वातंत्र्याला ७७ वर्षे पूर्ण होत असताना 'भारत–सेवक'मधील ह्या ऐतिहासिक दस्तऐवजाचा परिचय वाचकांना करून देताना एक वेगळे समाधान मिळत आहे. ह्या औपचारिक लेखाला हा एक वैयक्तिक, भावपूर्ण स्पर्श.

**– डॉ. निर्मोही फडके**
nirmohiphadke@gmail.com

॥ग्रंथाली॥





**अवघड वळणाच्या खडतर वाटेवर...**

**अल्मित्रा पटेल**

**शरद पांडुरंग काळे**

**मूल्य ४०० रुपये**
**सवलतीत २५० रुपये**



# अर्जुन डांगळे यांच्या कृतकृत्य जीवनाचे सार 'छावणी'चे प्रकाशन

डॉ. मंगेश बनसोड

अर्जुन डांगळे यांच्या 'छावणी' या गौरवग्रंथाचे प्रकाशन नुकतेच मुंबईच्या दादासाहेब गायकवाड सांस्कृतिक केंद्रात पार पडले. अर्जुन डांगळे यांच्या पंचाहत्तरीनिमित्ताने काढण्यात प्रकाशित या गौरवग्रंथाचे प्रकाशन हे अर्जुन डांगळे यांच्या ७९ व्या वाढदिवशी करण्यात आले. अर्थात मधला दोन-अडीच वर्षांचा कोव्हिडकाळही त्यामध्ये आलाच. तरीसुद्धा ज्या सातत्यपूर्ण मेहनतीने आणि गांभीर्याने हा 'छावणी' गौरवग्रंथ डॉ. महेंद्र भवरे, डॉ. सुनील अवचार आणि किशोर मेढे या संपादकांनी संपादित केलाय, त्यासाठी ते अभिनंदनास पात्र आहेत.

'छावणी' गौरवग्रंथाची संपादकांनी एकूण तीन भागांत या विभागणी केली असून, त्यात १. 'अर्जुन डांगळे : साहित्य', २. 'अर्जुन डांगळे : व्यक्तिमत्त्व' आणि ३. 'अर्जुन डांगळे : चळवळ' हे असून यासोबतच 'अर्जुन डांगळे : संवाद', 'अर्जुन डांगळे : पत्रसंवाद', 'अर्जुन डांगळे : छायाचित्रे' व 'अर्जुन डांगळे : अल्पपरिचय' अशाप्रकारची सुटसुटीत मांडणी या गौरवग्रंथाची केलेली आहे.

'अर्जुन डांगळे : साहित्य' या पहिल्या भागात एकूण अठरा महत्त्वाच्या मान्यवरांचे लेख समाविष्ट केले असून यात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, डॉ. संजय मून, डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, डॉ. रावसाहेब कसबे, किशोर मेढे, डॉ. भास्कर पाटील, डॉ. गंगाधर पानतावणे, डॉ. गजानन बनसोड, डॉ. श्यामल गरुड, डॉ. कैलास वानखडे, दया पवार, डॉ. सुनील अभिमान अवचार, डॉ. भालचंद्र फडके, डॉ. अशोक इंगळे, अनुपमा उजगरे, बी.व्ही.जोंधळे, डॉ. गिरीश मोरे आणि डॉ. मिलिंद कसबे इत्यादींनी दलित साहित्य, आंबेडकरी चळवळ, अर्जुन डांगळे यांचे साहित्य, कविता, दलित कथा, दलित साहित्याची राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय ओळख तसेच अण्णाभाऊ साठेंची आणि आजच्या तमाशाचे वास्तव अशा विविधांगी विषयांवरचे मौलिक चिंतन दिसून येते.

'अर्जुन डांगळे : व्यक्तिमत्त्व' या दुसऱ्या भागात सुभाष देसाई, रामदास आठवले, नीलम गोऱ्हे, डॉ. नितीन राऊत, गजानन खातू, विश्वास पाटील, ज.वि. पवार, ॲड. जयदेव गायकवाड, मुरलीधर जाधव, ऊर्मिला पवार, हिरा बनसोडे, डॉ. एस.एस. धाकतोडे, दिवाकर शेजवळ, मधु मोहिते, सुनील कदम, अरुण निकम. पुथियामाधवी या राजकीय आणि सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या नेते-कार्यकर्ते-साहित्यिकांनी अर्जुन डांगळे यांच्या व्यक्तिमत्त्वातील विविध पैलू आपल्या लेखांतून उलगडून दाखवले आहेत.

'रिपब्लिकन चळवळीतील एक संयमी नेता', 'शिवशक्ती-भीमशक्ती एकजुटीचा प्रवक्ता', 'आंबेडकरी चळवळीतील आदरस्थान', 'पुरोगामी विचारांना कवेत घेणारा पथिक', 'नेते असून कार्यकर्ते', 'सुरांसोबत सूर्यही बदलायची तमन्ना बाळगणारा खंदा माणूस', 'अर्जुन डांगळे : मित्रत्व आणि मतभेद', 'पंचाहत्तरी निमित्ताने', 'हलत्या छावणीतील योद्धा', 'कविमनाचा कार्यकर्ता', 'साहित्य आणि आंबेडकरी चळवळ यांचा सुरेख संगम', 'आंबेडकरी चळवळीचा प्रवक्ता', 'छावणी नायक', 'एक अजब रसायन', 'अशांत लढाऊ पँथर, 'Wings of the Rebillion' अशा वैविध्यपूर्ण शीर्षकांतील लेखांतून अर्जुन डांगळे यांचे दलित पँथर आणि आंबेडकरी चळवळीतील निर्भीड आणि अजातशत्रू व्यक्तिमत्त्व आपणासमोर उभे राहते.

'अर्जुन डांगळे : चळवळ' या तिसऱ्या भागात उत्तम कांबळे, अविनाश महातेकर, शांताराम पंदेरे, राही भिडे, दिलीप जगताप, अनिल ठाणेकर या पत्रकार, राजकीय नेते आणि कार्यकर्त्यांनी लिहिलेल्या लेखांतून अर्जुन डांगळे यांचे फुले-आंबेडकर चळवळीतील योगदान यावर प्रकाश टाकलेला दिसून येतो.

या गौरवग्रंथातील अत्यंत महत्त्वाचा भाग म्हणजे त्याचे संपादक डॉ. महेंद्र भवरे यांनी अर्जुन डांगळे यांची घेतलेली प्रदीर्घ आणि साक्षेपी मुलाखत होय. 'अर्जुन डांगळे : संवाद'

या शीर्षकांतर्गत डॉ. महेंद्र भवरे यांनी सर्वसामान्य आंबेडकरी चळवळीतील सर्वसामान्य कार्यकर्त्याच्या मनातील अनेक प्रश्न अत्यंत स्पष्टपणे विचारून सर्वसामान्य आंबेडकरी जनतेचे प्रतिनिधित्वच केले आहे. तर या प्रश्नांना अर्जुन डांगळे यांनी दिलेली स्पष्ट नि निखळ उत्तरे, सामाजिक-राजकीय प्रवास चालू असताना परिस्थितीनुरूप बदलत गेलेल्या भूमिका यांविषयी कुठलीही लपवाछपवी न करता अर्जुन डांगळे यांचे व्यक्त होणे अधिक भावणारे आहे.

अर्जुन डांगळे यांना त्यांच्या विविध स्तरांतील मित्र-स्वकीय, साहित्यिक, राजकीय नेते, हितचिंतक यांनी वेळोवेळी लिहिलेली अत्यंत संग्रहणीय अशी पत्रेसुद्धा या गौरवग्रंथात समाविष्ट करण्यात आली आहेत. त्यात सत्तरीच्या दशकातील कार्यकर्ते, 'मागोवा', 'तात्पर्य' या मासिकाचे संपादक तसेच शहादा (धुळे) येथील आदिवासी सक्रिय सुप्रसिद्ध विचारवंत दि.के. बेडेकर यांचे सुपुत्र सुधीर बेडेकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सहकारी, विचारवंत, अभ्यासक व मिलिंद महाविद्यालयाचे पहिले प्राचार्य म.भि. चिटणीस, दिनेश जाधव, बाबूराव बागूल, अरुण टिकेकर, शरदचंद्र मुक्तिबोध, दिनकर गांगल, कमलेश्वर, लक्ष्मणशास्त्री जोशी, दया पवार, केशव मेश्राम, लक्ष्मण माने, रावसाहेब कसबे, कट्टी पद्मा राव (आंध्रमधील दलित चळवळीचे कार्यकर्ते व कवी), धम्मचारी लोकमित्र, टोकियो (जपान) विद्यापीठातील हिंदी विभागाचे प्रमुख हिदआकी इशिदा, श्रीधर जाधव, प्र.श्री. नेरूरकर, भालचंद्र फडके, शंकर वैद्य-सरोजिनी वैद्य, रणजीत मेश्राम, ताराचंद्र खांडेकर, सुनील देशमुख (महाराष्ट्र फाउंडेशन, अमेरिका), नामदेव ढसाळ, उद्धव ठाकरे अशा मान्यवरांच्या पत्रांचा समावेश आहे. त्यासोबतच या गौरवग्रंथामध्ये वेगवेगळ्या सामाजिक, राजकीय, साहित्यिक कार्यक्रमादरम्यानचे तसेच काही कौटुंबिक फोटोही आपल्याला बघायला मिळतात.

हा गौरवग्रंथ म्हणजे आंबेडकरी चळवळीचा अत्यंत मौल्यवान दस्तऐवज आहे. अशा या मौल्यवान ग्रंथाच्या प्रकाशनाला शिवसेनेचे ज्येष्ठ नेते सुभाष देसाई, 'ग्रंथाली'चे माजी विश्वस्त दिनकर गांगल, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मराठी विषयाचे निवृत्त प्राध्यापक डॉ. मनोहर जाधव, ज्येष्ठ कवयित्री प्रा. प्रज्ञा दया पवार, 'छावणी' या गौरवग्रंथाचे संपादक डॉ. महेंद्र भवरे-किशोर मेढे, सायन पब्लिकेशनचे प्रकाशक नितीन कोत्तापल्ले प्रामुख्याने उपस्थित होते; तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कर्मवीर दादासाहेब गायकवाड सांस्कृतिक केंद्राचे अध्यक्ष विजय जाधव हे होते.

याप्रसंगी प्रकाशकीय मनोगत व्यक्त करताना नितीन कोत्तापल्ले म्हणाले, की महाराष्ट्राला वैचारिक, सामाजिक चळवळीची आणि प्रबोधनाची एक सुदीर्घ अशी परंपरा आहे. महाराष्ट्राने नेहमीच देशाचे वैचारिक नेतृत्व केले आहे. म्हणूनच महाराष्ट्रात प्रबोधनाचा पराभव होणे देशालाही परवडणारे नाही. असे होऊ नये म्हणून या प्रबोधनपर्वाचे जे शिलेदार असतील, त्यांच्या पाऊलखुणा आपण जपल्या पाहिजेत. त्यांचा प्रवास, त्यातील महत्त्वाचे टप्पे आपण जाणून घेतले पाहिजेत. या पाऊलखुणा जपण्याचा, असा प्रवास जाणून घेण्याचा एक महत्त्वाचा प्रयत्न म्हणजे अर्जुन डांगळे यांचा गौरवग्रंथ- छावणी.

अर्जुन डांगळे हे केवळ सामाजिक चळवळीतील एक महत्त्वाचे कार्यकर्तेच नाहीत तर ते मराठी साहित्यातील एक महत्त्वाचे कवी आहेत. महाराष्ट्राला सुपरिचित असणारे विचारवंत आहेत आणि एक संयमित, समजूतदार राजकारणी आहेत. विद्रोह आणि सामाजिक परिवर्तनासाठी संघर्षाची भूमिका ठामपणे मांडूनही त्यांचा स्वभाव आणि एकूणच राजकारण एकारलेले किंवा दुराग्रही नाही. म्हणूनच त्यांचा पंचावन्न-साठ वर्षांचा वैचारिक, सामाजिक प्रवास सूत्रबद्धतेने नोंदवला जाणे फार महत्त्वाचे होते. ते काम डॉ. महेंद्र भवरे, डॉ. सुनील अवचार आणि किशोर मेढे या संपादक त्रयीने केले आणि आपल्यासाठी फार महत्त्वाचा वैचारिक दस्तऐवज उपलब्ध करून दिला.

'छावणी' ग्रंथाचा गौरव करताना डॉ. प्रज्ञा दया पवार म्हणाल्या, की महाराष्ट्रातील गेल्या पन्नास वर्षांच्या राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, वाङ्मयीन क्षेत्रातल्या महत्त्वाच्या घटनांचा इतिहास नोंदवला गेला आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे महाराष्ट्रात दलित साहित्य व दलित पँथर नावाचे मन्वंतर घडून आले. खरे म्हणजे अर्जुन डांगळे हे आमचे हीरो आहेत.

प्रा. डॉ. मनोहर जाधव यांनी एकूणच 'छावणी'चा





'छावणी'चे प्रकाशन आणि अर्जुन डांगळे यांचा सत्कार - यासमयी नितीन सोनावणे, प्रा. डॉ. प्रज्ञा दया पवार, सुभाष देसाई, अर्जुन डांगळे, विजय जाधव, दिनकर गांगल, प्रा. डॉ. मनोहर जाधव, प्रा. डॉ. महेंद्र भवरे

आढावा घेताना या ग्रंथाची मौलिकता स्पष्ट करून दाखवली. विशेष म्हणजे डॉ. महेंद्र भवरे यांनी 'अर्जुन डांगळे : संवाद' या विभागात अर्जुन डांगळे यांची घेतलेली मुलाखत व त्या प्रश्नांना अर्जुन डांगळे यांनी दिलेली उत्तरे, विशेषतः राजकीय भूमिकांविषयी विचारलेल्या सडेतोड प्रश्नांना तेवढ्याच संयमाने आणि खरेपणाने अर्जुन डांगळे यांनी दिलेल्या उत्तरांचा आवर्जून उल्लेख केला. ही मुलाखत खरोखरच वाचनीय अशी आहे.

दिनकर गांगल यांनी आपल्या थोडक्या मनोगतात अर्जुन डांगळे यांच्यासोबतच्या सुरुवातीच्या दिवसांतील आठवणींना उजाळा दिला.

याप्रसंगी बोलताना शिवसेना नेते सुभाष देसाई म्हणाले, की पँथरच्या चळवळीमुळे मला चांगला मित्र मिळाला. पँथरची चळवळ आक्रमक असताना सर्वांना एकत्र ठेवत अर्जुन डांगळे यांनी संयम ठेवला. सामाजिक-शैक्षणिक संस्थांच्या माध्यमातून समाजाची प्रगती करण्यासाठी अशा संस्थांना सांभाळून घ्यावे हे त्यांच्याकडून शिकायला मिळाले.

नामदेव ढसाळ यांनी दलित पँथरची स्थापना केली. त्यावेळी दलित पँथरचा लोगो शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी रेखाटला, अशी आठवण सुभाष देसाई यांनी सांगितली.

यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना अर्जुन डांगळे म्हणाले, मागील पाच वर्षांपासून माझे सत्कार होत आहेत. आज कर्मवीर दादासाहेब गायकवाड सांस्कृतिक केंद्राने सत्कार केला याचा मला वेगळा आनंद वाटतो. हा सत्कार माझा नसून तुम्हा सर्वांचा-जनमानसाचा सत्कार आहे. आपल्याविषयी लोक चांगलं बोलतात तेव्हा काम करायला नवी ऊर्जा मिळते.

याप्रसंगी डॉ. महेंद्र भवरे यांनी आपले संपादकीय मनोगत व्यक्त केले, तर विजय जाधव यांनी उपस्थितांचे आभार मानले.

या अविस्मरणीय सोहळ्याला कला, साहित्य, सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय चळवळीतील ऊर्मिला पवार, डॉ. एस.एस. धाकतोडे, पुष्पा धाकतोडे, डॉ. श्यामल गरुड, डॉ. आशालता कांबळे, सुरेश केदारे, महेश भारतीय, सुमेध जाधव असे अनेक मान्यवर व अर्जुन डांगळे यांच्यावर प्रेम करणारे अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

एखादा माणूस आपल्या सामाजिक, साहित्यिक, सांस्कृतिक आणि राजकीय जीवनात सतत कार्यरत राहून, आपल्या आयुष्याची पंचाहत्तरी गाठून आपल्या आयुष्याचं सिंहावलोकन करतो, तेव्हा त्याच्या मनात कृतकृत्य झाल्याची भावना निर्माण होते आणि तो आपल्यावर प्रेम करणाऱ्या साहित्यिक, कलावंत व आपल्या सहप्रवाशांच्या त्याच्याविषयीच्या भावनांनी भरून पावतो. नेमका हाच अनुभव दलित पँथरच्या संस्थापकांपैकी एक असलेले आणि संपूर्ण आयुष्यभर जे सतत कार्यशील राहिले असे मराठीतील ज्येष्ठ कवी-साहित्यिक, संपादक, आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ राजकीय नेते मा. अर्जुन डांगळे यांच्या 'छावणी' या गौरवग्रंथाच्या प्रकाशनाच्या निमित्ताने आला.

**– डॉ. मंगेश बनसोड**

mangeshbansod@gmail.com

**अ भि नं द न**




इचलकरंजी येथील आपटे वाचनमंदिरातर्फे दिला जाणारा, सन २०२३ साठीचा 'इंदिरा संत उत्कृष्ट काव्यसंग्रह' पुरस्कार 'ग्रंथाली' प्रकाशित, घनश्याम बोरकर लिखित 'कालजयी' या कवितासंग्रहाला लाभला आहे. २२ जून २०२४ रोजी, अ.भा. साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. रवींद्र शोभणे यांच्या हस्ते तो कवी घनश्याम बोरकर यांना प्रदान करण्यात आला. 'ग्रंथाली' परिवारातर्फे त्यांचे अभिनंदन!



# डॉ. स्नेहलता देशमुख तेजस्वी व्यक्तिमत्त्व

डॉ. अविनाश सुपे

गेल्या दशकात शल्यचिकित्सकांमध्ये असलेले स्त्रियांचे प्रमाण यावर बरीच चर्चा आहे. कामाचा अतिभार, ऑपरेशन थिएटरमध्ये अनेक तास उभे राहून काम करण्याची क्षमता, पुरुष समवयस्कांचा प्रतिकार, आपल्या समाजातील समज ह्यामुळे महिला शल्यचिकित्सकांची संख्या अनेक वर्षे जगात आणि भारतातदेखील कमीच होती व आहे. ह्या पार्श्वभूमीवर डॉ. स्नेहलता देशमुख मॅडमनी केलेला हा प्रवाहाविरुद्ध प्रवास वाखणण्याजोगा आहे. डॉ. देशमुख हे नाव मराठी समाजासाठी परिचित आहे. त्या एक प्रसिद्ध शल्यचिकित्सक, कुशल प्रशासक, आणि उत्तम मराठी लेखिका आणि वक्त्या होत्या. त्यांचे योगदान वैद्यकीय क्षेत्रापासून साहित्य आणि शिक्षणक्षेत्रापर्यंत विस्तृत आहे.



डॉ. स्नेहलता देशमुख

डॉ. स्नेहलता देशमुख यांचा जन्म १९३८मध्ये अशा कुटुंबात झाला जिथे शिक्षण, नैतिकता, कला आणि विज्ञान यांना प्राधान्य होते. आईकडून आलेल्या रांगोळी, भरतकाम, चित्रकला, आणि संगीत यांसारख्या छंदामुळे त्यांच्या कलात्मक प्रवृत्तीचे पालनपोषण केले गेले. त्यांचे वडील डॉ. श्रीकृष्ण वासुदेव जोगळेकर हे एक प्रतिष्ठित सर्जन आणि वैद्यकीय प्रशासक होते, त्यांनी मुंबईतील केइएम रुग्णालय व सायन रुग्णालय याचे डीन म्हणून काम केले होते. त्यांच्या प्रभावाने मॅडमनी शैक्षणिक भरारी घेतली. डॉ. देशमुख यांचा शैक्षणिक प्रवास दादर येथील इंडियन एज्युकेशन सोसायटीच्या मुलींच्या शाळेत सुरू झाला आणि रुईया कॉलेजमध्ये सुरू राहिला. नंतर त्यांनी जीएस मेडिकल कॉलेजमध्ये वैद्यकीय शिक्षण घेतले, जिथे त्यांनी उत्कृष्ट कामगिरी केली आणि एमबीबीएसमध्ये वर्गात अव्वल स्थान मिळवले. टाटा हॉस्पिटलच्या सर्जिकल ऑन्कॉलॉजी प्रोग्राममध्ये त्यांना प्रवेश नाकारला गेला. पुढे त्यांनी जी.एस. मेडिकल कॉलेजमधील सामान्य शस्त्रक्रियेमध्ये पदव्युत्तर शिक्षण घेऊन, बालरोग शस्त्रक्रियेकडे विशेष प्रशिक्षण घेतले. शिक्षण पूर्ण केल्यानंतर एक प्रमुख बालरोग शल्यचिकित्सक ह्या विभागाचा विकास करून वैद्यकीय व शल्यकौशल्यासाठी भारतातच नव्हे तर जगभरात प्रशंसा मिळवली.


डॉ. स्नेहलता देशमुख यांनी मुंबईच्या सायन रुग्णालयाच्या डीन म्हणून कार्य केले. त्यांच्या काळात त्यांनी रुग्णालयातील वैद्यकीय सेवा आणि शैक्षणिक गुणवत्ता सुधारण्यासाठी अनेक महत्त्वपूर्ण पावले उचलली. त्यांनी नवनवीन वैद्यकीय पद्धतींचा अवलंब करून रुग्णसेवा अधिक सक्षम आणि गुणात्मक बनवली. त्यांच्या नेतृत्वाखाली सायन रुग्णालयाने अनेक नवे उपक्रम सुरू केले. वैद्यकीय कारणांमुळे आपल्या नवजात बालकांना स्तनपान करू शकत नसलेल्या मातांसाठी दूध बँकेची स्थापना हे त्यांच्या उल्लेखनीय योगदानांपैकी एक आहे. हा

उपक्रम अनेक लहान मुलांसाठी, विशेषत: वंचित समाजातील मुलांसाठी वरदान ठरला. धारावी झोपडपट्टीतील गर्भवती महिलांमध्ये फॉलिक ॲसिडची कमतरता नवजात मुलांमधील पाठीच्या कण्यातील दोषांच्या उच्च घटनांशी संबंधित आहे, या शोधामुळे परिसरातील गर्भवती महिलांमध्ये मोठ्या प्रमाणावर फॉलिक ॲसिडची पूर्तता केली गेली.

मुंबई विद्यापीठाच्या कुलगुरू म्हणूनही डॉ. स्नेहलता देशमुख यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्यांच्या कार्यकाळात विद्यापीठाच्या शैक्षणिक आणि प्रशासकीय कामकाजात पारदर्शकता आणि गुणवत्ता वाढवण्यासाठी त्यांनी अनेक उपक्रम राबवले. विद्यार्थी आणि शिक्षक यांच्यातील संवाद वाढवण्यासाठी त्यांनी विविध कार्यक्रम आणि चर्चासत्रांचे आयोजन केले. अनेक प्रगतीशील सुधारणा केल्या, ज्यामध्ये पदवी प्रमाणपत्रांवर आईच्या नावाचा समावेश करण्यात आला, ज्याने विद्यार्थ्यांच्या जीवनात महिलांची महत्त्वपूर्ण भूमिका ओळखली. त्यांच्या नेतृत्वाखाली विद्यापीठाने राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर आपली ओळख निर्माण केली.

डॉ. स्नेहलता देशमुख यांनी केवळ वैद्यकीय आणि शैक्षणिक क्षेत्रातच नव्हे, तर साहित्यक्षेत्रातही आपला ठसा उमटवला होता. त्या एक प्रसिद्ध मराठी लेखिका आणि वक्त्या होत्या. त्यांच्या लेखनातून आणि व्याख्यानांमधून त्यांनी सम ाजातील विविध विषयांवर विचार मांडले. त्यांचे भाषण ऐकणे हा एक अविस्मरणीय अनुभव असायचा. त्यांच्या बोलण्यातला सहजभाव आपलेपणा घेऊन यायचा. बोलताना पुस्तकांची, कवितांची उदाहरण देणे यातून त्यांच्यातील रसिक आणि अभ्यासक दिसून येत असे. त्यांच्या पुस्तकातून व साहित्यातून समाजातील समस्यांवर प्रकाश टाकला जात असे आणि विचार करण्यास प्रवृत्त केले जायचे.


ग्रंथाली



और काही अनुभवावे

गजलकार
**सदानंद डबीर**

संकलन
**शेखर जोशी**

**मूल्य १५० रुपये**
**सवलतीत १०० रुपये**


तसेच, डॉ. देशमुख यांनी टाटा हॉस्पिटल, सोमैया मेडिकल कॉलेज, आणि पार्ले टिळक विद्यालय यांच्या व्यवस्थापन समित्यांमध्येही सक्रिय सहभाग घेतला. त्यांच्या मार्गदर्शनाखाली या संस्थांनी आपली कार्यक्षमता आणि सेवा अधिकाधिक सुधारली. त्यांनी या संस्थांच्या विविध उपक्रमांमध्ये मोलाचे योगदान दिले आणि त्यांच्या प्रशासकीय कामकाजात सुधारणा केल्या. डॉ. स्नेहलता देशमुख यांच्या नेतृत्वाखाली या सर्व संस्थांनी नवनवीन शिखरे गाठली. त्यांचे कार्य नेहमीच प्रेरणादायी आणि आदर्शवत असे राहिले आहे.

डॉ. स्नेहलता देशमुख या एक महान शल्यचिकित्सक, कुशल प्रशासक, प्रगल्भ लेखिका आणि गर्भसंस्काराच्या क्षेत्रातील तज्ज्ञ होत्या. त्यांच्या विविध कार्यक्षेत्रांतील योगदान आणि कार्य सदैव स्मरणात राहील आणि अनेकांना प्रेरणा देत राहील. त्यांच्या उल्लेखनीय कार्यात गर्भसंस्कार, नवजात शिशू आणि माता यांचा आहार या विषयावरचे काम विशेष आहे. त्यांनी गर्भसंस्काराच्या महत्त्वावर आणि त्याच्या परिणामांवर विस्तृत संशोधन केले. गर्भसंस्कार तंत्र वा मंत्र आणि काळजी या विषयावर अनेक पुस्तके लिहिली, जी गर्भवती मातांसाठी आवश्यक मार्गदर्शक ठरली. वैद्यकीय क्षेत्रातील आरोग्य व शिक्षण ह्यामधील उत्कृष्ट कार्यासाठी त्यांचा १९९८मध्ये वैद्यकीय क्षेत्रातील सर्वोच्च सन्मान असलेला डॉक्टर बी. सी. रॉय पुरस्कार आणि २००५मध्ये धन्वंतरी पुरस्कार, देऊन गौरव करण्यात आला.

माझा मॅडमशी संपर्क विद्यार्थिदशेतच आला. १९८१मध्ये बालरोग शल्यचिकित्सा विभागात निवासी डॉक्टर म्हणून काम करताना मॅडमची रुग्णांबद्दलची कळकळ, शस्त्रक्रियेतील कौशल्य, रुग्णसंवाद, प्रशासकीय कौशल्य याची जवळून ओळख झाली. त्यांनी मला हात धरून सर्जरी शिकवली. त्यांच्या धडाडीच्या व करारी व्यक्तिमत्त्वाला मायेची व प्रेमाची झालर होती.

पुढे केईएममध्ये व सायनमध्ये अधिष्ठाता झाल्यावरही वेळोवेळी त्या मला योग्य तो सल्ला देत असत. दरवर्षी गणेशोत्सवात आम्ही त्यांच्या घरी नेमाने जात असू. त्यांच्याशी गप्पा मारणे म्हणजे एक पर्वणीच असायची. थोडक्यात उत्कृष्ट बाल शल्यक्रिया चिकित्सक, उत्तम प्रशासक, साहित्यिक, ऐकत राहाव्या अशा वक्त्या व आम्हा सर्वांना आधारवड असलेल्या डॉक्टर स्नेहलता देशमुख यांची आम्हाला नक्कीच उणीव भासणार आहे. जिथे नतमस्तक व्हावे व पाया पडावे असे पाय कमीच असतात. आज यातील दोन पाय कमी झाले एवढे नक्कीच!


**– डॉ. अविनाश सुपे**
avisupe@gmail.com



# ‘काय बे!’
## सॅन होजेमधील मराठीचा जागर

डॉ. लतिका भानुशाली

इंटरनेट हीच जिथे स्वप्नवत बाब होती, टेलिफोनवर बोलणेही जिथे दुरापास्त होते अशा काळात ज्यांनी अमेरिकेची वाट धरली त्या पिढीने मातृभूमीच्या ओढीने, संस्कृती आणि भाषेच्या प्रेमाने मायभूमीच परक्या देशात उभी केली, त्याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे अमेरिकास्थित मराठी मंडळींनी स्थापन केलेले बृहन्महाराष्ट्र मंडळ आणि दर दोन वर्षांनी अमेरिकेतील विविध शहरांमध्ये बृहन्महाराष्ट्र मंडळातर्फे साजरे होणारे अधिवेशन. यावर्षी मराठी माती आणि मराठी संस्कृतीचा सुगंध उमटला तो उत्तर अमेरिकेतील सॅन होजे या शहरात.

नफा-तोटा याचा विचार न करता ग्रंथाली १९९३पासून सलग सर्व संमेलनांत मराठी पुस्तकांचे प्रदर्शन भरवत आहे. हेतू इतकाच, की अमेरिकास्थित मराठी मंडळी आणि महाराष्ट्र यांच्यातील भाषिक, साहित्यिक आणि सांस्कृतिक बंध अधिक घट्ट करणे. यावर्षीही विविध विषयांवर आधारित पुस्तके, ऑडिओ बुक, ‘विश्व मराठीचे’ हा ‘शब्द रुची’ मासिकाचा विशेषांक असा साहित्यिक मेवा घेऊन ग्रंथाली परिवार सॅन होजे येथे आयोजित या संमेलनात सामील झाली होती. ग्रंथालीची प्रतिनिधी म्हणून या संमेलनात सहभागी होण्याची संधी मला मिळाली.

संमेलनस्थळी उभारलेली गुढी आणि तुळशीवृंदावन पाहताना, आपण अमेरिकेत आहोत याचा विसर पडत होता. मराठमोळ्या वातावरणात कुठे बुंदीचे लाडू वळले जात होते, कुठे रंगोळी काढली जात होती, तर कुठे ढोलतशाचे पथक वाद्य वाजवत होते आणि आसमंत महाराष्ट्राच्या सुगंधाने गंधित होऊन गेला होता. या भव्यदिव्य कार्यक्रमाचे दैनंदिन अहवाल ‘महाराष्ट्र टाइम्स’साठी रोजच्या रोज पाठवण्याची जबाबदारी उत्तरा मोने आणि श्रीकांत बोजेवार यांच्यामुळे मला मिळाली.

ग्रंथालीच्या पुस्तक प्रदर्शनाला आवर्जून भेट देणाऱ्या लोकांशी संवाद साधणे, पुस्तकांचा परिचय करून देणे, नवीन लेखकांना भेटणे अशा अनेक गोष्टी या निमित्ताने साधल्या गेल्या. या वर्षी ग्रंथालीचे पुस्तक तिथे विशेष आकर्षण ठरले ते कुमारगंधर्व यांच्या १९८५ मध्ये सहा दिवस घेतलेल्या मुलाखतमैफलीवरील ‘गंधर्वांचे देणे’. या पुस्तकाचे वैशिष्ट्य म्हणजे पुस्तकात असलेले क्यूआर कोड. त्यामुळे वाचता वाचता कुमारजींचे एकूण साडेपाच तासांचे गाणेही ऐकायला देणारे हे ‘गाणारे पुस्तक’. या प्रदर्शनात ग्रंथालीतर्फे सुदेश हिंगलासपूरकर, डॉ. लतिका भानुशाली, अरुण जोशी, धनश्री धारप, शोभा आणि सई हिंगलासपूरकर, ग्रंथाली लेखिका डॉ. निर्मोही फडके, डॉ. स्मिता दातार, राजस्थानचे उद्योगपती आणि लेखक प्रकाश अंबुरे आणि त्यांच्या पत्नी छाया अंबुरे आदी सहभागी झाले होते. ग्रंथालीची ही साहित्यिक धडपड पाहून ग्रंथालीला मदत करणारे अमेरिकास्थित अनेक मराठी हात पुढे सरसावले. यात विशेष उल्लेखनीय म्हणजे विकास बावधनकर, माधव काळे, वामन गानू, नंदन जोशी, नितीन जोशी, सुनंदा आपटे-काकडे, संतोष जोशी, मुकुंद मराठे, प्रकाश राव, विद्या हर्डीकर-सप्रे, उज्ज्वला फेणे, डॉ. अनंत लाभसेटवार, संजय साळुंखे, दीपाली गांगल, अभिजित मराठे, अर्थव मुळे.

या संमेलनात ग्रंथालीतर्फे शरद काळे लिखित अल्मित्रा पटेल यांच्या जीवनावर आधारित पुस्तक सुप्रसिद्ध शास्त्रीय गायिका विदुषी अश्विनी भिडे-देशपांडे यांच्या हस्ते प्रकाशित झाले. तर ‘ऊर्मिला’ या डॉ. स्मिता दातार लिखित कादंबरीचे द्वितीय प्रकाशनही येथे करण्यात आले.

मराठी माणसांचा टक्का जिथे नजरेत भरावा इतका आहे, आपल्या कर्तृत्वाने ज्यांनी बे एरियात आपली मोहोर उमटवली आहे, अशा सॅन होजेच्या नगरीत, २६ ते ३० जून २०२४ या कालावधीत झालेल्या अधिवेशनाला तब्बल सहा हजारांपेक्षा जास्त लोकांनी नोंदणी केली होती. सुवर्णभूमी कॅलिफोर्नियात बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या अधिवेशनाची लगबग जवळजवळ दोन वर्षे सुरू होती. तिथल्या मंडळींनी घेतलेली मेहनत अत्यंत

मोहक रूपात आकाराला आली आणि अमेरिकेतील सिलिकॉन व्हॅली मराठमय होऊन गेली.

मंडळाचे अध्यक्ष संदीप दीक्षित आणि समन्वयक प्रकाश भालेराव यांच्या पुढाकारातून हे संमेलन साकारत असताना तिथे रुजलेल्या व नव्याने रुजू पाहणाऱ्या मराठी तरुणांचा त्यातला सहभाग लक्षणीय होता. बे एरियात होणारे हे संमेलन भव्य तर होतेच शिवाय नव्या तंत्रज्ञानाचा नेमका उपयोग करून त्याबद्दलचे कुतूहल सर्वदूर पोहोचवणारे आणि त्यायोगे मराठी भाषकांना जोडणारे असे वैशिष्ट्यपूर्ण होते. लहान मुलांचा मोठ्या संख्येने असलेला सहभाग ही बाब विशेष सुखावणारी होती.

कार्यक्रमांची सुरुवात ही 'उत्तररंग' या कार्यक्रमाने झाली हा तसा विरोधाभास! परंतु हा भावनेला साद घालणारा, ज्येष्ठांबद्दल विचार करणारा कार्यक्रम इथे आलेल्या पहिल्या, दुसऱ्या पिढीतील मंडळीच्या उत्तर आयुष्याच्या प्रश्नांवर चर्चाविनिमय करणारा महत्त्वाचा कार्यक्रम होता.

मराठी उद्यमशीलतेला बळ देणारा 'बी कनेक्ट' हा कार्यक्रम इथे रुजू पाहणाऱ्या मराठी व्यवसायिकांना साहाय्यकारी ठरणारा कार्यक्रम होता, तर शॉर्ट फिल्म फेस्टिव्हल कलाक्षेत्रात पाय रोवू पाहणाऱ्यांना उत्तेजन देणारा ठरले. शाळा आणि जागतिक मराठी संस्था असे उद्बोधक विषय समाविष्ट केलेल्या या अधिवेशनात पहिल्यांदाच एकांकिका स्पर्धा घेतल्या गेल्या. उद्घाटनाच्या पूर्वसंध्येला सारेगममधून मनामनात पोचलेल्या गायकांचे सूर मराठी गीतांचा गोडवा घेऊन आले.

'काय बे' अशी आपुलकीची साद घालणाऱ्या, बे एरियात घडणाऱ्या या संमेलनाचे बोधचिन्ह आणि त्याची कॅलिग्राफी म्हणजेच 'काय बे' हे बोधचिन्ह अच्युत पालव यांच्या संकल्पनेतून साकारले होते.

लहान मुलांसाठी या संमेलनात खूप स्पर्धा आणि सादरीकरणाचे विविध आविष्कार आयोजित केले होते. अशाच एका कार्यक्रमात विंदां करंदीकर यांची पणती, अन्वयी काळे हिने सादर केलेली 'परी ग परी' ही कविता भाव खाऊन गेली. ती मंचावर आली आणि म्हणाली, मी तुम्हाला मराठी कविता ऐकवते. कोणाच्या आहेत माहीत आहे का? माझे पणजोबा विंदा करंदीकर यांच्या! उपस्थितांना हा सुखद धक्का होता. तिच्या थोड्याशा अमेरिकन लहेजातून सादर झालेल्या 'परी ग परी', 'स्वप्नात पाहिली राणीचा बाग' अशा कविता ऐकताना छान वाटत होते. अमेरिकेतल्या ठिकठिकाणांहून आलेल्या शालेय मुलांनी मराठी लावणी, भारुड, ऐतिहासिक प्रवेश असे एकापेक्षा एक सुंदर कार्यक्रम सादर करून रसिकांची वाहवा मिळवली. याशिवाय 'जाणता राजा' या भव्यदिव्य कार्यक्रमाचे सादरीकरण करून छत्रपती शिवाजीमहाराजांविषयी मुलांनी आदर व प्रेम व्यक्त केले. या लहान मुलांनी सादर केलेल्या सगळ्या कार्यक्रमांचे श्रेय जाते ते तिथे दर शनिवारी आणि रविवारी भरणाऱ्या मराठी शाळांना. २००९मध्ये फिलाडेल्फिया इथे भरलेल्या बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या अधिवेशनात अमेरिकेत मराठी शाळा सुरू करण्याचा प्रस्ताव मांडला गेला. आणि बीएमएमच्या पुढाकाराने त्यावेळी एकाच वेळी वेगवेगळ्या राज्यांत सात शाळा सुरू झाल्या. पहिली शाळा सुनंदाताई टुमणे, विजया नाबर, अस्मिता जोग यांच्या पुढाकाराने सुरू झाली. भारतीय सण, परंपरा, रुढी मुलांना कळाव्यात, भारतातील नातेवाईकांशी मराठीतून मुलांना संवाद साधता यावा या उद्दिष्टाने सुरू झालेल्या या शाळांनी आज इतकी प्रगती केली आहे की भारती विद्यापीठाची पुस्तके अभासक्रमात लावली आहेत. आणि आता महाराष्ट्र शासनाशी २०२३मध्ये केलेल्या करारानुसार २०२४पासून बालभारतीची पुस्तके अभ्यासक्रमात लागतील. ऑगस्ट २०२२ मध्ये बीएमएम मराठी अधिवेशनानंतर, संदीप दीक्षित यांच्या अध्यक्षतेखाली, नव्या, ताज्या दमाच्या समितीने, सिएटल मराठी मंडळाच्या अध्यक्षा, बीएमएम कार्यकारिणीच्या सदस्या सविता मोरे यांच्या नेतृत्वाचा लाभ घेत, शाळा उपक्रमाची जबाबदारी स्वीकारली. लगेचच, अनेक कामे समितीने हाती घेतली. सर्वप्रथम, गतवर्षीच्या परीक्षांची प्रमाणपत्रके प्रत्येक विद्यार्थ्याला वितरण करण्याचे महत्त्वाचे काम वेगाने केले गेले. तसेच विविध कामे करण्यासाठी उपसमित्या आणि स्वयंसेवक गट तयार केले गेले. शाळा-समितीमध्ये नॉर्थ अमेरिकेतील १४ पेक्षा अधिक राज्यातील स्वयंसेवक समाविष्ट आहेत. समितीतील कार्यकर्ते राहुल देशमुख, श्रुती पांडे, मयूरी नाईक, मीनल जोशी, अंजली भिडे, पूनम शिरवळकर, अपर्णा तेलंग ह्या सर्वांचा बीएमएम शाळा उपक्रमात मोलाचा वाटा आहे. प्रत्येक महिन्यात शाळा समितीने उपक्रम आयोजित केले. बीएमएम तर्फे सुरू केलेले शाळा कथा पॉडकास्ट मुलांसाठी आणि मोठ्यांसाठी आहे. अमेरिका, ऑस्ट्रेलिया, डेन्मार्क, यूके आणि कॅनडा या देशांत बीएमएमतर्फे ८५ शाळा कार्यरत आहेत. अभ्यासाबरोबर खेळ, योगासने, श्लोकपठण इत्यादी बाबी आवर्जून शिकवल्या जातात. याच कष्टाचे फळ सॅन होजे येथील अधिवेशनात बघायला मिळाले.

बीएमएममध्ये २६ तारखेच्या कार्यक्रमांची सुरुवात एकाच वेळी वेगवेगळ्या दालनांत झाली. त्यातल्या 'बी कनेक्ट' या कार्यक्रमाचे उद्घाटन पुण्याच्या रुबी हॉल क्लिनिकचे चेअरमन डॉ. ग्रँट परवेझ यांच्या हस्ते आणि संमेलनाचे अध्यक्ष संदीप दीक्षित व समन्वयक प्रकाश भालेराव यांच्या उपस्थितीत पार पडले. उद्यमींच्या व्यवसायवाढीसाठी चर्चा यावेळी झाली. पुणे एमआयटीचे प्रमुख डॉ. रमेश रासकर आणि पुण्याच्याच भारत विकास ग्रूपचे संस्थापक हणमंतराव गायकवाड यांनी आपले विचार मांडले.

यातला दुसरा विषय होता रिअल इस्टेट इनव्हेस्टमेंट्स अँड वेल्थ जनरेशन. संजय काळके, डॉ. बालाजी आगलावे आणि रघु रेड्डी या तीन वक्त्यांनी उद्बोधन केले. 'पर्सिस्टंट' या विख्यात आयटी कंपनीचे संस्थापक अध्यक्ष आनंद देशपांडे

हेही या कार्यक्रमाला उपस्थित होते. ते या उपक्रमाचे प्रायोजक होते. त्याचबरोबर ३०० जणांची सिंगापूर इथे स्टार्टअप कंपनी सुरू करणारे वैभव दाभडेही या कार्यक्रमासाठी उपस्थित होते.

लहान मुलांसाठी महेश काळे यांनी 'शाळा' या खास सत्राअंतर्गत कार्यशाळा घेतली, ज्यात मुलांबरोबर पालकांनीही सामूहिक गायनाचा आनंद घेतला. गाणे गाताना श्वास कसा टिकवायचा, चित्त कसे स्थिर ठेवायचे, असे गहन प्रश्न विचारून चिमुकल्यांनी महेश काळे यांच्याशी संवाद साधला.

याच अधिवेशनात यंदा १० मिनिटांची शॉर्ट फिल्म बनवण्याची स्पर्धा आयोजित केली होती. ज्यात एकूण १७ प्रवेशिका आल्या. स्थानिक तरुणांनीच नव्हे तर वयस्कर मंडळींनीही या स्पर्धेत सहभाग नोंदवला. मराठीचे, मराठी संस्कृतीचे महत्त्व, पौगंडावस्थेतील मुलांच्या समस्या अशा विविध विषयांवर फिल्म सादर केल्या गेल्या. मीना नेरुरकर यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. यातील पहिल्या तीन फिल्मना अनुक्रमे ३०००, २०००, १००० डॉलर अशी रोख पारितोषिके समारोपाच्या कार्यक्रमात दिली गेली.

एकांकिका स्पर्धा हे यंदाच्या अधिवेशनाचे आणखी एक आकर्षण. ४० प्रवेशिकांची नोंदणी करून अमेरिकन मराठी माणसांनी या स्पर्धेला उदंड प्रतिसाद दिला. त्यापैकी १५ एकांकिकांची निवड होऊन पहिल्या तीन एकांकिकांना प्रेक्षकांसमोर सादर करण्याची संधी समारोपाच्या सत्रात दिली गेली.

संमेलनात एक दिवस वृद्धांचा होता. 'उत्तररंग' हे शीर्षकच वृद्धांच्या जीवनाशी निगडित असल्याचे ध्वनित होत होते. त्यानुसार 'उभ्या उभ्या विनोद'मध्ये साठीपुढच्या वयस्कर मंडळीनी विनोदी स्टँडअप कॉमेडी सादर केली. 'हूं अभी मैं जवान' म्हणत चक्क रॅम्प वॉक केला! 'साठावं वरीस मोक्याचं' असे विडंबन काव्य सादर करत नृत्यानुभव सादर केला. उपक्रमाचे बीजभाषण अपर्णा वेलणकर यांनी केले. भारतीय आणि परदेशी वृद्धांची जीवनशैली, त्यांच्या अपेक्षित, समस्या यांचा तुलनात्मक ऊहापोह त्यांनी केला. ओरलँडोचे गॅस्ट्रो एंडोलॉजिस्ट डॉ. मंगेश शुक्ल यांनी वृद्धांमधील सांधेदुखी, बद्धकोष्टता, पोटात होणारे गॅस, ॲसिडिटी, अर्थरायटिस अशा समस्यांवर प्रेझेंटेशन करून उद्बोधक मार्गदर्शन केले. 'रुपेरी चाल'मध्ये ज्येष्ठ मंडळीनी १९५० ते आज सिनेसृष्टीत झालेले फॅशनबदल सुंदर पद्धतीने सादर केले. भाग्यश्री बारलिंगे, डॉ. प्राची साठे, डॉ. परेश काळे यांनी भारतातही सुरू झालेल्या आधुनिक वैद्यकीय व्यवस्था आणि सुविधांची माहिती देऊन, आपणही आधुनिक देशांच्या तुलनेत कसे मागे नाही हे मांडले. अमेरिकेत प्रकाशित होणाऱ्या 'उत्तरकोश' या अंकाबद्दल शैला कांबळे या संपादकांनी माहिती दिली. एकूणच ज्येष्ठ मंडळींचा संमेलानातला सहभाग चांगला होता.

'सर्वात जास्त मराठी कुटुंबं भारताबाहेर ज्या प्रांतात राहतात त्या बे एरियात २५ वर्षांनंतर पुन्हा बृहन्महाराष्ट्र मंडळाचे अधिवेशन संपन्न होत आहे याविषयी आनंद व्यक्त करून, 'सरस्वती आणि लक्ष्मी जिथे एकत्र नांदतात तो बे एरिया भारतातील लग्नाळू मुलांच्या आईवडिलांची पहिली पसंती असते', असा उल्लेख आपल्या खुमासदार स्वागतपर भाषणात प्रकाश भालेराव यांनी केला आणि कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल संतोष व्यक्त केला.

गोल्डन गेटच्या पार्श्वभूमीवर, दिमाखदार भव्यदिव्य व्यासपीठावर बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या एकविसाव्या संमेलनाचे उद्घाटन झाले. अध्यक्ष संदीप दीक्षित, समन्वयक प्रकाश भालेराव, विश्वस्त मंडळाचे प्रमुख मोहित चिटणीस, कार्यकारी मंडळाचे सचिव अजित नातू, खजिनदार राजन पेडणेकर, विनायक फडणवीस सहसमन्वयक अजय पटवर्धन मंगेश जोशी यांच्या उपस्थितीत हा सोहळा पार पाडला.

कार्यक्रमाची सुरुवात भारताच्या, कॅनडाच्या, आणि अमेरिकेच्या राष्ट्रगीतांनी झाली. ही राष्ट्रगीते महेश काळे स्कूल ऑफ म्युझिक या संस्थेच्या विद्यार्थ्यांनी सादर केली. भारताच्या नव्या केंद्रीय मंत्रिमंडळात पुन्हा तेच खाते मिळालेले नितीन गडकरी यांनी पाठवलेली शुभेच्छांची ध्वनिफीत याप्रसंगी दाखवण्यात आली.

स्मरणिका टीमच्या प्रमुख अश्विनी कंठी यांनी संपादित केलेल्या स्मरणिकेचे प्रकाशन प्रकाश भालेराव यांनी केले. सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्ते यांचा सत्कार यानिमित्ताने करण्यात आला.

क्षणात बदलणारे रंगमंचीय सेट, विस्तीर्ण डिजिटल पडद्यावर अवतरेली मुंबापुरी, दादरचे गजबजलेले रस्ते, फेरीवाले, वीर हुतात्मा भाई कोतवाल उद्यान, दादर सार्वजनिक वाचनालय आणि या पार्श्वभूमीवर नृत्याविष्कार, संवाद, नाट्य, यांचा सुरेख संगम 'ड्रिम्स अनलिमिटेड' या अनोख्या कार्यक्रमात साकार झाला.

'एखादा सूर असा यावा, क्षितिजाचा पार दिसावा, एखादी सर अशी बरसावी, सारी तृष्णा मिटून जावी..' हीच अनुभूती सॅन होजेने अनुभवली. पंडित संजीव अभ्यंकर आणि विदुषी अश्विनी भिडे-देशपांडे यांच्या सुरांनी बे एरिया सूरमय झाला.

बीएमएमच्या इतिहासात पहिल्यांदाच नृत्यस्पर्धेचे आयोजन केले होते. यात शास्त्रीय नृत्य, लोकनृत्य आणि इतर नृत्याविष्कार सादर करण्यात आले. तब्बल ५० प्रवेशिका आलेल्या या स्पर्धेला अमेरिकास्थित तरुणांचा उदंड प्रतिसाद मिळाला. यासाठी सुप्रिया पुराणिक, राधिका अधिकारी आणि तृप्ती भालेराव यांनी परीक्षक म्हणून जबाबदारी पार पाडली.

'संगीत ययाती आणि देवयानी' या रंगमंचीय आविष्कारालाही रसिकांनी भरभरून प्रतिसाद दिला तर संकेत बक्षी यांच्या संकल्पनेतून गीतरामायणातील गाण्यांवर साकार झालेल्या मलखांब सादरीकरणात शिकागो, न्यू जर्सीतून

आलेल्या १६ मुलांनी चपळाईने कसरती करत अवघ्या सभागृहाचे मन जिंकून घेतले.

'बाई श्रावणाचा रंग मला झेपेना' म्हणत तब्बल ९० मिनिटे लावणी सादर करण्याची मधुरा गोखले यांची संकल्पना कोरिओग्राफीच्या माध्यमातून प्रत्यक्षात साकार झाली आणि दिपाली विचारे यांच्या नृत्यदिग्दर्शनात लावणी नृत्यांगनांबरोबर अवघ्या सभागृहाचेही पाय थिरकायला लागले.

कार्यक्रमाचे आणखी एक आकर्षण म्हणजे अपर्णा वेलणकर आणि आनंद इंगळे यांनी घेतलेली राज ठाकरे यांची मुलाखत. इथे खरी लोकशाही आहे असे म्हणणाऱ्या राज ठाकरे यांची उत्तरे आणि प्रेक्षकांची मिळणारी दाद यामुळे उत्तरोत्तर ही मुलाखत रंगत गेली. पाण्यापासून टॉयलेट पेपरपर्यंतचा अमेरिकेतील मराठी माणसाने केलेल्या प्रवासाचे कौतुक करत परक्या प्रदेशात पाळेमुळे रोवणे सोपे नसते हे राज ठाकरे जाणीवपूर्वक नमूद केले. कोकणचा कॅलिफोर्निया करणे शक्य झाला नाही त्यामुळे कोकणी माणूस कॅलिफोर्नियात आला असे सांगून त्यांनी अमेरिकास्थित मराठी माणसांना महत्त्वाचा सल्ला दिला, की नुसती आर्थिक मदत भारतीयांना करण्यापेक्षा नवनवीन कल्पना राबवून भारतात अमेरिका आणण्याचा प्रयत्न करा.

राहुल देशपांडे आणि प्रियांका बर्वे यांच्या गायनाने कार्यक्रमाचे तृतीय पुष्प संपन्न झाले. 'रामधनु' या कार्यक्रमात अर्चना जोगळेकर यांनी कथक आणि बॅले यांचे फ्युजन करून रामयणाची कथा सादर केली. धनश्री लेले यांनी वेदांपासून सांगितलेल्या हिंदू धर्माच्या व्याख्या ते सावरकरांनी उलगडलेला हिंदू धर्म याविषयीचे अत्यंत अभ्यासपूर्ण विवेचन मांडले आणि धर्माकडे बघण्याची वेगळी दृष्टी सभागृहाला प्रदान केली.

पाश्चिमात्य संगीताची भुरळ अख्ख्या जगाला पडलेली असताना भारतीय अभिजात संगीताचे, सुगम संगीताचे भविष्य काय असू शकते या प्रश्नाचे उत्तर दिले ते बे एरियातील सुगम संगीत आणि शास्त्रीय संगीताची परंपरा जिवंत ठेवणाऱ्या ९ ते १४ वयोगटातील मुलांनी. 'घननिळा लडिवाळा, झुलवू नको हिंदोळा', 'प्रिये पाहा रात्रीचा समय सरूनी', 'बाई बाई मनमोराचा कसा पिसारा फुलला' अशी गाणी सादर करणाऱ्या मुलांचे वय हा मुद्दा गौण ठरला. Born and brought up in Amerika असलेल्या मुलांनी तेवढ्याच ताकदीने या अजरामर गीतांना न्याय दिला.

मीना नेरूरकर यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या 'प्रभात सिनेदर्शन' या कार्यक्रमात मराठी चित्रपटइतिहास अत्यंत रंजकतेने उलगडला गेला. प्रभातच्या 'अयोध्येचा राजा' या चित्रपटापासून सुरुवात झाली आणि 'धर्मात्मा' चित्रपटात बालगंधर्वांनी साकारलेले संत एकनाथ साक्षात रंगमंचावर सादर झाले. रंगलेला हा कार्यक्रम प्रेक्षकांची दाद मिळवून गेला.

'राम मंदिर ते राष्ट्र मंदिर' या कार्यक्रमात गुरू गोविंद गिरी महाराज यांनी अमेरिकास्थित भारतीयांना संबोधित करताना विचार मांडला, की 'भारताच्या बाहेर कुठेही राहा पण भारताशी जोडलेली नाळ कधी तुटता कामा नये.'

किरण पुरंदरे यांनी सादर केलेल्या 'जंगल ट्रॅव्हलव्लॉग' या कार्यक्रमात पावशा, भारद्वाज, सिबिया या विविध पक्ष्यांचे आवाज काढत त्यांनी साक्षात जंगलच मंचावर आणले.

मुंगीलाही आत शिरायला जागा नाही अशा भारलेल्या गर्दीत, शरद पोंक्षे यांनी नेहमीप्रमाणे देशभक्ती, देशाभिमान जागृत करणारे स्फूर्तिदायक व्याख्यान दिले. इतर देशांची शौर्यगाथा, युद्ध शिकवण्यापेक्षा आपल्या देशातील इतिहास अभ्यासक्रमात सखोलपणे का शिकवत नाहीत ही खंत त्यांनी व्यक्त केली. भारतातील तीन महान व्यक्ती म्हणजे संत ज्ञानेश्वर, छत्रपती शिवाजीमहाराज आणि स्वातंत्र्यवीर सावरकर असा उल्लेख करून त्यांनी या तिघांचे राष्ट्रउभारणीच्या कामात असलेले महत्त्व विषद केले.

'जगायला शिका, त्यासाठी स्वतःवर प्रेम करा. गीता ही जगायला शिकवते, मरायला नाही. त्यामुळे मरण्यापूर्वी मरू नका. इतरांना जरूर मदत करा पण त्यासाठी स्वतःला तंदुरुस्त ठेवा. स्वतःविषयी विचार करणे म्हणजे स्वार्थ नाही,' हे विचार मांडले 'सातासमुद्रापार अध्यात्म आणि बुद्धिवाद' या कार्यक्रमात गौर गोपालदास यांनी.

सामाजिक काम करणाऱ्या संस्थांना या संमेलनात सन्मानित करण्यात आले. यात विशेष उल्लेखनीय काम करणारी संस्था म्हणजे 'स्नेहवन'. हातची मोठ्या पगाराची नोकरी सोडून आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या शंभरपेक्षा जास्त मुलांचे पालकत्व स्वीकारलेल्या अशोक देशमाने यांच्या स्नेहवन या संस्थेचा विशेष सत्कार करण्यात आला.

'ज्योतिष्यावर बोलू काही-' या कार्यक्रमात संदीप अवचट यांनी बारा राशींचे बारा स्वभाव असलेली माणसे आणि ते आपल्या राशीप्रमाणे एकमेकांशी वागतात म्हणून त्यातून होणाऱ्या गमतीजमती विनोदी पद्धतीने सांगितल्या. या कार्यक्रमाला प्रेक्षकांची तुफान गर्दी झाली होती. सभागृहात हास्याची कारंजी उसळत होती. प्रत्येक जण आपली रास पडताळून पाहत होता.

'भाडिपा' या कार्यक्रमात प्रेक्षकांच्या आवडत्या सारंग साठेने पुन्हा एकदा आपल्या नर्मविनोदी शैलीने, राजकीय परिस्थिती, समाजातल्या समस्या यावर भाष्य करत चिमटे काढले. हशा आणि टाळ्या वसूल केल्या.

'प्रिय भाई, एक कविता हवी आहे' हा कार्यक्रम प्रचंड गर्दीत सुरू झाला. प्रत्येक कवितेला आणि पुल-सुनीताबाईंमधल्या हळव्या क्षणांना प्रेक्षकांनी टाळ्यांची दाद दिली. जगणे आणि जिवंत राहणे यातला फरक उलगडून सांगणारा कार्यक्रम प्रेक्षकांच्या काळजाला हात घालणारा ठरला आणि रसिकांनी उभे राहून अमित वझे, अंजली मराठे, मानसी वझे, मुक्ता बर्वे, निनाद, जयदीप यांना मानवंदना दिली.

विलक्षण ऊर्जेने भारलेली, संगीतमय संध्याकाळ अजय–अतुल यांनी रसिकांना बहाल केली, रसिकांचा ‘जीव रंगला, दंगला’ अशी अवस्था करणारा हा कार्यक्रम सादर झाला आणि अजय–अतुल यांनी आपल्या तालावर सॅन होजेला ठेका धरायला लावला. मराठी कलावंतांवर, त्यांच्या कलेवर तुफान प्रेम करणाऱ्या मराठी माणसांनी या कार्यक्रमाला दिलेली तुफान दाद सुखावह होती.

‘वानखेडे की ओव्हल?’

‘अर्थात वानखेडे.’

‘मुंबई की कानपूर?’

‘क्रिकेट खेळायचे असेल तर मुंबई आणि लाईन मारायची असेल तर कानपूर’ अशी मिश्किल उत्तरे सुनील गावसकर यांनी भरगच्च सभागृहातील मुलाखतीत दिली.

सुरुवातीच्या दिवसांतल्या उमेदवारी करतानाच्या आपल्या आठवणी जागवताना सुनील गावसकर म्हणाले, ‘एकनाथ सोलकर आणि दिलीप सरदेसाई यांनी वेस्ट इंडिजच्या विरुद्ध खेळताना केलेली भागीदारी पाहून फास्ट बॉलला कसे सामोरे जायचे ते शिकलो. त्यावेळचे उम्रीगर (ज्यांना आम्ही उम्रीकर केले!), विजय मर्चंट, रमाकांत देसाई असे दिग्गज खेळाडू आपापसात गप्पा मारताना एकमेकांची मस्करी करायचे, पण त्याचबरोबर एकमेकांच्या खेळातील गुणदोषांवरदेखील चर्चा करायचे. या गप्पांमधूनही खूप शिकायला मिळाले. राखीव खेळाडू असताना सीनियरच्या पायातील पॅडसुद्धा आम्ही ज्युनियर काढायचो. त्यात कुठेही कमीपणा वाटला नाही, तर त्यांची एनर्जी या फुटकळ कामात वाया जाता कामा नये ही भावना असायची.

‘एका सामन्यात चेंडू बदलायचा होता. दिलीप सरदेसाई यांनी सांगितल्यानुसार गॅरी सोबर्सना दिलेला नवा चेंडू एकनाथ सोलकरने बघायला मागितला तेव्हा त्याने सोबर्स यांनी म्हटले, तुला काय फरक पडतो. तसेही तुम्हाला चेंडू सोडायचेच आहेत. त्याला प्रत्युत्तर म्हणून मग सोलकरांनीसुद्धा ‘you play your game bloody, I will play my game bloody’ असे खणखणीत उत्तर दिले. साक्षात सोबर्सना दिलेले उत्तर आम्हाला कॉन्फिडन्स देऊन गेले’ असा अनुभव सुनील गावसकर यांनी कथन केला.

‘इतक्या जबरदस्त गोलंदाजांना तुम्ही कसे काय रीड करायचा?’ या प्रश्नाला उत्तर देताना ते म्हणाले, ‘हा काय प्रश्न आहे? दहा हजार रन केल्या तर त्यात आलं ना हे सगळं!’

‘आडनावात ‘कर’ असलेले सगळे तुम्ही ग्रेट कसे आहात?’ गावसकर म्हणाले, ‘कर’ आहे ना, मग करायलाच पाहिजे.’ इथे यूएसच्या टीममध्येपण एक ‘कर’ आहे. त्याने रोहित आणि विराट या दिग्गज फलंदाजांच्या विकेट वर्ल्ड कपमध्ये काढल्या, असे हजरजबाबी उत्तर दिले आणि रसिकांनी टाळ्यांचा कडकडाट केला. मंगेश जोशी यांनी घेतलेल्या अशा या मुलाखतीत विशेष बहार आणली ती सुनील गावसकर यांनी केलेल्या दिग्गज कॉमेंटेटर आणि खेळाडू यांच्या नकलांनी.

मुक्ता बर्वे हिचे भावमधुर निवेदन, आसमंतात घुमणारे महेश काळे यांचे सूर, जोडीला अच्युत पालव यांची कॅलिग्राफी आणि भगवान रामपुरे यांची शिल्पकला असा तिहेरी संगम संमेलनाच्या समारोपाच्या दिवशी घडून आला आणि विविध कलांचा एकत्र संगम झाला की रसांचा परिपोष किती परिपूर्ण होऊ शकतो याचा साक्षात प्रत्यय अमेरिकास्थित मराठी जनांनी घेतला.

संमेलनाच्या प्रसिद्धी टीममधील उत्साही समन्वयक अभिजित मराठे यांनी ग्रंथालीची पुस्तके तिथे घडणाऱ्या कार्यक्रमांत भेट म्हणून देण्यासाठी विकत घेतली. इतकेच नव्हे तर संमेलनानंतरच्या दिवशी ग्रंथाली परिवारासाठी खास अमेरिकन संस्कृतीची अनुभूती देण्यासाठी अमेरिकेच्या प्रसिद्ध कॅस्ट्रो स्ट्रीट, माऊंटन व्ह्यू या एरियात स्नेहभोजन आयोजित केले. त्यांच्या घरी घेतलेल्या कॉफीची चव आणि जोडीला त्यांच्या मुलीचे गिटार वाजवत तिने ऐकवलेले सुरेल संगीत अजूनही कानात रुंजी घालतेय.


घराची आठवणसुद्धा येऊ नये इतक्या घरगुती वातावरणाचा अनुभव मिळाला तो दीपाली गांगल–पटवर्धन यांच्या घरी. ग्रंथालीचे संस्थापक–सदस्य दिनकर गांगल यांची कन्या दीपाली, जावई मिलिंद, कन्या रिचा, नातू रिषी यांच्याबरोबर काही दिवस वास्तव्य करणे म्हणजे खऱ्या अर्थाने अमेरिकन लोकजीवन समजून घेण्याचा अनुभव होता. ग्रंथालीची पुस्तके राहत्या व्हिलापासून संमेलनापर्यंत वाहून नेण्यास मदत करणारे संजय साळुंखे यांची मदत मोलाची होती. या सगळ्यांच्या ऋणात राहणेच ग्रंथाली परिवाराला आवडेल.

एकूणच संमेलनकाळात नाश्त्यापासून भोजनापर्यंत क्षुधाशांतीची उत्कृष्ट व्यवस्था केली होती, हे नमूद करायला हवे.

महाराष्ट्राच्या हातून मराठीपण निसटून जात असताना हा निसटणारा धागा घट्टपणे धरून ठेवण्याचे काम करताहेत अमेरिकास्थित मराठी माणसे. संगीत, इतिहास, नाट्य, नृत्य, साहित्य या सगळ्याच कलांना पुढच्या पिढीपर्यंत घेऊन जाणारे हे मराठीजन, मराठी संस्कृती टिकवण्यासाठी घेत असलेली मेहनत पाहिली की मराठीचा झेंडा डौलाने फडकवणाऱ्या अमेरिकास्थित मराठी जनांचे कौतुक करावे तेवढे थोडेच आहे. या संमेलनात केवळ महाराष्ट्रातून कलावंत येऊन आपली कला सादर करून गेले असे स्वरूप नव्हते तर स्थानिक मराठी कलावंतांनीसुद्धा तेवढ्याच ताकदीने आपले कलाविष्कार सादर केले आणि मराठी माणूस जगाच्या पाठवर कुठेही गेला तरी कलेवरील त्याचे प्रेम आणि मराठीपण सोडत नाही हे सिद्ध केले.

**– प्रा. डॉ लतिका भानुशाली**

Bhanushali.latika@gmail.com



# सुनीति जैन
# एक संयमित मनस्विनी

**प्रदीप चंपानेरकर**

''आयुष्याच्या पंचेचाळिशीत कोणाशी घट्ट मैत्री होणं तसं कठीण. परंतु एखाद्या कुटुंबाशी जमून जातं. त्याला एक निश्चित कारण असतंच असं नाही, पण कुठेतरी 'वेव्ह-लेंग्थ' जमून जाते, ती तुझ्याशी जमून गेली.'' असं आमच्यातील नात्याविषयी सुनीति नेहमी म्हणायची.

सुरुवातीला अशोक जैन याच्याशी ओळख, तो महाराष्ट्र टाइम्सचा कार्यकारी संपादक आणि मी प्रकाशक अशी. पुढे लालबहादूर शास्त्री पुस्तकाच्या अनुवादाच्या निमित्ताने आमच्यात मैत्र निर्माण झालं. घरी जाणं-येणं सुरू झालं. मग त्याची पत्नी सुनीतिशी छान ओळख झाली. अशोकही आमच्या घरी येत असे. माझी पत्नी सुजाताबरोबर त्याचेही छान सूर जुळले... आणि मग अशा तऱ्हेनं त्वरितच दोन कुटुंबांत सुदृढ, जीवाभावाचं, विश्वासाचं दृढ नातं निर्माण होत गेलं... आणि ते शेवटपर्यंत टिकलं... दरम्यान या नात्याला अनेक कंगोरे प्राप्त होत गेले.

त्यातला एक कंगोरा म्हणजे, एक हक्काचं घर मानता येणं. अशोकच्या घरी मी केव्हाही, कोणत्याही प्रहरी जाऊ शकत असे. आता असा हक्क कोणा एकाशी नातं जमून प्राप्त होत नाही. 'बेटर हाफ'लाही आपल्याविषयी तेवढा जिव्हाळा वाटला तरच तो हक्क प्रस्थापित होतो. अशोकची 'बेटर हाफ' सुनीति हिच्याशी पहिल्या दोन भेटींत 'कसे आहात? चहा घेणार का?' अशा औपचारिक पातळीवर बोलणं व्हायचं. परंतु नंतर या औपचारिकतेतून आम्ही कधी बाहेर पडलो ते कळलंच नाही. अशोकशी तर मैत्री होतीच, पण अल्पावधीत सुनीतिशी छान, स्वतंत्र अशी मैत्री होत गेली. आणि मग अशोकचं घर माझ्यासाठी मुंबईतील हक्काचं घर झालं. कधीही जावं, राहावं, जेवायला मागावं किंवा हक्कानं ठरल्या वेळेपेक्षा उशिरा जावं... कधी जेवायला येतो सांगून आयत्या वेळी 'जेवून आलो' सांगावं... आणि मग सुनीतिचा खणखणीत पण प्रेमाचा ओरडा खाणं हे नित्यनेमाचं होत गेलं.



सुनीति जैन

सुनीति... एक स्वतंत्र बाण्याची, स्वतःचं व्यक्तिमत्त्व असलेली खमकी व्यक्ती. कुणाशी सूत जमलं तर सुतासारखी आणि एखादी व्यक्ती नाही पटली तर, त्याला ती भूत नाही वाटणार, पण आपल्याला तिनं चार हात दूर ठेवलं आहे हे त्या एखाद्याला जाणवणार इतका कोरडेपणा ती वागण्यात आणू शकत असे. तिच्या वागण्या-बोलण्यात एक प्रकारचा करारी भाव होता. मात्र व्यक्तिमत्त्वातली आर्द्रता, प्रसन्नता, मुळातला प्रेमळ स्वभाव हे कुठेही आणि कधीही लपायचं नाही. खरं तर, तो ओसंडून वाहायचा, पण तो एका छानशा हसण्यातून मर्यादित प्रमाणातच दिसायचा. कारण त्या स्वभावात जराही दिखाऊपणा नव्हता... एक मनस्वी, संयमित व्यक्तिमत्त्वच म्हणावं असं.

अशोक पत्रकारितेत उच्च पदावर आणि व्यक्तिमत्त्व दिलखुलास... तेव्हा ओळखी-पाळखी-दोस्ती उभ्या-

आडव्या... उच्चपदस्थांसोबत ऊठ-बस. परंतु सुनीतिला कधी यात मिरवावंसं वाटलं नाही, ना अशा प्रकारच्या 'सोशलायझेशन'चा आपण भाग असावं असं कधी वाटलं. उलटपक्षी अशा गोष्टींपासून ती चार हात दूरच राहिली. परंतु तरीही मी सांगतो, she was very much a social animal. लोकांच्यात राहायला, मिसळायला, जबाबदारीची नोकरी सांभाळूनही लोकांची घरी ऊठ-बस करायला तिला मनापासून आवडायचं. असे लोक जमवण्यात ती खूपच चोखंदळ होती. त्यात साध्यासुध्या जनसामान्यांपासून वैचारिक बैठक असलेल्या लोकांचा सहभाग असायचा. पैशाच्या श्रीमंतीचा दिमाख असो किंवा बुद्धिमत्तेच्या श्रीमंतीचा दंभ असो... अशा व्यक्तींशी तिनं कधी जमवून घेतलं नाही. तिचं मूळ व्यक्तिमत्त्व साधंसुधं म्हणूनच तिचं मुळातल्या साध्यासुध्या व्यक्तिमत्त्वांशी मेतकूट जमायचं, मग ती व्यक्ती कोणत्याही क्षेत्रातील किंवा कोणत्याही पदावरची असो.

ती एक कर्तबगार स्त्री होती. सचिवालयात डेप्युटी डायरेक्टर म्हणून जबाबदारी निभावता निभावता ती एक गृहकृत्यदक्ष गृहिणी म्हणूनही भूमिका बजावायची. पती अशोक चौदा वर्षं अर्धांगवायूनं आजारी होता. तेव्हा तिनं बजावलेली चतुरस्र भूमिका तर अवाक् करणारी होती.

सुनीतिच्या विचारांची मूस समाजवादी. मनानं ती एक उदारमतवादी व्यक्ती. मानवी मूल्यांवर तिची नितांत श्रद्धा होती. संकुचित वृत्तीचा तिला मनापासून तिटकारा होता. जात, धर्म अशा संकुचित संकल्पनेत ती कधीच अडकली नाही. या विषयावर आमची सतत चर्चा व्हायची. त्या बाबतीतली आमची मनं आम्ही एकमेकांसोबत मोकळी करत असू.

एक लेखक-अनुवादक आणि प्रकाशक असंही माझं तिच्याशी नातं होतं. अशोकच्या आजारपणात त्यानं माझ्यासाठी बरीच पुस्तकं अनुवादित केली. अशोकच्या हालचालींवर मर्यादा आल्यानं आपसूकपणे ती त्या अनुवादाच्या कामाशी जोडली गेली. अशोकला मदत करण्यात सक्रिय राहिली. त्यात अनेक पुस्तकांचा समावेश आहे. 'फॅन्टॅस्टिक फेलूदा' या मूळ सत्यजित राय लिखित वीस पुस्तकांची मालिका, 'व्योमकेश बक्षी रहस्यकथा' या मालिकेतील तीन पुस्तकं या व इतर काही पुस्तकांचा त्यात समावेश आहे. परंतु व्योमकेश बक्षी रहस्यकथांच्या चौथ्या भागाचा अनुवाद मात्र तिनं अशोकच्या निधनानंतर स्वतंत्ररीत्या साकारला. नंतर डॉ. प्रदीप तळवळकर लिखित 'मधुमेही खुशीत' व 'डायबेसिटी' ही मूळ इंग्रजी पुस्तकंही तिनं आमच्यासाठी अनुवादित केली. अनुवादातलं हे तिचं योगदान मोठंच. तरीही माझ्या मते, डॉ. रवी बापट लिखित 'वॉर्ड नंबर पाच, केईएम' या रोहन प्रकाशन प्रकाशित पुस्तकासाठी तिनं केलेलं योगदान जास्त महत्त्वाचं होय. डॉ. रवी बापट हे निष्णात सर्जन, एक नि:स्पृह डॉक्टर. त्यांचं वैद्यकीय क्षेत्रातलं योगदान तर मोठंच, तशीच त्यांची इतर क्षेत्रांतली मुशाफिरीही लक्षणीय होय. त्यांच्या व्यक्तिमत्त्वातच अनेक पैलू आहेत. आणि मुख्य म्हणजे वैद्यकीय क्षेत्रासंबंधी त्यांचे सामाजिक अंगानं जाणारे विचारही मोलाचे आहेत. तर अशा व्यक्तीकडून पुस्तक लिहून घेण्यासाठी तिनं जीवतोड मेहनत केली. पाठपुरावा केला. अनेक सूचना केल्या. इतकंच नव्हे, तर त्या पुस्तकाचं शब्दांकनही तिने केलं. हे पुस्तक जनसामान्य तसेच वैद्यकीय शिक्षण घेणारे विद्यार्थी सर्वांसाठीच एक महत्त्वाचं पुस्तक ठरलं.

अशोक-सुनीतिशी माझा तीस वर्षांचा संबंध. अशोकचं २०१४ साली निधन झालं, पण पुढे सुनीतिशी माझे मैत्रीपूर्ण संबंध कायम राहिले. शेवटची तीन-चार वर्षं सोडली तर, सुनीति मला नेहमीच एक उत्साही, कशालाही न डगमगणारी, रिसोर्सफुल, संकटांना सामोरं जाऊन भिडणारी व्यक्ती वाटली. शिस्तप्रिय पण त्यांचं अवडंबर न करणारी, कधी प्रेमळपणे दटावणारी... जे काही करणार ते शंभर टक्के देऊन आणि मनापासून करणारी व्यक्ती जाणवली. शेवटच्या तीन-चार वर्षांत मात्र तिला तब्येत सतत दगा देत राहिली. तरीही तिनं त्या अस्वास्थ्याला शांत चित्तानं, धीरानं तोंड दिलं. शेवटपर्यंत कर्तव्यदक्ष राहिली. तिच्या जाण्यानं एक धीरोदात्त व्यक्तिमत्त्व हरपलं आणि व्यक्तिशः माझ्या आयुष्यात आता अशोक आणि सुनीति नसणं म्हणजे मोठी पोकळी निर्माण होणं, असं म्हटलं तर ती अतिशयोक्ती ठरू नये.

**– प्रदीप चंपानेरकर**
pradeep.champanerkar@gmail.com

ग्रंथाली




गावाकडच्या गोष्टी

मूल्य २५० रुपये
सवलतीत १५० रुपये



# औपचारिक शिक्षणाला पर्याय अनवट वाटेचा शिक्षणानुभव

डॉ. अंजली पटवर्धन-कुलकर्णी

प्राचीन काळातली गोष्ट आहे. एका आश्रमात एक गुरू आपल्या शिष्यांसोबत राहत होते. एकदा त्यांच्या एका शिष्याने जंगलातून पोपट पकडून आणला. त्याने मोठ्या प्रेमाने आणि कौतुकाने तो पोपट सगळ्यांना दाखवला.पोपटाला पिंजऱ्यात ठेवून त्याची देखभाल करायला लागला. गुरूंना त्याचे वागणे रुचले नाही म्हणून त्यांनी शिष्याला तो पोपट पुन्हा जंगलात सोडून देण्यास सांगितले. परंतु शिष्याने त्यांचे बोलणे मनावर न घेता पोपटाला स्वतःकडेच ठेवले. शिष्य तसा लहान असल्याने गुरूंनाही त्याचे मन मोडवेना. त्यांनी ठरवले की पोपटालाच स्वातंत्र्याचे महत्त्व पटवून देऊन त्याला मुक्त होण्यास प्रवृत्त करावे. म्हणून ते रोज पोपटाला शिकवू लागले. 'पिंजरा सोडून उडून जावे' असे गुरू शिकवत आणि पोपट अगदी सर्व शब्द न चुकता पाठ म्हणून दाखवत असे. एके दिवशी योगायोगाने पिंजऱ्याचे दार उघडे राहिले आणि पोपट पिंजऱ्या बाहेर आला. गुरूंना वाटले की आता पोपट जे म्हणतो आहे ते खरे करून दाखवणार. पोपट पिंजरा सोडून उडून जाणार. ते खूप अपेक्षेने पिंजऱ्याजवळ गेले. त्यांना येताना बघून पोपट निमूट पिंजऱ्यात परतला. आणि पुन्हा गुरूंनी शिकवल्याप्रमाणे म्हणत राहिला, 'पिंजरा सोडून उडून जावे'. गुरूंना पोपटाच्या वागण्याने अतीव खेद झाला. यांच्या लक्षात आले की पोपट फक्त शब्द शिकला, तो फक्त वटवट करू शकतो, शब्दांचा अर्थ पोपट शिकलाच नाही. त्यामुळे अपेक्षित कृती तो करूच शकत नाही. असेच काहीसे आपल्या विद्यार्थी-शिक्षक परस्परसहयोगाचे होत असते. शिक्षकाने विद्यार्थ्याला दिलेल्या ज्ञानाचा अर्थ जीवनात आत्मसात करत नाही तोपर्यंत ते ज्ञान व्यर्थ आहे.

शिक्षक शिकवताहेत पण विद्यार्थी शिकतोय का? हा फार महत्त्वाचा प्रश्न शिक्षकांना पडलेला असतो. विद्यार्थ्यांची अनुपस्थिती, विद्यार्थी शरीराने हजर असले तरी मनानेही वर्गात असणे हे खूप आवश्यक असते. इथे शिक्षकांना सामना करायचा असतो- एक तर सुट्टीसाठी केलेली भोलानाथाची आळवणी, किंवा कवी योगेश्वर अभ्यंकरांच्या शाळा सुटता क्षणी नवीन कोरी पाटी फुटण्यामागचा योगायोग, संध्याकाळी मैदानावर वाट पाहणाऱ्या सोबत्यांसोबत खेळायला जाऊ दे असा लाडिक हट्ट आणि श्यामची आई चित्रपटातील 'छम, छम, छम, छडी लागे छम, छम, विद्या येई घम घम' यातील कधीकाळी मास्तरांच्या हाती असलेली पण आता बाद झालेली छडीरूपी धाक आणि सत्ता!

शिक्षण ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे असे असले तरी सहसा औपचारिक शिक्षणाची सांगता पदवी, पदव्युत्तर शिक्षणानंतर होत असते. औपचारिक शिक्षणाची प्रक्रिया ही कोणत्यातरी ठरावीक टप्प्यावर संपणारी असते. 'Education is the passage to progress', हेही बहुतेकांना मान्य आहे. मात्र शिक्षण हे केवळ शाळा-महाविद्यालयांच्या भिंतींच्या आत घडते असे नसून शाळाबाह्य जगाच्या अनुभवातून, निरीक्षण, चिंतन, मनन यातूनही घडत असते. शिक्षण देण्याच्या पद्धतीवरून आपण ते औपचारिक, अनौपचारिक अथवा सहज शिक्षण असे प्रकार पाडत असतो. या पद्धतीतून शिक्षण हे वेगवेगळ्या वेळी अथवा एकाच वेळी घेणे शक्य आहे. औपचारिक शिक्षणाची पद्धत, त्याची वैशिष्ट्ये, शाळेत, महाविद्यालयात गेलेल्या सर्वांना परिचयाची आहेत. तसेच औपचारिक शिक्षणाच्या मर्यादाही लक्षात आलेल्या आहेत. त्यातील काही अशा आहेत.

१) औपचारिक शिक्षण पूर्ण करण्यासाठी विशिष्ट टप्पे, स्तर, कालमर्यादा अगदी पक्क्या ठरलेल्या असतात; ज्यात कोणतेही बदल होऊ शकत नाहीत. वर्गातली अध्यापनपद्धती, मूल्यमापन इत्यादी, सरासरी बुद्धिमत्ता असलेल्या विद्यार्थ्यांचा विचार करून ठरवली जाते. त्यामुळे, हुशार, बुद्धिमान, प्रतिभावंत विद्यार्थ्यांची कुचंबणा होते. त्यांना शिक्षण नीरस वाटू लागते पण त्यांना सुटकेचा कोणताच मार्ग नसतो. पुढच्या इयत्तेत जाण्यासाठी ते उत्सुक आणि सक्षम असूनही ठरवलेला कालावधी संपण्याची त्यांना वाट बघावी लागते. जे कमकुवत विद्यार्थी

असतात त्यांचीही शिकवलेले ज्ञान आत्मसात करताना दमछाक होते. या दोन्हीही घटकांचा औपचारिक शिक्षणाने फायदा होईलच असे नाही.

२) वर्गामध्ये, चांगल्या-वाईट - दोन्हीही प्रवृतींची मुले असल्याने, काही वेळा, अयोग्य संगतीमुळे चांगली मुले बिघडण्याची शक्यता असते.

३) औपचारिक शिक्षण घेणारे विद्यार्थी आणि देणारे शिक्षक यांचे प्रमाण व्यस्त असते. काही वेळा एका शिक्षकाच्या वर्गात १२० पेक्षाही जास्त विद्यार्थी असतात, शाळेमध्ये चार-चार वर्गांना एकाच वेळी शिकवणारे एकच शिक्षक असतात. अशा विषम परिस्थितीमुळे, विद्यार्थ्यांना शिक्षकाकडून मिळणारे मार्गदर्शन आणि प्रेरणा कमी पडते.

४) औपचारिक शिक्षणाचा खर्च अनेकांना परवडत नाही. तसेच, हे शिक्षण घेतल्यानंतर व्यवसाय अथवा नोकरीची हमी असतेच असे नाही. काही नामवंत शिक्षण संस्था कॅम्पस मुलाखती आयोजित करतात. परंतु शिक्षण पूर्ण करणारे विद्यार्थी आणि उपलब्ध नोकरी-व्यवसायाच्या संधी यांचेही प्रमाण व्यस्तच आहे. २३ मे २०२४च्या बिझिनेस स्टॅन्डर्डच्या बातमीनुसार २०२४मध्ये आयआयटीमधल्या ३८ टक्के विद्यार्थ्यांना म्हणजे ८००० विद्यार्थ्यांना नोकरी मिळालेली नाही. आतापर्यंतची त्यांची आकडेवारी सांगते की दरवर्षी जवळपास ९२ टक्के विद्यार्थ्यांना पदवीच्या शेवटच्या वर्षात राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरची प्लेसमेंट प्राप्त होत असे. ही आयआयटीसारख्या अग्रगण्य संस्थेतील विद्यार्थ्यांची परिस्थिती असेल तर इतर विद्यार्थ्यांचे बघायलाच नको.

औपचारिक शिक्षणाला काही पर्याय उपलब्ध आहेत. अनौपचारिक शिक्षण हे सहसा औपचारिक शिक्षणास पूरक म्हणून दिले जाते. विद्यार्थी आपल्या सोयीनुसार, समजण्याच्या वेगानुसार असे शिक्षण घेऊ शकतात. नोकरी, व्यवसाय, घरकाम सांभाळून दूरस्थ पद्धतीने, संगणकाच्या साहाय्याने असे शिक्षण घेणे शक्य असते. जी मूलभूत किंवा व्यावसायिक कौशल्ये औपचारिक शिक्षणातून घेणे शक्य होत नाही ती या अनौपचारिक शिक्षणातून प्राप्त करून घेता येतात. या शिक्षणाला वयाची, वेळेची अथवा अंतराची मर्यादा नसते. शिकण्या-शिकवण्याचा वेग, वेळ, अभ्यासक्रम, मूल्यमापन या सर्वातच लवचीकता असते. मात्र शिक्षकविद्यार्थी यांच्यामधील आंतरक्रिया फार कमी होत असते. यामध्ये स्वयंअध्ययनावर विशेष भर दिला जातो.

शालेय तसेच महाविद्यालयीन स्तरावरील विद्यार्थी प्रवेशाची सद्य:स्थिती ही शोचनीय आहे. अनेक शाळांमध्ये प्रवेशित विद्यार्थीसंख्या घटत चालली आहे हे आकडेवारीवरून सिद्ध होते. अगदी आरटीई खाली अर्ज करणाऱ्यांची संख्या यंदाच्या वर्षी ४४००० इतकीच होती, मागील वर्षात, २०२३ मध्ये हीच संख्या ३.६४ लाख इतकी होती.

शालेय अभ्यासक्रमाला होम स्कूलिंग, ऑनलाइन स्कूल, मायक्रो स्कूलिंग, अनस्कूलिंग, वाल्डोर्फ पद्धतीने शिक्षण, असे काही पर्याय उपलब्ध आहेत.

होम स्कूल आणि ऑनलाइन पद्धती : पाल्याला घरी राहूनच शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली जाते. या पद्धतीमध्ये संरचित शालेय अभ्यासक्रम व शैक्षणिक कॅलेंडरचा विचार न करता पाल्याला जे हवे आहे ते आवडीच्या विषयातील शिक्षण त्याच्या कुवतीनुसार दिले जाते. यामध्ये ऑनलाईन पद्धतीने शिक्षण, स्वतंत्र अभ्यासाचा पर्याय, मुक्त शिक्षण अशा अनेक माध्यमांतून शिक्षण दिले जाते. अशाप्रकारे अभ्यासक्रम आणि दिनक्रम लवचीक व पाल्यास अनुकूल बनवून त्यास दर्जेदार शैक्षणिक अनुभव देण्याचा प्रयत्न होतो. अपरंपरागत शिक्षण पद्धतीतून अतिरिक्त अभ्यासक्रम, प्रत्यक्ष अनुभवावर आधारित शिक्षण अशा काही वैशिष्ट्यांचा अंतर्भाव असतो. मात्र यामध्ये पालकांची जबाबदारी आणि सहभाग फार मोठ्या प्रमाणात वाढलेला असतो.

मायक्रो स्कूलिंग : होम स्कूलिंग आणि पारंपरिक शाळा यांच्यातील मध्यम मार्ग म्हणजे मायक्रोस्कूलिंग. कोव्हिड-१९च्या साथीच्या काळात हा पर्याय शोधला गेला. त्या वेळी औपचारिक शिक्षणाच्या शाळा बंद ठेवण्यात आल्याने काही कुटुंबांनी उपलब्ध संसाधने एकत्र करत ही पद्धती सुरू केली. यामध्ये जास्तीत जास्त १५ ते २० विद्यार्थ्यांना शैक्षणिक सेवा देणे शक्य असते. ज्या पालकांना होम स्कूलची कल्पना पूर्णार्थाने राबवणे शक्य नाही त्यांना हा पर्याय निश्चितच चांगला वाटतो.

अनस्कूलिंग : या पद्धतीमधला मुख्य विचार असा आहे की विद्यार्थ्यांना काय शिकायचे आहे आणि कधी हे ठरवण्याचे स्वातंत्र्य दिले पाहिजे. त्यांच्या आवडीचे विषय शिकायची मुभा त्यांना दिली तर ते जास्त आवडीने आणि ओढीने शिकायला येतील. या पद्धतीची सुरुवात समरहिल या इंग्लंडमधील बोर्डिंग शाळेने १९२१ मध्ये अकरा वर्षावरील विद्यार्थ्यांसाठी केली. स्कॉटिश विचारवंत ए.एस. नील यांच्या तत्त्वज्ञानावर ही पद्धती आधारली आहे. त्यानुसार, विद्यार्थ्यांना स्वयंशिक्षण आणि शोध आणि नवनिर्मितीसाठी प्रेरित करायला हवे. या पद्धतीमध्ये विद्यार्थ्यांच्या मैदानी खेळांना, त्यांच्या सामाजिकीकरणाला प्रोत्साहन दिले जाते.

वाल्डोर्फ पद्धती : याला वाल्डोर्फ अध्यापनशास्त्र किंवा स्टेनर शिक्षण असेही म्हटले जाते. ऑस्ट्रियन तत्त्वज्ञ आणि शिक्षक रुडॉल्फ स्टेनर यांच्या शिकवणीवर आधारलेली ही पद्धत आहे. या पद्धतीमधील प्रमुख तत्त्वे व वैशिष्ट्ये आहेत-

१) सर्वांगीण विकास : शिक्षणाचा मूळ उद्देश हा मुलांच्या बौद्धिक, भावनिक, शारीरिक आणि आध्यात्मिक अंगांचा विकास करणे हा होय. शिक्षणाबरोबर मुलांना सर्जनशील बनवून

त्यांना सामाजिक कौशल्यांच्या आधारे सक्षम बनवायचे आहे.

२) विकासात्मक तयारी : अभ्यासक्रमांची रचना ही मुलांच्या विकासाच्या नैसर्गिक टप्प्यांशी जुळवून घेण्यासाठी करण्यात आली आहे. त्यानुसार मुलांच्या संज्ञात्मक, भावनिक आणि शारीरिक वाढीस समर्थन देण्यासाठी योग्य विषय व आशय अभ्यासक्रमात समाविष्ट केले जातात.

३) कलांचे एकत्रीकरण : कलात्मक अभिव्यक्तीच्या माध्यमातून शिक्षण हे वाल्डोर्फ शाळांचे वैशिष्ट्य आहे. मुलांमध्ये सर्जनशीलता आणि कल्पनाशक्तीचा विकास व्हावा यासाठी संगीत, चित्रकला, रेखाचित्र आणि नाटक यासारखे विषय शैक्षणिक धड्यामध्ये समाविष्ट केलेले असतात.

४) हसतखेळत प्रारंभिक शिक्षण : या पद्धतीमध्ये सामान्यतः मुले सात वर्षांची होईपर्यंत खेळ, हालचाली, संवेदी अनुभव यातूनच शिक्षण दिले जाते. औपचारिक पद्धतीने केलेल्या शैक्षणिक सूचना जसे की लेखन, वाचन मुले विकसित होईपर्यंत टाळले जाते.

५) निसर्ग आणि मैदानी क्रियाकलापांवर भर : बाह्य क्रियाकलाप, जसे की बागकाम, प्रत्यक्ष जीवनातील विविध अनुभव याद्वारे मुलांना निसर्ग आणि पर्यावरणाशी जोडण्यावर विशेष भर दिला जातो.

६) मार्गदर्शक शिक्षक : वाल्डोर्फ पद्धतीच्या शाळेतील शिक्षक मुलांच्या वैयक्तिक गरजांचे निरीक्षण करून त्यानुसार त्यांना अनुभव शिक्षण प्राप्त करून देतात. त्यांची भूमिका केवळ शिक्षकाची नसून, मार्गदर्शकाची असते.

७) शैक्षणिक मूल्यमापन : या पद्धतीत प्रमाणित चाचणी परीक्षेऐवजी, सर्वांगीण मूल्यांकन पद्धतीचा अवलंब केला जातो. शिक्षक निरीक्षणे, पोर्टफोलिओ आणि वर्णनात्मक मूल्यमापनाद्वारे विद्यार्थ्यांच्या प्रगतीचे मूल्यांकन केले जाते.

८) सामुदायिक, सांस्कृतिक आणि आध्यात्मिक जागरूकता : विद्यार्थी, पालक आणि शिक्षक यांच्यामधील समुदायाच्या भावनेला प्राधान्य दिले जाते. तसेच, विद्यार्थ्यांचा सांस्कृतिक आणि आध्यात्मिक परीघ विस्तारित व्हावा यासाठी जागतिक नागरिकत्वाची भावना आणि विविधतेचा सन्मान करण्याची भावना त्यांच्यात जोपासण्याच्या दृष्टीने अभ्यासक्रमात जागतिक संस्कृती, मिथक आणि कथांवर भर दिला जातो. आध्यत्मिक वाढीवरही लक्ष केंद्रित केले जाते.

अशा प्रकारे वोल्डोर्फ पद्धतीमध्ये बालशिक्षणामध्ये सर्वांगीण विकासाचा दृष्टिकोन स्वीकारून सर्जनशीलता, कला, व्यक्तिमत्त्वविकास आणि सामाजिक जबाबदारीचे भान याकडे विशेष लक्ष दिले जाते.

औपचारिक शिक्षणाला पर्याय शोधून त्यानुसार शिक्षण घेणाऱ्या काही जगप्रसिद्ध व्यक्तींचे जीवनचरित्र वाचणे उद्‍बोधक ठरेल. यामधे रवींद्रनाथ टागोर, अल्बर्ट आईनस्टाईन, थॉमस आल्वा एडिसन, स्टीव जॉब्स, मार्क झुकरबर्ग, ॲण्ड्र्यू लोईड वेबर, मलाला युसुफजाई अशी काही नावे सांगता येतील.

रवींद्रनाथ टागोरांनी औपचारिक शिक्षणाऐवजी, खाजगी स्कूलिंगचा मार्ग निवडला. इतकेच नाही तर स्वतःच्या तत्त्वज्ञानावर आधारलेले शांतिनिकेतन ही शिक्षणपद्धती विकसित केली. आइनस्टाइनला शाळेतला अभ्यासक्रम हा खूपच जाचक वाटायचा. त्याचे बरेचसे शिक्षण होम स्कूलिंग पद्धतीने झाले व त्याला जे हवे तेवढेच शिकवणारे अभ्यासक्रम त्याने स्वीकारले. एडिसनही होमस्कूल पद्धतीने शिकला. स्टीव जॉब्सने महाविद्यालयीन शिक्षण मध्येच सोडून देऊन आपल्याला हवे त्यापद्धतीने अनुभवातून शिक्षणाचा मार्ग स्वीकारला. मार्क झुकरबर्गनेसुद्धा महाविद्यालयीन शिक्षणाला रामराम ठोकून स्वतःच्या मीडिया प्लॅटफॉर्मवर लक्ष केंद्रित केले. वेबर एक यशस्वी संगीतकार आणि नाट्यनिर्माता होण्याआधी त्याला डिस्लेक्सियामुळे औपचारिक शिक्षणातून बाहेर पडावे लागले. प्रायव्हेट शिक्षकांच्या मदतीने त्याने शिक्षण घेतले आणि विशेषतः संगीताचे शिक्षण त्याला घेता आले. सर्वात तरुण नोबेल पारितोषिक विजेती मलाला युसुफझाईने तर पाकिस्तानमधे स्त्री शिक्षण हक्कासाठी लढा दिला हे सर्वश्रुत आहे. तिचे शिक्षण हे पर्यायी मार्गानेच म्हणजे ऑनलाइन पद्धतीने आणि खाजगी शिक्षकांच्या मदतीनेच झाले आहे. या उदाहरणांवरून हे लक्षात येते की पर्यायी शिक्षण योग्य पद्धतीने दिले तर होमस्कूलिंग, स्वयंस्फूर्तीने निवडलेले अभ्यासक्रम, मायक्रोस्कूलिंग, अनस्कूलिंग यातून विद्यार्थ्यांना विकासाच्या संधी मिळू शकतात. पारंपरिक, ठरावीक शिक्षण पद्धतीच्या बाहेर जाऊन त्यांच्या प्रतिभेला आणि सर्जनशीलतेला वाव देता येतो.

आनंद फंदींचा फटका सांगतो, की

बिकट वाट वहिवाट नसावी, धोपट मार्गा सोडू नको
संसरामधी ऐस आपुला, उगाच भटकत फिरू नको.

तर प्रसिद्ध अमेरिकन कवी रॉबर्ट फ्रॉस्ट 'The Road Not Taken' या कवितेत सांगतात की मी मळलेली वाट निवडली नाही आणि म्हणून माझे आयुष्य वेगळे झाले.

Two roads diverged in a yellow wood
I took the one less traveled by,
And that has made all the difference.

औपचारिक शिक्षणाचा धोपटमार्ग स्वीकारून पुढे जायचे की क्वचित कोणी चोखाळलेल्या अनवट वाटेवरून नवीन अनुभव घेत ज्ञान मिळवायचे हे ठरवणे आपल्याच हातात आहे. दोन्हीकडे शिक्षक शिकवतात, विद्यार्थ्याने शिकले पाहिजे!

**– डॉ. अंजली पटवर्धन–कुलकर्णी**
anjali.ptwrdhn@gmail.com



# काजळी पुसण्या निघालो!

समरेंद्र निंबाळकर

''अनंत वेळेसी घाल आम्हा जन्मा''

हा आनंद भाटे यांनी गायलेला अभंग. यूट्यूबवर आहे. संगीत केतकी वैद्य. शब्द आहेत अशोक देशमाने यांचे.

मला कवी म्हणून कुतूहल वाटले. संतकाव्यात विठ्ठलभेटीची आस द्रवली आहे. उठताबसता, दळताकांडता, त्या सावळ्याची ओढ लागलेली आहे. जन्ममृत्यूच्या फेऱ्यातून सुटण्यासाठी परमार्थ विवेकी मार्ग दाखवला आहे. तर इथे या अभंगात हा कवी मागतोय, अनंत वेळेस घाल आम्हा जन्मा? आम्हा नको मुक्ती, नको धन-मान, असे दुसरे कडवे येते. काहीच नको. तरी जन्म हवे आहेत! याचा अर्थ जरा नीट समजून घ्यायला या कवीला गाठले पाहिजे, असे वाटले. कशासाठी अनंत जन्म पाहिजे आहेत बाबा तुला? आम्ही तर एकाच जन्मात वैतागून जातो...!

भेट झाली, तेव्हा अशोकसरांनी (आदर आणि मैत्री दोन्ही भाव आहेत, म्हणून कधी एकेरी उल्लेखही करतो) समजावून सांगितले, 'उपाशी, अनाथ, गोर गरीब मुलांचे अश्रू पुसण्यासाठी, हे जन्म हवे आहेत.' मी थक्क झालो. म्हणायला काय, कवितेतून काही म्हणता येते! पण त्या शब्दांमध्ये अनुभवाचे आर्त सामावले आहे का, हे पाहिले, तेव्हा समजले, की 'स्नेहवन' नावाचा एक विशाल साधनामार्ग या तरुणाने निवडला आहे. जाणीवपूर्वक. निश्चयपूर्वक. कृतिशील होऊन तो भगवंताला जन्माचे दान मागतोय. सेवा करण्यासाठी. सर्वस्वाचा त्याग करण्यासाठी... अनाथ मुलांसाठी!



अशोक देशमाने

आणखी कुतूहल जागे झाले. हा वसा यास कोणी दिला? या दुनियेस, दोन दिसांची रंगसंगत मानणाऱ्या नव्या पिढीत हा ध्येयवाद कसा आला? कुठून आला हा सेवाभाव या युवकात? अवघे चौतीस वर्षाचे वय. मध्यम उंची. चेहऱ्यावर विलक्षण चमक. डोळे शांत पण जोखणारे. साधे कपडे. फुल शर्ट आणि पँट. बोलताना स्वर नेहमी नम्रता दर्शवणारा. बोलायला लागला की ऐकत राहावे वाटणारा आवाज. कारण तळमळ आहे खरी आत. जे बोलतोय तो रोकडा अनुभव तरी आहे किंवा रचनात्मक काही साकार करण्याची इच्छा.

पुढे अशोक सांगू लागला.. दुष्काळ पडला होता गावी तेव्हा. साधारण २०१२-२०१३ साली. लोक गाव सोडून जात होते. मला चांगली नोकरी होती पुण्यात. फ्लॅट घेऊन पुणेकर व्हायचे स्वप्न होते. परंतु गावी गेलो तर लोक एसटीतून शहरात जाताना दिसत होते. तरुण मुले शिक्षण सोडून देत होती. मोलमजुरी करून घरच्यांना सांभाळत होती. सांभाळणार होती. त्याच सुमारास एका शेतकऱ्याने आत्महत्या केली. माझ्या गावातला माणूस. आता काय होईल त्याच्या लेकरांच्या शिक्षणाचे? उघड्यावर पडतील काय? प्रवाहातून फेकली जातील का?

अशोक नेहमी मुलांना लेकरू म्हणतो. त्याच्या लेकरू

म्हणण्यात एक वेगळा भाव जाणवतो. तो त्यावेळी त्यांची आईबाप सर्व काही झालेला असतो त्यांचा.

तर अशा लेकरांच्या शिक्षणाचे काय?, हा प्रश्न त्यास स्वस्थ बसू देत नव्हता. मला काय करायचे? शेअर कोणता ग्रो होणार आहे, त्यात पैसे किती लावू. अप्रेसल मिळेल, पॅकेज वाढवून घेऊ. बाहेरची कन्साइनमेंट मिळेल. अमेरिकेत जाऊ... संपेल विषय आपल्यापुरता.. नवा अध्याय सुरू होईल! असे आणि इतकेच त्यास वाटले नाही, हे भाग्य त्या अनाथ मुलांचे.

अशोक म्हणतो, मी अमेरिकेत जाऊ शकलो असतो. वीस-पंचवीस वर्षात ग्रीन कार्ड, मग नागरिक, मग बीएमडब्ल्यू, मग बंगला, मग अनिवासी भारतीय, मग सगळे करता आले असते. मात्र एक प्रश्न आ वासून उभा राहिला. इथे भारतात, (इंडियात नव्हे!) इतके शेतकरी आत्महत्या करत होते, लेकरे नव्या व्यवस्थेत शिकू शकत नव्हती. कुटुंबच्या कुटुंबे देशोधडीला लागत होती. एक पिढी खतम होत होती. मी काय केले त्यावेळी? मी काय करू शकत होतो?

हाच तो million dollar question होता. मी काय करू शकतो यावर? ज्याने त्यास खरोखरीच million dollar मिळवून नाही दिले. परंतु million dollar चे समाधान दिले. जगण्याचा नवा हेतू, नवा आयाम दिला. काय करायचे आहे, याचे भान दिले. कशासाठी पोटासाठी खंडाळ्याच्या घाटासाठी! हा घाट व्यवस्थित उतरण्याचा रस्ता दिला. नाहीतर या मोहमायेची वाट घाटात काट देतेच, आपल्याही नकळत. अशोकने मात्र त्याच्या जीवनाचे श्रेयस निवडले. स्वीकारले.

त्याने गावातून काही मुले आणली. भोसरी, पुणे इथे दोन खोल्या घेतल्या. रात्रपाळी करून स्वतःचा उदरनिर्वाह आणि दिवसपाळीत हा परमार्थ चालू झाला. रात्रीचा दिवस केला आणि दिवसाची रात्र केली. ओढाताण सुरू झाली. मुले परभणीतल्या मानवत तालुक्यातून आलेली. त्यांचे प्रश्न. पुण्यात रुळताना होणारा भावनिक संघर्ष, न्यूनगंड, वडील नसण्याचे पोरकेपण, आणि अशोकची ममत्वपूर्ण पालकत्वाची जडणघडण. या ओढाताणीला कंटाळून तो नोकरी सोडण्याचा विचार करू लागला.

घरी तर आभाळच फाटले, हे ऐकून. आई म्हणाली, कोणी करणी केली माझ्या पोरावर! लहानपण दरिद्र्यात गेलेले. मंगरूळसारख्या गावात झालेली आबाळ. अभाव. या संघर्षातून आयटी इंजिनीयर झालेला सोन्यासारखा लेक. दुख भरे दीन बिते रे भैय्या, या वळणावर साऱ्या कुटुंबाचे आलेले आयुष्य. आणि हा काय म्हणतोय, तर नोकरी सोडून अनाथ पोरांना शिकवायचे. वडिलांनी तर डोक्याला हात लावला.

मात्र हेच क्षण असतात, जे निसटले तर कायमचेच निसटतात. इक्बाल सिनेमामध्ये शेतकऱ्याचा मूकबधीर मुलगा क्रिकेट खेळाडू व्हायचे स्वप्न पाहतो. तेव्हा त्याचे वडील क्रिकेटचे त्याचे किट चुलीत घालतात. त्याचा कोच असणारा नसरुद्दीन शाह त्यास समजवतो. त्याचा सारांश असा की इक्बाल क्रिकेट खेलने के लिये पैदा हुआ हैं, और वो ये जानता हैं. कितने सारे लोग ये नहीं जान पाते के वो किस लिये पैदा हुवे हैं! अशोकभी जान चुका था, जाग चुका था!

प्रकाश आमटे यांच्यासारख्या थोर लोकांचे आशीर्वाद त्याने घेतले. आणि इरादा पक्का झाला. नोकरी कायमची सोडण्याचा. लग्नाचे वय झाले होते. मुलाला पुण्यास नोकरी. दहा-पंधरा लाखांचे पॅकेज. लवकरच फ्लॅट घेणार. परदेशी जाण्याची संधी. आणखी काय हवे, सुयोग्य स्थळासाठी? फोनवर फोन येत होते, मुलगी पाहायला कधी येताय?

आणि अचानक बातमी आली की मुलाने नोकरी सोडली. फोनची बॅटरी डेड व्हावी तसे फोन बंद होत गेले. अशोकने ठरवले. लग्न केले तर सर्व पूर्वअटी सांगून संमतीने. अटी काय? तर,

नोकरी करणार नाही,

अनाथ मुलांचे शिक्षण-संगोपन करणार,

त्यांच्याच सोबत राहणार,

एकच किचन, एकच निवास,

सगळ्यांचे जेवण बनवण्याची जबाबदारी घ्यावी लागेल,

आपली मुले या मुलांसोबत खेळतील, वाढतील.

या सर्व अटी मान्य करून अर्चनाताई तयार झाल्या. ही समिधा हीच साधना स्वीकारून संसार करायला. आणि पाच दिवसांत मुलगी बघून लग्नही संपन्न झाले. अशोकरावांचे हात आता दोनाचे चार झाले.

नवीन संसार, सोबत गावातून आलेली पंधरा-वीस मुले, एका खोलीत स्वयंपाकघर, चाळीस चाळीस भाकऱ्या एका वेळी करणे, मुलांना सांभाळणे हे आनंदाने सुरू झाले.

कोणाचे काही वाईट कधी केले नाही, मग आपल्याच नशिबात असे का व्हावे?

अशोक विचारत होता. लग्नानंतर मिसकॅरेज झाले. त्या स्थितीत उभयता दुचाकीवरून डॉ. कुलकर्णी यांच्या दवाखान्यात उपचाराला गेले.

नियती काही ना काही योजना आखत असते. अशोक पुढे सांगतो, डॉ. कुलकर्णी यांनी सर्व माहिती करून घेतली. हेच ते देशमाने, आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या मुलांचा सांभाळ करणारे. त्यांना खात्री वाटली. हा प्रचंड बीजशक्ती असलेला वटवृक्ष आहे. यास जमिनीतून अंकुरून येण्यासाठी खऱ्या जमिनीची गरज आहे. आणि ठरले, डॉ. रवींद्र व डॉ. स्मिता कुलकर्णी यांनी आळंदीजवळ



असलेली त्यांची दोन एकर जमीन, या जोडप्याला देऊन टाकली. त्यावेळची जमिनीची किंमत होती दोन कोटी ऐंशी लाख रुपये. तिथे नालिनीताई कुलकर्णी यांच्या नावे ज्ञानग्राम उभे राहिले. माऊलींच्या सान्निध्यात अशोक आणि अर्चनाताई शिफ्ट झाले. नव्या ध्यासपर्वाची सुरुवात झाली. त्यावेळी अशोकचे वय होते २६ वर्षे!

काय योगायोग आहे पाहा. ज्ञानेश्वरमाऊली आणि भावंडाना तत्कालीन समाजाने उपेक्षिले. त्याच आळंदीजवळ हा अनाथ मुलांसाठी नवा ज्ञानयज्ञ सुरू झाला. जणू माऊलीने आपल्या चिरंतन मायेच्या कवेत या लेकरांना प्रेमाने बोलावून घेतले.

कोयाली जंगलालगत ही जमीन आहे. तिथे रस्ते नीट नव्हते. बेसुमार गवत, वृक्ष, पाणथळ भाग काही ठिकाणी. हीच आता आपली कर्मभूमी या न्यायाने अशोकने त्या चिखलात पाय रोवले. नव्या रस्त्यासाठी. नव्या उद्यासाठी. अनाथ मुलांसाठी.

संस्थेचे नाव काय ठेवावे, असा प्रश्न होता. तेव्हा अशोकने ठरवून टाकले की संस्था, संघटना, केंद्र इत्यादी इत्यादी कसलेही नाव घ्यायचे नाही. आपण स्नेह, प्रेम, ममता या भावनेने हे काम करतो. स्नेह देतो आणि जोडतो. वाईट पाहत नाहीच. दिसले काही उणे तर आपल्यात असलेले क्षुद्र काही, उगवून आलेले असेल, हे मानतो. तेव्हा या वनात फुलेल तो फक्त स्नेह, अपार स्नेह, निर्व्याज स्नेह. म्हणून संस्था सुरू झाली.. स्नेहवन!

सुरुवातीला गॅस नव्हता, लाईट नव्हते, रस्ता नव्हता. पण निर्माणाच्या आकांक्षेने मुसमुसलेल्या चेतनेस असले काही बांध रोखू शकत नाहीत. अवघे चौदा रुपये सोबत घेऊन आनंदवन सुरू केलेल्या बाबा अमटे यांचा फोटो त्याने उगाच लावलेला नाही बॅनरवर. अनंत अमुची ध्येयासक्ती. हा खास लढवय्या बाणा जपत पण नम्रतेने त्याने एकेक गोष्ट घडवायला सुरुवात केली.

दूधदुभते चांगले मिळावे म्हणून गायी घेतल्या, बायोगॅस प्रकल्प केला. त्यानंतर सौरऊर्जा प्रकल्प आला. कंटेनर आणून त्यात वेगवेगळ्या प्रयोगशाळा उभ्या केल्या. विज्ञाननिष्ठ मनाची मशागत करण्यास लॅबोरेटरी, कॉम्प्युटर आणले. शिलाई मशीनपासून छोटीमोठी कामे शिकवता यावी म्हणून मशीन घेतल्या. सुसज्ज ग्रंथालय उभे केले. पुस्तकवाचनाची गोडी लावली. मुलांना मल्लखांब आणि योगासने शिकवली. आणि अजून शिकवत आहे... त्याच्या प्रकल्पाची संपूर्ण माहिती Snehwanच्या वेबसाईटवर आहे.

नुसत्या इमारती नाही, तर सेवा, त्याग, चारित्र्य, सामाजिक बांधिलकी मानणारे नवे युवकयुवती घडावेत हा अशोक आणि अर्चनाताई यांचा ध्यास आहे. अनाथ मुले आणि त्यांच्या कुटुंबाचे जीवनमान सुधारावे. त्यांनी फक्त गाव पंढरीत संपून न जाता पुढच्या पिढीला घडवावे, सर्वार्थाने मोठे करावे हा त्यांचा संकल्प आहे.

अनेक जणांना प्रश्न पडतो, यासाठी आर्थिक मदत कुठून येते? अशोक म्हणतो, शासनाकडे मदत मागितली नाही कधीच. तसेच इतर कोणासही प्रत्यक्ष देणगी द्या म्हणून कधी हात पसरले नाहीत. पण खरोखर आश्चर्य आहे की लोक उभे राहतात 'स्नेहवन'च्या मागे. स्वतःहून. आणि किती मोठमोठे लोक, तर डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्यापासून डॉ. अशोक कुकडे, डॉ. तात्याराव लहाने यांच्यापर्यंतचे मान्यवर. डॉ. प्रकाश आमटे, मंदाताई, असे अनेक पूर्वसुरी आशीर्वाद देऊन गेले. अनेक प्रशासकीय अधिकारी, माध्यमे यांनी दखल घेतली आहेच. परदेशातील शिक्षक येतात. इथे मुलांसोबत राहतात. त्यांना परदेशी भाषा, विविध संस्कृती शिकवतात. देश-परदेशाच्या सीमा संपून जातात. आळंदीत त्यावेळी जणू माऊली स्पंदत असेल, विश्वाचे आर्त माझे मनी प्रकाशले!

जसे इथले अनेक लोक आहेत तसेच युरोप-अमेरिकेतलेसुद्धा अनेक जण आहेत. कुणी वसतिगृह बांधून देत आहे. कुणी कॉम्प्युटर देत आहे. कुणी वर्षाचे धान्य. कुणी शालेय साहित्य. कुणी वाढदिवस साजरे करतात. कुणी दिवाळी मुलांसोबत साजरी करतात. कुणी एक वेळचे भोजन देतात. ज्यांची द्यायची वेळ आलेली आहे, असे देणगीदार जोडले जातात. जणू देणाऱ्याचे हात हजार... होत जातात.

अशोक सांगतो, देणे न देणे महत्त्वाचे नाही, तुम्ही एकदा येऊन तर बघा. मुलांना भेटा. त्यांच्याशी बोला. मुलांना ते आवडते. नव्या पाहुण्यांचे अगत्यशील स्वागत मुले करतात. बोलतात. गाणी म्हणतात. दंगा करतात. छान ट्रिप आहे एक दिवसाची.. स्वतःसाठी, स्नेहवनातील मुलांसोबत!

काय आहे याच्यामागे? तर मला वाटते अशोकने स्नेहाने स्वतः जोडली आहेत ही माणसे. त्याच्यात अहंकार नाही, की मी कसे परोपकार करत आहे, म्हणून येणारा

दर्प नाही. मी प्रसिद्धीपराङ्मुख आहे, कंसात हीच माझी प्रसिद्धी, अशी दांभिकताही नाही. जगाला प्रेम अर्पावे, हा शुद्ध सात्त्विक भाव आहे. उगाच सक्सेस स्टोरी सांगणे नाही की समाजाला काही उपदेश देणे नाही. त्याचे हे ग्राउंडेड असणे मला महत्त्वाचे वाटते. हल्लीच्या भाषेत त्याचा फोकस शार्प आहे. काय करायचे आहे आणि काय करायचे नाही, याचे जागते भान हा कामाचा यूएसपी आहे. शुद्ध हेतूने केलेले निष्काम कर्म, ही त्याची साधना आहे.

शिवाय पत्नी, आईवडील सारे सारे कुटुंब अशोकच्या ध्येयाशी समरस झाले आहेत. 'की घेतले ना व्रत हे आम्ही अंधतेने', ही साऱ्यांचीच जणू प्रार्थना आहे. जीवननिष्ठा आहे. आजच्या काळात संपूर्ण कुटुंबाने आपले संपूर्ण आयुष्य समर्पित करणे, हे पाहणाऱ्या प्रत्येकास अपील करते. हलवून सोडते. बरे, मिळकत किती अशोकची? तर एक कपाट! ज्यात त्याचे दोन जोड कपडे आहेत. साधे शर्ट-पँट.. जाकीट वगैरेपण नाही!!

आजमितीस 'स्नेहवन'मध्ये साधारण ८० मुले आहेत. कायदेशीरदृष्टच्या हे एक वसतिगृह आहे. सिंगल पेरेण्ट असणाऱ्या मुलांचे. आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांची साधारण दहा ते बारा जिल्ह्यांतून मुले दरवर्षी आणली जातात. त्यांचं आई किंवा वडील तसे प्रतिज्ञापत्र 'स्नेहवन'च्या नावाने करून देतात. यांचा वयोगट साधारण सात वर्षांपासून अठरा वर्षापर्यंत असतो. जवळच्या शाळेत त्यांचा दाखला केला जातो. नेण्या-आणण्याची, खाऊजेऊ घालण्याची, शिक्षणसंगोपन, संस्काराची जबाबदारी स्नेहवन घेते.

आता या वृक्षास फळे येऊ लागली आहेत. त्यांचा पहिला विद्यार्थी विशाल हा एम.एससी. (केमिस्ट्री) होऊन हैदराबाद इथे नुकताच नोकरीस लागला. त्याला तेव्हा विचारले, पहिल्या पगारातून काय करशील विशाल, तर खस्ता खाल्लेल्या आई आणि बहिणीला साडीकपडे घेण्याबरोबरच तो म्हणाला स्नेहवनला पगाराची देणगी देणार.. धन्य आहे हा जागर.. 'ज्योत से ज्योत जलाते चलो.. प्रेम की गंगा बहाते चलो'.. याचा प्रत्यय आला. ही गंगा निर्माण करण्याचे अविरत भगीरथ कार्य त्याच्या लाडक्या अशोकसरांचे.

स्वामी विवकानंदांचे विचार ही अशोकची लहानपणापासूनची सोबत आहे. त्यांचा वसा आणि वारसा तो कृतिशीलतेत आणतोय. एक कुत्रेही उपाशी आहे, तोवर मला मुक्ती नको म्हणणाऱ्या विवेकानंदांचे बाळकडू अशोक जणू प्यायलेला आहे. त्याच्या बॅनरवर जसे स्वामी विवेकानंद आहेत, तसे कर्मवीर भाऊराव पाटील आहेत. मी मध्ये म्हणालो त्याला, भाऊरावांच्या कार्याचा गौरव करणारा आज बायोपिक निघत आहे. तुझ्यावरही लवकरच निघेल. तो खळखळून हसला. पण मला वाटते, माणसे कार्यरत असतात, तेव्हा समाजाने त्यांच्या सेवाकार्याशी जोडून घेतले पाहिजे. तर त्याची ऊर्जा वाढेल. विस्तारेल. आणखी लेकरांना शिक्षणाच्या गंगेत आणता येईल. एक पिढी वाचेल. अशोकचे स्वप्न आहे इथे ओपन स्कूल बनवण्याचे. एक विशाल छत्र ज्यात महाराष्ट्रातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांची सर्व मुले राहू शकतील. शिकू शकतील. एक मूलही शिक्षणापासून वंचित राहता कामा नये, हे त्याचे मिशन आहे.

'स्नेहवन : एक आशेचा किरण', असे त्याचे बोधवाक्य आहे. हा किरण आहे, हे तर खरेच. अशी किरणे हाच उतारा आणि उपाय असतो काजळीवर. काजळी, जी घट्ट होत चालली आहे, स्वतःच्या आत आणि बाहेर.. फक्त माझे, मी, मलाची काजळी, फक्त स्वार्थ आणि आत्मकेंद्रितपणाची काजळी, फक्त नफा आणि पर्यावरणनाशाची काजळी, फक्त स्पर्धा आणि हिंसेची काजळी.. स्वतःपुरती आणि मुलांसाठी अशी अविवेकाची काजळी पुसण्याचे कार्य इथे धैर्याने अशोक करतो आहे. अशा समर्पित लोकांना उद्देशून मध्ये एक कविता लिहिली, काजळी पुसण्या निघालो.. या काव्यांजलीने त्याचा यथोचित गौरव करतो आणि थांबतो..

काजळी.. पुसण्या.. निघालो!
दाटलेल्या अंधारात मी
प्रकाशाची हाक झालो
मजसभोती साचलेली
काजळी पुसण्या निघालो!


मी ना पाही पाप माझ्या
वाणीत ना कर्मात ही
दिव्यतेचा वारसा मज
मी अमृताचा कुंभ झालो!

पोळती जे पाय तया
सावली नसते कुठे
गाडून माझी बीजशक्ती
वटवृक्ष मी होण्या निघालो!

किती येऊ दे तुफान आता
ना वादळांची मज तमा
मी शुभ्र ध्वजा ध्यासपंथी
माणूस मी होण्या निघालो!

काजळी पुसण्या निघालो..!

**– समरेंद्र निंबाळकर**
samarnimbalkar@gmail.com




# ख्रि. फादर फ्रान्सिस दिब्रिटो व्यक्तिमत्त्व आणि कार्य

फ्रान्सिस डिमेलो

'स्वतःसाठी जगलास तर मेलास; पण दुसऱ्यांसाठी मेलास (झिजलास) तर खरा जगलास' या वचनानुसार आयुष्यभर लोकसेवेसाठी आपले आयुष्य झिजवून गुरुवार २५ जुलै २०२४ रोजी फादर फ्रान्सिस दिब्रिटो काळाच्या पडद्याआड गेले. सुमारे चार वर्षे मल्टिपल मायलोमा या जीवघेण्या कॅन्सरशी झुंज देत त्यांनी इहलोकीची यात्रा संपवली. मात्र जाण्यापूर्वी श्रद्धावंत धर्मगुरू, पट्टीचे प्रवचनकार, सिद्धहस्त लेखक, परखड पत्रकार व संपादक, विचारवंत साहित्यिक, पर्यावरणरक्षक, भूमाफियांचे कर्दनकाळ आणि एक बहुआयामी, बहुस्पर्शी व्यक्तिमत्त्व अशी अनेक बिरुदे मिरवत ते देवाघरी गेले.

फादर फ्रान्सिस दिब्रिटोंचा जन्म ४ डिसेंबर १९४३ रोजी वसई तालुक्यातील वटार गावातील जेलाडी नावाच्या वाडीतील एका साधारण शेतकऱ्याच्या कुटुंबात झाला होता. एकत्र कुटुंबाच्या घरात गरिबी होती; पण संस्कारांची श्रीमंती होती. नंदाखाल धर्मग्रामातील सेंट जोसेफ हायस्कूल या मराठी माध्यमाच्या शाळेत फादरांचे एसएससीपर्यंतचं शिक्षण झाले. होली स्पिरीट या चर्चच्या प्रांगणातच शाळा असल्यामुळे शालेय जीवनातच क्रूसावर टांगलेल्या येशू ख्रिस्ताशी फादरांची ओळख झाली. इतकेच नव्हे तर जगाला शांतीचा, प्रेमाचा, करुणेचा आणि क्षमेचा महामंत्र देणारा ख्रिस्त फादरांचे प्रेरणास्थान बनला. जगायचे तर ख्रिस्ताचे अनुयायी होऊनच हा मनातील ठाम निश्चय त्यांना थेट गोरेगावच्या टेन पायस सेमेनरीत घेऊन गेला. तेथे वळलेली पाऊले त्यांच्या आयुष्यभराच्या व्रतस्थ जीवनाचा आरंभ होता.

तब्बल १० वर्षे तारण्यसुलभ मोहांवर आणि ऐहिक सुखांच्या आकर्षणावर विजय मिळवत त्यांनी ईशज्ञान आणि तत्त्वज्ञान आत्मसात करून २३ डिसेंबर १९७२ रोजी तत्कालीन कार्डिनल सायमन पिमेंटा ह्यांच्या हातून ख्रिस्ती गुरुपदाची दीक्षा घेऊन येशूचे सेवेकरी म्हणून प्रभूच्या मळ्यात रुजू झाले आणि



फादर फ्रान्सिस दिब्रिटो

खऱ्या अर्थाने फादरांच्या व्रतस्थ जीवनाला प्रारंभ झाला. रेव्हरंड फादर फ्रान्सिस दिब्रिटो ही नवी ओळख घेऊन ते लोकसेवेसाठी सिद्ध झाले.

प्रारंभी काही वर्षे वेगवेगळ्या धर्मग्रामात राहून सर्व धार्मिक विधी यथासांग पार पाडणे हेच त्यांचे काम होते. इथपर्यंतचा त्यांचा प्रवास सर्वसाधारण धर्मगुरूंसारखाच होता. पण, हिऱ्याला चमकण्यासाठी नेमके कोंदण लागते. सुदैवाने फादरांना ते कोंदण लाभत गेले आणि त्या हिऱ्यालाही नकळत पैलू पडत गेले. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला विविधरंगी धुमारे फुटत गेले.

काही वर्षे चर्चमध्ये साहाय्यक धर्मगुरू म्हणून कार्य केल्यानंतर फादर दिब्रिटो ह्यांना मराठी भाषेच्या विशेष अध्ययनासाठी पुण्याला वास्तव्य करण्याची संधी मिळाली. या

संधीचे त्यांनी सोने केले. तेव्हाची पुण्यनगरी आजच्यापेक्षा खूप वेगळी म्हणजे विद्या आणि संस्कृतीचं माहेरघर होती. तेथील पुणेरी मराठी भाषेचा फादरांवर खूपच प्रभाव पडला; त्यापेक्षा मराठी साहित्यिकांना जवळून पाहण्याची, ऐकण्यावाचण्याची संधी फादरांना मिळाली. त्यावर त्यांचा मराठी भाषापिंड पोसला गेला. मुळातच मराठी भाषेत वाचनलेखन करण्याची त्यांना आवड होती. 'साधना', 'निरोप्या'सारखी मासिके आणि 'सकाळ'सारख्या वृत्तपत्रातून त्यांचे कसदार लेखन प्रसिद्ध होऊ लागले होते. आणीबाणीच्या काळात पोलिसांच्या ससेमिऱ्याची तमा न बाळगता त्यांनी आणीबाणीविरोधात लिहिण्याचे धाडस दाखवले होते. त्यांच्यातील एका निर्भीड आणि परखड पत्रकाराची ती चाहूल होती. त्यात पुण्यात संपादन केलेल्या आचार्य पदवीने आणि फादर लेदर्ले या भाषापंडितांच्या प्रोत्साहनाने त्यांच्या वाचनलेखनाला भाषाशास्त्रीय बैठक प्राप्त झाली. त्याचबरोबर त्यांचं व्यक्तिमत्त्वही घडत गेले.

त्याच काळात फादरांच्या व्यक्तिमत्त्वघडणीला पोषक अशी एक संधी चालून आली. ख्रिस्ती धर्माचे मुख्य धर्मपीठ असलेल्या रोम येथील ग्रेगोरियन विद्यापीठात तीन वर्षे राहून धर्मशिक्षण घेण्याचा, विविध युरोपीय भाषा शिकण्याचा सुवर्णयोग त्यांच्या आयुष्यात आला. विशेष म्हणजे तेव्हा पोपपदी असलेले आताचे संत पोप जॉन पॉल ह्यांचा सहवास, मार्गदर्शन आणि आशीर्वाद त्यांना लाभला. ही त्यांच्या आयुष्यातील फार मोठी घटना होती. या सगळ्या संस्कारातून त्यांच्या पुढील साहित्यिक, सामाजिक आणि सांस्कृतिक अशा विविधांगी कार्यासाठी आवश्यक असलेल्या कणखर व समृद्ध व्यक्तिमत्त्वाची पायाभरणी झाली.

आता फादरांचे व्यक्तिमत्त्व चर्चच्या चार भिंतींत अडकून राहावे इतके मर्यादित राहिले नव्हते. एक आव्हानात्मक जबाबदारी त्यांची जणू वाट पाहत होती. फादरांमधील साहित्यिक परिपक्वता आणि तत्त्वनिष्ठ पत्रकाराचे गुण हेरून तेव्हाचे मुंबई सरधर्मप्रांताचे कार्डिनल सायमन पिमेंटा ह्यांनी १९८३ साली वसईच्या जीवनदर्शन केंद्रातून दरमहा प्रसिद्ध होणाऱ्या 'सुवार्ता' मासिकाच्या संपादनाची जबाबदारी फादर दिब्रिटोंवर सोपवली. त्यांनीही ती आज्ञाधारकपणे स्वीकारली आणि वसईत दिब्रिटोपर्वाला सुरुवात झाली.

'सुवार्ता' हे ख्रिस्ती धर्माचे मुखपत्र असले तरी ते वसईच्या सामाजिक आणि सांस्कृतिक चळवळीचे व्यासपीठही बनावे ही फादरांची इच्छा होती, धडपड होती.

वास्तविक पाहता धर्माधिकाऱ्यांची नाराजी ओढवून न घेता आपल्या स्वप्नातील सुवार्ता मासिक प्रत्यक्षात आणणे ही फार अवघड अशी तारेवरची कसरत होती. फादर दिब्रिटोंनी मोठ्या चातुर्याने, कल्पकतेने आणि विचारपूर्वक बदल घडवत 'सुवार्ता'ला एक दर्जेदार सामाजिक आणि वैचारिक अधिष्ठान प्राप्त करून दिलेच, शिवाय सुवार्ताचा खप कितीतरी पट वाढवून ती सातासमुद्रापलीकडे नेण्याचे फार मोठे काम केले. स्वतःच्या कर्तबगारीबरोबरच काही सहकाऱ्यांच्या योगदानाने 'सुवार्ता'चे साहित्यिक मूल्य वाढवून या मासिकाला प्रचंड वाचकप्रियता फादरांनी मिळवून दिली. सुवार्ताच्या नाताळविशेषांकाची दखल त्या काळच्या दिग्गज साहित्यिकांनी आणि काही वर्तमानपत्रांनीही घेतली होती हे त्या मासिकाचे मोठेपण! विशेषांकातील अनेक परिसंवाद साहित्यवर्तुळात चर्चेचे विषय झाले होते.

सुवार्ता मासिकाचे संपादक या नात्याने फादर दिब्रिटो ह्यांनी राबविलेले मासिकबाह्य उपक्रम हे फादरांचे विशेष कर्तृत्व आणि साहित्यक्षेत्रातील उल्लेखनीय योगदान म्हणावे लागेल. वाचक मेळावे, लेखक मेळावे, साहित्य मेळावे, बालसाहित्य मेळावे आणि उपवासकालीन व्याख्यानमाला ही सर्व फादरांची साहित्यिक अपत्ये म्हणायला हवीत. यासाठी फादरांनी त्यांचे संघटनकौशल्य पणास लावून वाचकांची, लेखकांची आणि कार्यकर्त्यांची मोठी फळी उभी केली होती. अक्षरशः हजारो लोकांना सुवार्ताच्या झेंड्याखाली एकत्र आणले होते. विशेष कौतुकाची गोष्ट म्हणजे सुवार्ता मासिकाला धर्म, जाती आणि पंथांची कुंपणे नव्हती. किंबहुना सुवार्ता व्यासपीठ ही फादर दिब्रिटोंची सर्वधर्मस्नेहभावाची प्रयोगशाळा होती असे म्हटले तर वावगे होणार नाही. याच प्रयोगशाळेतून असंख्य अभिरुचीसंपन्न वाचक, असंख्य रसिक श्रोते आणि अनेक लेखक, कवी उदयाला आले. ही फादरांच्या २४ वर्षांच्या प्रदीर्घ प्रयोगाची फलनिष्पत्ती आहे. असा प्रयोग महाराष्ट्रभूमीत क्वचितच कोणी राबवला असेल. सुवार्ता व्यासपीठ म्हणजे काय वाचावे, कोणाचे ऐकावे आणि कसे लिहावे याचे प्रशिक्षण केंद्र बनले होते. सुवार्ता साहित्य मेळावा आणि उपवासकालीन व्याख्यानमालेत महाराष्ट्रातील विचारवंत आणि साहित्यिकांना फादरांचं आमंत्रण मिळणं हा त्यांना मोठा बहुमान वाटत असे. फादर दब्रिटोंनी रा. भि. जोशी, वसंत बापट, विद्याधर गोखले, माधव गडकरी, राम शेवाळकर, लता राजे, चंद्रशेखर धर्माधिकारी, डॉ. नरेंद्र दाभोलकर, अविनाश धर्माधिकारी, डॉ. अभय बंग, डॉ. श्रीखंडे, विनायकदादा पाटील यासारख्या मोठमोठ्या साहित्यिकांना आणि विचारवंताना वसईत बोलावून एकीकडे वसईच्या संस्कृतीचा परिचय करून दिला. वसईच्या निसर्गाच्या प्रेमात त्यांना पाडले तर दुसरीकडे वसईकरांना थोरामोठ्यांचे दर्शन घडवले, त्यांचे विचार ऐकण्याची संधी दिली. यातून या सर्व दिग्गजांच्या मनातील वसईकरांविषयीचे गैरसमज दूर होऊन वसईकरांविषयी आदराची भावना निर्माण झाली.

१९८० ते १९९० हे दशक वसई तालुक्याच्या आधुनिक इतिहासातील एक क्रांतिकारक दशक म्हणायला हवे. मुंबईचा

रेटा वसई विरारपर्यंत पोहोचून या भागाच्या नागरीकरणाला प्रचंड वेग आला होता. त्यामुळे वसई–विरारमधील जमिनींना सोन्याचा भाव आला होता. भूमाफियांनी अक्षरशः धुमाकूळ घातला होता. त्यांची वक्रदृष्टी वसईच्या हिरव्या पट्ट्याकडे न वळती तर नवल! त्यात राज्यकर्त्यांनी सिडकोच्या माध्यमातून वसईच्या हिरव्यागार शेतीबागायतीवर कायमचा नांगर फिरवून सिमेंटचे जंगल उभारण्याचा घाट घातला होता. वसईचा घास घ्यायला आणि स्थानिकांना देशोधडीला लावायला अनेक भस्मासुरांच्या जिभा चटावल्या होत्या. परिणामी वसईतील दहशतवाद टोकाला पोहोचला होता. अवघी वसई भीतीच्या छायेखाली वावरत होती.

कोणा तारणहाराची नितांत गरज होती. तेव्हा फादर दिब्रिटोंच्या रूपाने वसईचा रक्षणकर्ता पुढे आला. मोठ्या धाडसाने ते रस्त्यावर उतरले. समविचारी कार्यकर्त्यांना हाताशी घेऊन त्यांनी 'हरित वसई बचाव समिती'ची स्थापना केली. एखाद्या क्रांतिकारकाप्रमाणे त्यांनी वसईच्या जनतेच्या मनात आंदोलनांचे स्फुल्लिंग चेतवून लोकांच्या मनातील भय कमी केले. फादरांच्या एका हाकेसरशी हजारो आणि लाखोच्या संख्येने स्त्रीपुरुष आणि आबालवृद्ध रस्त्यावर उतरून निर्भयपणे लढायला सिद्ध झाले. सर्वसामान्य लोकांमधील एकीचे बळ लक्षात घेऊन फादरांनी आंदोलनांचं रणशिंग फुंकले. १ ऑक्टोबर १९८९ या दिवशी वसईच्या मामलेदार कचेरीवर निघालेला हजारोंचा मोर्चा, पाणीउपशाविरुद्ध १८ मे १९९१ चे टँकर रोको आंदोलन आणि या सगळ्यांचा कळस म्हणजे २६ जाने १९९३ रोजी वसई क्रिकेट ग्राऊंडमधून निघालेला लाखोंचा मोर्चा. ही आंदोलने वसईकर कधी विसरू शकतच नाहीत; पण महाराष्ट्र शासन आणि भूमाफियादेखील विसरू शकत नाहीत. स्वर्गीय विजय तेंडुलकर, माधव गडकरी, मेधा पाटकर यांसारख्यांचे आदोलनाला मिळालेले समर्थन आणि सहभाग याचे ऋण वसईकरांच्या कायम स्मरणात राहील. या सर्वांचा दणका पाहून शासनाला आपली योजना बासनात गुंडाळून ठेवावी लागली आणि भूमाफियांनाही आपल्या तलवारी म्यान कराव्या लागल्या. या ऐतिहासिक विजयाचे सारे श्रेय निरपेक्ष वृत्तीच्या फादरांनी वसईच्या सामान्य जनतेला देऊन टाकले. त्या यशस्वी लोकआंदोलनाच्या निमित्ताने फादरांचे पर्यावरणाशी वेगळे नाते निर्माण झाले. तळमळीचे पर्यावरणवादी ही नवी ओळख फादरांना जगाच्या नकाशावर घेऊन गेली.

दिब्रिटो यांचा साहित्यिक प्रवास तर सर्वश्रुत आहे. 'ओयासिसच्या शोधात'पासून सुरू झालेला त्यांचा प्रवास दोन वर्षांपूर्वी प्रकाशित झालेल्या 'अनाहत ख्रिस्त' या प्रभू येशूच्या चरित्रलेखनाशी येऊन थांबला. त्यात तेजाची पाऊले, परिवर्तनासाठी धर्म, सृजनाचा मोहोर यांसारखी वैचारिक आणि ललित पुस्तके वाचकांच्या विशेष पसंतीस उतरली. तसेच 'नाही मी एकला' हे फादरांचे आत्मचरित्र त्यांच्या प्रांजळ आणि पारदर्शी स्वभावगुणांची साक्ष देणारे ठरले. आणि 'सुबोध बायबल' या राजहंस प्रकाशित महाग्रंथाने तर फादरांना साहित्य अकादमीचा राजमुकुट मिळवून दिला. याशिवाय अनेक चरित्रे, भाषांतरे फादरांच्या नावावर आहेत. या विपुल व दर्जेदार साहित्यसेवेची दखल विविध संस्था, मंडळे आणि शासनाने घेऊन संत नामदेव पुरस्कार, दर्पण पुरस्कार, महाराष्ट्र राज्य साहित्य पुरस्कार आणि साहित्य अकादमीचा राष्ट्रीय पुरस्कार अशा विविध नामांकित पुरस्कारांनी त्यांना सन्मानित करण्यात आले. संत तुकाराम आणि संत ज्ञानेश्वरमाऊली हे त्यांचे आवडते संत! योगायोग असा, की त्यांच्या नावाचा ज्ञानोबा–तुकोबा हा पुरस्कार फादर दिब्रिटोना प्राप्त झाला होता. त्यांना मिळालेला सर्वोच्च पुरस्कार म्हणजे २०२०च्या जानेवारीत उस्मनाबाद (धाराशिव) येथे झालेल्या ९३व्या अखिल भारतीय साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी त्यांची झालेली बिनविरोध निवड! धर्मगुरू म्हणून पौराहित्य करताना, लढ्याचे सेनापती म्हणून नेतृत्व करताना आणि प्रचंड लेखन करताना फादरांमधील महागुरूचे, आचार्यांचे आणि निष्काम कर्मयोग्याचे दर्शन जगाला घडले. त्यांच्यातील द्रष्ट्याची ओळख पटली.

दिब्रिटो यांनी दुष्टांऐवजी दुष्ट प्रवृत्तीचे निर्दालन करण्याचा जणू विडा उचलला होता. विचारांची लढाई विचारांनीच करायला हवी; विकारांनी नव्हे, अशी त्यांची धारणा होती. उलट सर्व विकारांवर आणि षड्रिपूंवर त्यांनी विजय मिळवला होता. राग आणि आग यापासून दूर राहायला हवं. कारण या दोन्ही गोष्टी माणसाची, कुटुंबाची, समाजाची आणि पर्यायाने देशाची राखरांगोळी करतात. असे ते नेहमी सांगत असत. त्यांच्यावर वेळोवेळी चिखलफेक करणारे, त्यांच्यावर टोकाची टीका करणारे, त्यांचा कमालीचा द्वेष करणारे इतकेच नव्हे तर त्यांना जिवे मारण्याची धमकी देणारे कट्टर विरोधी यांपैकी कोणाकोणाचाही त्यांनी कधी दुःस्वास केला नाही. मनात राग ठेवला नाही की कोणाच्याही धमकीला कधी भीकही घातली नाही.

धर्मनिष्ठा, तत्त्वनिष्ठा आणि कार्यनिष्ठा या त्रिनिष्ठेच्या बळावर त्यांनी सर्वच क्षेत्रांत कार्यकर्तृत्वाचा कळस गाठला. कर्मयोग्याचे तपस्वी जीवन ते जगले आणि एखाद्या संन्याशाने समाधी घ्यावी त्याचप्रमाणे फादरांनी समाधानाने, शांतपणे इहलोकीची यात्रा संपवली.

**– फ्रान्सिस डिमेलो**
नंदाखाल, वसई



# दुर्दैवाचे दशावतार ते वैभवशाली जीवन
# पंजाबी लेखिका अजित कौर

संजीवनी खेर


पंजाबने ऐतिहासिक आणि आधुनिक काळातही खूप सोसलं आहे. साहजिकच त्याचे प्रतिबिंब साहित्यात पडलेले आहे. अशी नैसर्गिक वा राजकीय संकटे येतात तेव्हा सर्वात अधिक त्रास स्त्रियांनाच होतो. जणू स्त्रिया म्हणजे युद्धसदृश परिस्थितीत छळाचे आणि विजयात, उत्सवात बलात्काराचे केंद्र होतात. भारताची फाळणी हा एका असाच हृदयद्रावक घटनांचा काळ होता. संपूर्ण देश आनंदात होता पण पंजाब मात्र रक्तलांछित जखमांनी तळमळत होता. पुढे खलिस्तान चळवळीने उग्र रूप घेतले. त्यातही पुन्हा निरपराध्यांना लक्ष्य केले गेले. अखेर पंतप्रधान इंदिराजींची हत्या झाली. परिणामी पुन्हा साध्यासुध्या शीख लोकांवर राग निघाला; त्यांच्या हकनाक हत्या झाल्या. ह्याला तोंड दिले ते शीख लेखिका/लेखकांनी आपल्या लेखणीतून तर काहींनी समाजात उतरून त्यांच्या जखमा भरायचे काम केले. त्यातील एक होती अजित कौर. मनात कटुता न बाळगता काम करत राहिली आजही साहित्यक्षेत्रात कार्य करत आहेच. तिचे आयुष्य तसे साधे, सरळ गेले नाही. संकटे, दु:खाचे प्रसंग येत गेले, पण धैर्याने तोंड देत ती समाजातील नि स्वत:ची पीडा मांडत राहिली आहे. आज आपण तिचाच परिचय करून घेणार आहोत. भणंग अवस्थेतून जात समृद्धी तिने काट्याकुट्यांच्या रस्त्यावर चालून मिळवली आहे. आज तिची कलाकार लेक अर्पणा कौर तिच्या बरोबर आहे.


आज घटकेला 'ग्लोकल लेखिके'चे पंचेचाळीसहून अधिक लेख झालेत आणि तितकेच यूट्यूबवरील एपिसोड. हे करताना एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली की आपल्याच विविध भाषी देशांतील अनेक सिद्धहस्त लेखिकांना जाणून घेण्यासाठी किती खटाटोप करावा लागतो. त्यात आनंद, निराशा दोन्ही माझ्या वाट्याला आल्या. मुंबईसारख्या महानगरातही माहितीचा किती दुष्काळ असू शकतो हे जाणवत गेले. विविध भाषांतील नामवंत लेखिकांची मराठी, हिंदी वा इंग्रजीत अनुवादित



अजित कौर

पुस्तके वाचनासाठी उपलब्ध असणे अवघड. मग विकत घेण्याला पर्याय नाही. तेदेखील मिळेलच यांची खात्री नाही. त्यामुळे एकाच वेळी अनेकींची माहिती मिळवण्याठी प्रयत्न सुरू ठेवावे लागतात. वाचनालय मग एशियाटिकसारखे लाखो ग्रंथ असलेले ग्रंथालय असो किंवा भारतीय स्तरावरील साहित्य अकादमीसारखे व्यासपीठ असो; वा नायगाव येथील मराठी ग्रंथसंग्रहालय असो; तेथे काम करणाऱ्या मूठभर साहित्यप्रेमी लोकांमुळेच लिहिणाऱ्याला आपलेपणाने संदर्भ देणारे लोक भेटतात ज्यामुळे लेखन समाधानकारक होऊ शकते. ग्रंथालयांना नेहमीच निधीची, नेमक्या संदर्भग्रंथ नोंदण्याच्या सोयीची, प्रशिक्षणाची कमतरता असते. मी हे आता ह्या लेखात का मांडत आहे? तर साधे कारण आहे की 'ग्लोकल लेखिका'सारखे लेखन वा सादरीकरण करणे हे किती जिकिरीचे आहे ह्याची वाचकांना कल्पना यावी यासाठी. यामागे ग्रंथालीची तळमळ






आहे; ती भारतीय आणि जागतिक स्तरावरील सर्जनात्मक लेखनाची नोंद व्हावी, लोकांना समाजातील घटना, समाज-जीवनातले ताणेबाणे, संकटग्रस्त लोकांचे जगणे कळावे नि आपल्या मर्यादित संकुचित जगातून आपल्याला जगाचे दर्शन व्हावे, जे अन्यथा आपल्याला कळलेच नसते. म्हणून हा माझ्यासाठी थोडासा कष्टदायक तरी आनंद देणारा प्रवास सुरू आहे. एकेका साहित्यिकेचे लेखन म्हणजे त्या त्या प्रांतातीत भाषक संस्कृती, कौटुंबिक जीवन, सामान्यांच्या भावभावना, इतिहास, राजकीय परिस्थिती, धार्मिक रूढी, सामाजिक, राजकीय आंदोलनं यांचे प्रतिबिंब दाखवणारे आरसेच असतात.

आज आपण पंजाबी लेखिका अजित कौर हिच्याविषयी जाणून घेणार आहोत. ही पंजाबी भाषेतील लोकप्रिय लेखिका आहे. तिचा जन्म लाहोरचा १६ डिसेंबर १९३४चा. तिची आत्मकथा 'खानाबदोश' म्हणजे भटकी, गृहहीन, आजही लोकप्रिय आहे. वास्तविक हा तिच्या बृहद् आत्मकथेचा एक भाग आहे असे तीन ग्रंथ तिने लिहिले आहेत. तिने कादंबरी, कथा, तसेच आत्मवृत्तात्मक ललित लेखन केले आहे. तिला पंजाबी अकादमी पुरस्कार, साहित्य अकादमी, भारतीय भाषा पुरस्कार, शिरोमणी साहित्यकार, बाबा वली अवॉर्ड मिळाले आहेत, केवेंपू राष्ट्रीय पुरस्कार तसेच पद्मभूषणही मिळाले आहे. तिची काही पुस्तके हिंदी, इंग्रजी, तर एकच मराठीत अनुवादित झालेले आहे. तिची गाजलेली पुस्तके, ज्यावर सिनेमे निघाले ती फालतू औरत, नीला कुम्हार, ना मारो, पोस्टमॉर्टेम, अपने अपने जंगल, यहीं कहीं थी जिंदगी, गौरी, लेफ्ट ओव्हर, डेड एंड इत्यादी २२ पुस्तके आजही लोकप्रिय आहेत. तिच्या गौरी कथेवर चित्रपट निघाला आणि 'ना मारो'वर टीव्ही मालिका तयार झाली होती. तिला उत्तर आयुष्यात मानसन्मान मिळाले, वाचकांनी तिचे लेखन डोक्यावर घेतले हे खरे असले तरी प्रत्यक्ष आयुष्याने मात्र तिला सुखाचे क्षण मिळू दिले नाहीत. सतत स्वप्नभंग, पराकोटीचे दारिद्र्य, मानहानीचे प्रसंग आले, पण तिच्या स्वाभिमानाने ते टाळायचा प्रयत्न केला.

साहित्यिक पुरस्कार मिळाले, अनेक राष्ट्रीय समित्यांवर महत्त्वाची कामे करायची संधी मिळाली. इंदिरा गांधींसारख्या व्यक्तिमत्त्वाशी परिचय आणि काम करायची संधी मिळाली. पर्यावरण आणि हेरिटेज वास्तूंच्या संरक्षणासाठी तिने कोर्टात लोकांशी दोन हात केले. तिने अर्थशास्त्रात एमए करून नोकरी तर केलीच, सार्क देशांच्या कला आणि संस्कृती परिचयाबरोबर लेखक-लेखिकांच्या आदनप्रदानाने परस्परसंबंध दृढ केले. तिच्या आयुष्यात लाहोरमधील बालपणाच्या आठवणी महत्त्वाची भूमिका बजावतात. तेथील तेव्हाच्या घरांचे मोकळेपण, लोकांचे एकमेकांकडे येणेजाणे, गच्चीवरील मस्ती, एकटेपणाने घालवायच्या क्षणांचे महत्त्व, मुलगी असल्याने चिकाच्या पडद्यात राहायची सक्ती. अनेकानेक बंधने असली तरी एक प्रकारचा मोकळेपणा होता. हिंदू, शीख, मुस्लीम यांच्यातील सांस्कृतिक एकोपा आणि फाळणीमुळे आलेली दरी! वाटले की आता ही दरी कधीच मिटणार नाही, ह्या साऱ्याचे वेधक चित्रण ती आपल्या लिखाणातून करते.

हे चित्रण तिच्या 'विव्हिंग वॉटर' ह्या हृदयस्पर्शी आत्मचरित्रातून वाचकांसमोर येते. त्यातला एक भाग 'खानाबदोश' या नावाने प्रकाशित झालाय. ज्याला साहित्य अकादमीचे पारितोषिक प्राप्त झाले आहे. ते आत्मवृत्त वाचून माझी तर झोप उडाली होती, अस्वस्थ झाले होते. एखाद्याच्या नशिबी लहानपणापासूनच दु:ख, अवहेलना का येते? वास्तविक नशीब ही काही आपण विश्वास ठेवावी अशी चीज नाही. परंतु अजित कौरचे जीवन पाहिले की जाणवते की गुणवान असूनही आपल्याच माणसांकडून ती का ताडली जावी? ह्याचे उत्तर अर्थातच तुमच्या आमच्याकडे नाही. तिलादेखील जन्मभर ह्या प्रश्नाने छळले आहे. आज ती समाधानाने जगत आहे पण उमेदीचे दिवस मात्र आपली चूक नसताना शिक्षा भोगण्यात गेले. तिच्यावर साहित्य अकादमीने समर्पक फिल्म केली आहे 'विव्हिंग वॉटर' ही कल्पनाच मला थरारक वाटते.

मुलगी जन्मली म्हणून बालपणी आईने दूरच ठेवले. जिची तिने अंतकाळी मनापासून सेवा केली. भावाला तर आपण खूप श्रेष्ठ आहोत असा अहंगंड होता. स्त्रियांना माणूस भावभावना असलेली व्यक्ती म्हणून मोजायचा विचारच तेव्हा कुणाच्या मनात येत नसे, भलेही ती शिकलेली असो, कमावती असो, स्वत:च्या गुणांनी कौतुक मिळवत असो, लेकुरवाळी असो! तिच्यावर आपली सत्ता आहे नि तिने आपल्या धाकातच राहिले पाहिजे ही धारणा समाजपुरुषाच्या मनात पक्की होती.

त्यामळे अजित कौरने केलेली बंडखोरी कुणालाच पटली नाही. तिच्या सुखाची, आनंदाची खात्री कुणी घेत नव्हते. त्यांच्या निर्णयाने तिला त्रास झाला वा तिचा छळ झाला तर कुणी मदतीला येण्याची तसदी घेत नव्हते. तिचे जगणे, तिचा संसार, तिची बदनामी, हे तिचे कर्म आहे ते तिने भोगायचेच

असे मानून घरचे लोक आपापले जीवन मजेत जगत होते. ती मात्र आपली कुणी कीव करू नये ह्या स्वाभिमानापोटी तोंड दाबून बुक्क्याचा मार सोसत होती. आजच्या ह्या लेखात मी साहित्यिकेच्या जीवनसंघर्षावर अधिक लिहीत आहे कारण तिचे प्रत्यक्ष जीवन हे तिच्या कादंबऱ्यांइतकेच घटना प्रधान आहे. भावनांची तीव्र आंदोलने ती कुणाचीही पर्वा ना करता मांडते. तिला आयुष्यात कायमचे प्रेम मिळाले नाही. असे जाणवते की जे काही काळ मिळाले ते तिने इतक्या उत्कटतेने मांडलेय की तिला ते न मिळाल्याची रुखरुख वाचक म्हणून आपल्यालाच जाणवू लागते.

तिच्या कथा-कादंबऱ्या श्रेष्ठ आहेतच, पण जसे अमृता प्रीतमबद्दल झाले की तिचे जीवनच अधिक रसरशीतपणे वाचकांसमोर आले नि ते आपल्या सर्वांना भावले. तसेच अजित कौरबद्दल झाले. प्रेम करण्याची, त्यासाठी सर्वस्व वेचण्याची ताकद असताना तिच्या वाट्याला प्रेमभंग आणि वैराण जीवन यावे ही नियतीने केलेली विडंबना आहे. तिचे पहिले प्रेम तिच्या प्राध्यापकावर होते पण ते तिला लहान मुलगी समजत होते. तिने धाडसाने तिच्या प्रणयभावना कथारूपात त्यांच्याकडे पोहोचवल्या पण तेव्हाही त्यांना त्या अबोधच वाटल्या. त्याच वेळी एका प्रकाशकाने ते वाचून प्रकाशित करायची इच्छा दर्शवली. तो क्षण तिच्या लेखिका म्हणून जन्माचा म्हणता येईल.

तिचे प्रेम एखाद्या मोठ्या प्रपातासारखे तिच्यातून ओसंडत होते. बलवंत आणि ती दोघे एकमेकांच्या सहवासात सायकलवरून हिंडण्याचा, गप्पा मारण्याचा आनंद घेत असत. एकमेकांना पत्रे लिहीत. त्यात शारीरिक आवेगाचीही ओढ असे. मनांवर असलेल्या दडपणाची जाणीव असे. परंतु तेव्हाच्या दिल्लीच्या टेकड्या, तो निसर्ग, ती झाडे, पाने तिने साहित्यात अत्यंत रसिकपणे रंगवली आहेत. वाचकांना आपल्याबरोबर नेत ती दिल्ली दाखवते. आपल्या आवेगी प्रेमाच्या सुखात समाविष्ट करून घेते. हे प्रेम घरच्यांच्या आग्रहापुढे टिकले नाही. बलवंतला सनदी अधिकारी व्हायचे होते, त्यासाठी त्याला थोडा वेळ हवा असतो. तो रीतसर तिच्या घरच्यांना भेटून बोलला. आपल्यालाही वाटते की आता सारे ठीक होणार पण वडिलांनी दोघांना न भेटायचा, पत्रे क्वचितच लिहायचा हुकूम दिला. पोरगी आपल्या तोंडाला काळे फासणार म्हणून ही बंधने होती. दोघांनी ती पाळली, पण?

तिच्याकडे फक्त त्याच्या स्पर्शाचा भास व्हावा, एखाद्या जिवंत वस्तूची जाणीव व्हावी अशा पत्राच्या आठवणी राहिल्या. त्याचवेळी आईच्या आजाराचा जोर वाढला आणि ती हट्ट करून बसली की अजितचे लग्न लावून द्या, मरायच्या आधी तिला विदा करायची आहे. (वास्तविक त्यानंतर आई बरीच वर्षे होती) पळून जायचे विचार केला पण जमले नाही. बलदेव प्रशिक्षणासाठी गेलेला तिचेही एम.ए. अर्धवट राहिलेलं. तिच्या मनाची पर्वा न करता तिच्या आयुष्याच्या दशावतार ठरणाऱ्या लग्नाच्या बेडीत तिला अडकवले गेले. आईवडिलांच्या मते डॉक्टर राजिंदरसिंग आदर्श जावई होता. घराचे बरे होते. लग्नानंतर पहिल्या दिवशीच कुबट खोलीत नवऱ्याने त्याचे पहिले प्रेम तिला सांगितले नि फोटो दाखवला. ठीक आहे आपण आपल्या प्रेमाने त्याला जिंकू असा तिला विश्वास होता. पण तो मुळातच संशयी आणि विकृत मनोवृत्तीचा होता.

पहिली मुलगी झाली. मुलगा नाही झाला याचा राग होता. तिने बाहेर जाऊन चार पैसे कमावले तरी ते त्याच्याच हाती द्यावे लागत. दुसरीही मुलगीच झाली. मग त्रास आणखी वाढला. तो त्याच्याकडे येणाऱ्या लोकांकडे, पेशंटकडे बायकोबद्दल सारखे वाईटसाईट सांगे. लोकांची सहानुभूती साहजिक देवासमान डॉक्टरकडे असे. त्याच्या दुर्दैवाला सारे हळहळत होते. तिला अनेकदा तो घराबाहेर काढी. वडिलांचे घर ते नवऱ्याचे घर तिची पोरींसह पळापळ होत असे. हे थांबवलेच पाहिजे असे वाटे. पण, पैसा कमावत असूनही धाडस नव्हते. मित्र, मैत्रिणीही घाबरवत असत. फक्त घर सोडण्याचा मुद्दा नव्हता मनावर अनेक बंधने असतात, समाजाचे भय असते, पण तो समाज काही कधी मदतीला येत नव्हता. या दरम्यान दुसरी मुलगी झाली. वाद झाले की ती मुली घेऊन वडिलांकडे जाई आणि काही महिन्यांनी पुन्हा नवऱ्याकडे. असे तिचे सारखे सुरू होते. अखेर स्थिती काही सुधारत नाहीसे पाहून तिने थोडेफार कपडे चादरी घेऊन लेडीज हॉस्टेलमध्ये राहायचा निर्णय घेतला. तिथे पैशांची, सामानाची कमतरता होती, भीती होती. मुलींना तो घेऊन जाईल? म्हणून तिने पैशांची जुळवाजुळव करून त्यांना दूरच्या हॉस्टेलमध्ये ठेवले जिथे शिक्षण/सुरक्षा राहील. दिल्लीत घरासाठी खूप भाडी मागत. तेथील माणसे नि त्यांचे किस्से अफलातून आहेत. तिच्या धैर्याची, हिमतीची दाद द्यावी लागेल. तिचे लेखन त्या काळातही खूप जोमाने चालले होते. आरंभी तिला लिहायची मनाई होती. ती चोरून लिहीत असे. प्रकाशनाला पाठवत असे. अमृता प्रीतमच्या नागमणीत तिचे लेखन प्रकाशित होई. अमृता तिला समजावत असे, लेखनानेच तुझे मनावरचे दडपण कमी होईल. अशा शंभर कथा नि कविता प्रकाशित झाल्या. फाळणीच्या वेळी जे भयंकर प्रसंग डोळ्यांसमोर घडलेले पाहिले तसंच म्युनिकमधील भारतीय तरुणांची, सतत दहशतीत असलेल्यांची करूणाजनक स्थिती पाहिली. त्यावर 'कसाईबाडा' लिहिले. आजूबाजूच्या स्त्रियांच्या कथा, वर्तमानपत्रातील बातम्यांतून ती कथाबीजे घेत होती.

या दरम्यान एक सुंदर रोमँटिक वळण आयुष्यात आले. तिच्या स्वभावाप्रमाणे तिने त्याच्यावर सर्वस्व ओतून प्रेम केले. बरेच दिवस हे दोन्हीकडून सारखेच आवेगी होते. नंतर ते

आटत गेले. पत्नी, मुलगा आणि ही, यात त्याने पत्नीची निवड केली. ती सैरभैर झाली. तिची त्याचा वेगळा संसार, पत्नी असण्याला हरकत नव्हती पण आपल्याही वेळ द्यावा, खोटे वागू नये, अशी अपेक्षा होती. पण त्याने नेमके तेच केले. तो आपल्याला चुकवतोय हे ध्यानात आल्यावर हताश झाली. तो प्रकाशन व्यवसायातच होता. त्याला भेटायला एकामागून एक शहरे तिने गाठली पण तो टाळत राहिला. अखेर तिने स्वत्व टिकवायला त्याचा विचार दूर केला. मात्र मनाने, शरीराने खचून गेली. कारण तिने जे नाते जोडले होते ते सर्वस्व ओतून जोडलं होतं. हाही धक्का तिला पचवावा लागला. तिचे जीवन हीच एक शोकांतिका होती पण तिने जबर इच्छाशक्तीने सर्वांवर मात करून प्रतिष्ठा, मानसन्मान मिळवले. धन्य आहे तिच्या जिगरीची!

तिने नेहमीच अन्यायाविरोधात कुणाचाही मुलाहिजा न बाळगता लिहिले, मग ती आणीबाणी असो खलिस्तान चळवळ, असो वा १९८४चे शीखांचे शिरकाण असो, तिने विरोधी लेखन केले. तिने लोकांना मदत केली. लेखकलेखिका एकत्र करून आपल्या भोवतीच्या देशातील संस्कृती, धर्म, परंपरा, कला, लेखन, मिथके, भाषांना जोडण्याचे काम केले. सार्क देशांतील ही चळवळ लोकांच्या, सरकारच्या मदतीने मजबूत केली. तिने प्रत्येक दंग्याच्या वेळी हिंदू, शीख आणि मुस्लिमांनी पीडितांना मदत केल्याचे अनुभवले होते. दंगाईना धर्म नसतो ही गोष्ट तिने आपल्या वागण्यातून आणि नीडर कामातून दाखवून दिली.

या बाईने किती सोसावे याला मर्यादाच नव्हती. तिच्याच वाट्याला का इतके दु:ख यावे, असे वाचक म्हणून वाटत राहते तिची धाकटी मुलगी कॅन्डी ही शिष्यवृत्ती मिळवून पॅरिसला गेली होती. सगळे छान चालले होते. आणि एक दिवस अचानक तिला फोन आला, 'सगळं ठीक आहे. कॅन्डीला हॉस्पिटलमध्ये ठेवलंय. आम्ही काळजी घेत आहोत लवकरच ती बरी होईल.' कॅण्डी तिच्या खोलीत चहा करत असताना स्फोट झाला आणि ती जबर भाजली गेली होती. अजित आणि अर्पणा दोघी अस्वस्थ झाल्या. अर्पणाने आईला तिकडे जायला सांगितले. यानंतर जे जे होते त्याचे इतके मन हदरवून टाकणारे वर्णन लेखिका करते की आपण बेचैन होतो. अखेर कॅन्डीचा तिथेच देहांत होतो. आई रिक्त हाताने परत येते. का? का? एवढेच प्रश्न आपल्याही मनात येत राहतात.


तिच्या आयुष्यात संकटे आली. कित्येकदा अर्धपोटी राहून अपुऱ्या पांघरुणात तिघींनी निजून रात्री काढल्यात. घरासाठी कोर्टकचेऱ्या केल्या. स्वत:चे घर नाही का? नवरा कुठाय? एकटी का राहते? ह्याची उत्तरे देता देता नाकीनऊ आले. यातूनही ती उभी राहिली. अर्पणा ही लेक मोठी प्रसिद्ध चित्रकार झाली. स्वत:च्या हिमतीवर दिल्लीत एक भव्य दालन नव्हे तर भव्य वास्तू उभारली, कर्ज काढले, मदत घेतली. लेकीने साथ दिली. आज ती दिल्लीची एक शानदार वास्तू आहे. तिने जगभरातील असंख्य देखण्या कलात्मक वस्तु, मिनीएचर पेंटिंग तिथे प्रदर्शित केलेल्या आहेत. मुलींसाठी अनेक वर्ग चालतात. स्वत:च्या पायावर त्यांनी उभे राहावे, आपली आवड जपावी यासाठी त्यांना उत्तेजन दिले जाते. जगभरातील कलाकार आपल्या कलेचे तिथे प्रदर्शन करतात. ही अकादमी ऑफ फाईन आर्ट्स अँड लिटरेचर अनेक सांस्कृतिक कार्यक्रमही करत असते. ही संस्था विना फायदा तोटा तत्त्वावर चालते.

आज ती एक कृतार्थ जीवन जगत आहे. पण, आयुष्यात जे सोसले त्याची कळ मनात पुन:पुन्हा डोके वर काढत असतेच. समाजाचा स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोण बदलला तर सर्वांचेच जीवन सुखी होईल याचे महत्त्व ती साहित्यातून मांडत असते. तिचे लेखन फक्त स्त्रियांपुरतेच मर्यादित नाही. दबलेल्यांचा आवाज, अन्यायाविरोधात धारदार टीका तिची लेखणी आजही करत असते. राजकारणातील दुटप्पी वागणे, धर्मावरून भेदभाव करणे याची तिला मनस्वी चीड आहे आणि ते ती विविध व्यासपीठांवरून मांडत असते.

समाज, जवळचे लोक, नियती किती छळ करते; त्यातून एक तेजस्वी स्त्री वाट काढते, मुलींना वाढवते नि स्वत:चे स्थान निर्माण करते. हे शिवधनुष्य कसे पेलते हे वाचले तरी खरे वाटत नाही, पण तंतोतंत खरे आहे. तिच्या जिद्दीला सलाम.

**– संजीवनी खेर**
sanjeevanikher@gmail.com

॥ग्रंथाली॥





# स्मृतिगंध

**श्रीमती गुणाबाई रा. गाडेकर यांचे आत्मचरित्र**

संपादक
**सुनीता सावरकर**

**मूल्य २०० रुपये**
**सवलतीत १२० रुपये**



# रंगही रंग दाखवतात!

शरद काळे

अगदी पुरातन काळापासून रंग हे मानवी संस्कृतीचा अविभाज्य भाग बनलेले आहेत. पुराणकाळात श्रीकृष्ण गोकुळात रंग खेळत असे आपल्याला महाभारत सांगते. अजिंठ्याची रंगीत लेणी जगप्रसिद्ध आहेत. जगाच्या इतिहासात अनेक प्रसिद्ध चित्रकारांनी त्यांच्या अप्रतिम चित्रकलेने त्यांची नवे अजरामर केली आहेत. त्यातील कित्येक चित्रे जगातील विविध संग्रहालयांमध्ये ठेवलेली असतात. राजा रविवर्मा, दीनानाथ दलाल, सतीश गुजराल, वासुदेव गायतोंडे अशी काही नवे भारतीय संदर्भात सांगता येतील. रवींद्रनाथ टागोर, डॉ. होमी भाभा हे उत्तम चित्रकार होते. जगातील स्तरावर व्हॉन गॉ, पाब्लो पिकासो, लिओनार्दो द विंची, मायकेल अँजेलो, फ्रान्सिस्को गोया ह्या चित्रकारांची अनेक चित्रे आजही अतिशय लोकप्रिय आहेत. सोळाव्या शतकाच्या सुरुवातीला लिओनार्दो द विंची यांनी तैल रंगात रंगवलेले मोनालिसाचे चित्र आणि तिचे गूढहास्य यांची मोहिनी आधुनिक जगालाही पडते. पॅरिसच्या लुव्र या जगप्रसिद्ध संग्रहालयातील तिचे हे मूळ चित्र असलेल्या कक्षाला हजारोंच्या संख्यने जगभरातील पर्यटक रोज भेट देत असतात. राजा रविवर्मा यांची चित्रे त्या तोडीची आहेत. बडोद्याच्या सयाजीराव गायकवाड यांच्या राजवाड्यातील, पुण्याच्या राजा केळकर आणि हैदराबादच्या सालारजंग संग्रहालयांमध्ये या मल्याळी कलाकार राजा रविवर्मा यांची मूळ चित्रे पाहावयास मिळतात. हंस-दमयंती, शंतनू-मत्स्यगंधा, जटायूवध, अर्जुन-सुभद्रा, गंगावतरण अशी अनेक पौराणिक स्वरूपाची एकाहून एक सरस चित्रे तैलरंगांमध्ये त्यांनी काढली आहेत.

इंद्रधनुष्याला सात रंग असतात. आपल्या जीवनालाही अनेक रंग असतात. रंग आपल्या जीवनात महत्त्वाची भूमिका बजावतात, आपल्या भावनांवर, वागणुकीवर आणि निर्णयावर प्रभाव टाकतात. ते विशिष्ट भावना जागृत करू शकतात आणि वातावरणाचा टोन सेट करू शकतात. उदाहरणार्थ, लाल, पिवळा आणि नारंगी यांसारखे उबदार रंग उबदारपणा, उत्साह आणि ऊर्जेची भावना निर्माण करू शकतात, तर निळा, हिरवा आणि जांभळा यांसारखे थंड रंग शांतता, विश्रांती आणि प्रसन्नता निर्माण करू शकतात. ब्रँडिंग आणि मार्केटिंगमध्ये, लक्ष वेधण्यासाठी आणि संदेश देण्यासाठी रंगांचा वापर धोरणात्मकपणे केला जातो. उदाहरणार्थ, लाल रंग बहुतेक वेळा त्वरित कार्यवाहीशी संबंधित असतो आणि त्वरित निर्णय घेण्यास प्रोत्साहन लाल रंगाच्या गडद छटा वापरल्या जातात. निळा विश्वासार्ह मानला जातो, ज्यामुळे तो कॉर्पोरेट लोगोसाठी लोकप्रिय होतो. अंतर्गत सजावटीत (इंटीरियर डिझाइनिंग), आपण मोकळ्या जागा कशा अनुभवतो यावर रंग परिणाम करत असतात. तेजस्वी रंग खोलीला अधिक मोकळे आणि उत्साही बनवू शकतात, तर गडद छटा आराम आणि जवळीक वाढवू शकतात. वैयक्तिक प्राधान्ये, वैयक्तिक व्यक्तिमत्त्वे आणि सांस्कृतिक पार्श्वभूमी यासारख्या बाबी निवडलेले रंग प्रतिबिंबित करतात. याव्यतिरिक्त, सुरक्षितता आणि संप्रेषणामध्ये रंगांचा व्यावहारिक उपयोग असतो. ट्रॅफिक सिग्नल, दक्षता व सुरक्षाचिन्हे आणि रंगबद्ध प्रणाली जलद आणि प्रभावीपणे पोहोचवण्यासाठी सार्वत्रिक रंगांच्या अर्थांवर अवलंबून असतात. एकूणच, रंग हे आपल्या दैनंदिन जीवनाचे अविभाज्य घटक आहेत, जे आपल्या आजूबाजूच्या जगाशी आपल्या धारणा आणि परस्परसंवादांना आकार देतात. कृत्रिम रंग हा दैनंदिन जीवनाचा महत्त्वाचा भाग आहे.

नैसर्गिक रंगद्रव्ये म्हणजे वनस्पती, खनिजे आणि प्राणी यांसारख्या नैसर्गिक स्रोतांपासून मिळवलेले पदार्थ, जे विविध पदार्थांना रंग देण्यासाठी वापरले जातात. ही रंगद्रव्ये प्राचीन काळापासून कला, सौंदर्यप्रसाधने, खाद्यपदार्थ आणि कापडांसाठी वापरली जात आहेत. वनस्पती रंगद्रव्ये हे असामान्य म्हणता येतील असे रासायनिक पदार्थ आहेत. फळे, फुले आणि वनस्पतींचे विविध भाग रंगीबेरंगी दिसण्यासाठी ते

जबाबदार असतात. ते मुख्यतः दुय्यम वनस्पती संयुगे मानले जातात. चयापचयक्रिया, प्रकाशसंश्लेषणातील प्रकाशऊर्जा ग्रहण, पेशीविकास आणि रोगसंरक्षणाचे नियमन आणि प्रकाशात होणाऱ्या ऑक्सिडेटिव्ह नुकसानापासून संरक्षण देणे यासारख्या वनस्पतींच्या विविध महत्त्वाच्या जैविक प्रक्रियांमध्ये आवश्यक भूमिका बजावतात. त्यांच्या सेवनामुळे मानवांमध्ये विविध रोग होण्याची शक्यता कमी होते. रंग हा सर्वात उल्लेखनीय मापदंड आहे ज्याद्वारे अन्नाची गुणवत्ता तपासली जाते, जी एखाद्याची भूक उत्तेजित करू शकते किंवा कमी करू शकते.अन्नात वापरले जाणारे विविध रंग पदार्थांना अधिक आकर्षक, मोहक आणि ओळखण्यायोग्य बनवतात. खाद्यपदार्थांमध्ये कृत्रिम रंगांचा वापर उजळ दिसण्यासाठी आणि आर्थिक प्रेरणेसाठी केला जातो कारण आकर्षक रंग असलेले पदार्थ आकर्षण वाढवतात आणि भूक उत्तेजित करतात. नैसर्गिक रंग त्यांच्या उपचारात्मकतेमुळे आणि वैद्यकीय प्रभावामुळे तर कृत्रिम रंग विषारीपणामुळे लोकप्रिय झाले आहेत, चिंताकारक. नैसर्गिक रंगद्रव्यांमध्ये स्थिरता नसणे आणि कमी जैवउपलब्धता यासारख्या समस्या आहेत. एन्कॅप्सुलेशन तंत्रज्ञानाने गेल्या काही दशकांमध्ये या समस्यांवर मात करून विविध विषयांमध्ये आणि अनुप्रयोगांमध्ये त्यांचा उपयोग वाढवता आला आहे. नावीन्यपूर्ण आणि निरोगी पदार्थांच्या विकासासाठी एक नवी दृष्टी त्यातून मिळते. घनपदार्थ, द्रव आणि वायू संयुगे यांना कोटिंग करण्यासाठी तंत्रज्ञान म्हणून ते प्रथम विकसित केले गेले होते ज्यामुळे त्यांचा नियंत्रित स्वरूपात आणि नेमका लक्ष्यित वापर विशिष्ट दराने करता येतो. रंगद्रव्ये किंवा जीवनसत्त्वे यांसारखे जैवसक्रिय घटक एनकॅप्स्युलेशन तंत्राद्वारे संरक्षित केले जातात, हानिकारक पर्यावरणीय घटकांपासून संरक्षण देतात आणि कार्यक्षम प्रक्रियेला गती देतात. नैसर्गिक रंगद्रव्यांच्या आरोग्याला चालना देणाऱ्या क्रियाकलापांचा वापर व्यापक लोकसंख्येपर्यंत करण्यासाठी कार्यशील खाद्यपदार्थांमध्ये केला जाऊ शकतो.

**नैसर्गिक रंगद्रव्यांचे प्रकार**

१. वनस्पती-आधारित रंगद्रव्ये - पाने, मुळे, फळे आणि फुलांमधून विविध रंगद्रव्ये काढली जातात. क्लोरोफिल (हिरवा), कॅरोटीनोइड (पिवळा ते लाल), आणि अँथोसायनिन (लाल, जांभळा, निळा) यांचा ह्या प्रकारात समावेश आहे.

२. खनिज-आधारित रंगद्रव्ये - नैसर्गिकरीत्या खनिजे मातीतून प्राप्त होतात. ओक्रेस (पिवळा, लाल, तपकिरी), मॅलाकाइट (हिरवा) आणि लॅपिस लाझुली (निळा) यांचा यात समावेश आहे.

३. प्राणी-आधारित रंगद्रव्ये - कीटक किंवा इतर प्राण्यांपासून मिळवलेली रंगद्रव्ये. उदाहरणार्थ, कोचीनियल (कोचीनियल कीटकांपासून लाल) आणि सेपिया (कटलफिशच्या शाईपासून तपकिरी) यांचा यात समावेश होतो.

चित्रकला आणि सजावट यात वापरले जाणारे रंग हे चमकदार आणि टिकाऊ स्वरूपाचे असतात. हे रंग चित्र काढण्यासाठी, मातीची भांडी आणि कापडांमध्ये वापरण्यासाठी आणि सौंदर्यप्रसाधन, नैसर्गिक व सुरक्षित मेकअप आणि स्किनकेअर उत्पादनांमध्ये वापरले जातात.

अन्नउद्योगात रंग - विविध प्रकारच्या अन्नउत्पादन उद्योगांमध्ये नैसर्गिकरित्या उत्पादनांना रंग देण्यासाठी वापरला जातो. श्रीखंडासाठी केशर वापरले गेले नसेल असे एकही महाराष्ट्रीय घर क्वचित असेल.

फायदे - नॉन-टॉक्सिक आणि इको-फ्रेंडली - सिंथेटिक रंगांच्या तुलनेत आरोग्य आणि पर्यावरणासाठी सामान्यतः सुरक्षित. ऐतिहासिक आणि सांस्कृतिक महत्त्व हे, की सांस्कृतिक वारसा जतन करून पारंपारिक हस्तकला आणि पद्धतींमध्ये वापरले जाते.

हे रंग वापरताना जी आव्हाने आहेत त्यात पुढील बाबींचा समावेश होतो.

१. किंमत आणि उपलब्धता : नैसर्गिक रंगद्रव्ये कृत्रिम पर्यायांपेक्षा अधिक महाग आणि कमी सहज उपलब्ध असू शकतात.

२. स्थिरता आणि सुसंगतता : त्यांच्यात विविध परिस्थितींमध्ये कमी स्थिरता असू शकते आणि रंग आणि तीव्रतेमध्ये भिन्नता असू शकते.

कृत्रिम रंग हे आधुनिक दैनंदिन जीवनाचा महत्त्वाचा भाग बनले आहेत. रासायनिक प्रक्रियांनी पदार्थांना रंग देण्यासाठी रंगांचा वापर केला जातो. सर्व रंगांची मागणी रासायनिक उद्योगांद्वारे पूर्ण केली जाते आणि यामुळे पर्यावरणीय प्रदूषकांची निर्मिती होते, ज्याचा मानव, प्राणी आणि पर्यावरणाच्या आरोग्यावर नकारात्मक परिणाम होतो. नैसर्गिक आणि कृत्रिम तंतूंमधील लहान-रेणूरंगांचे स्थलांतर गुणधर्म बऱ्याच काळापासून ज्ञात आहेत. जैविक विश्वातून येणारे रंग द्रव स्वरूपात असतात, तर कृत्रिम किंवा सिंथेटिक रंग पावडरच्या स्वरूपात असतात आणि त्यांना रंग देण्याच्या उद्देशाने मोठ्या प्रमाणात पाण्याची आवश्यकता असते. कापड आणि रंगद्रव्य उद्योग, डिस्टिलरी आणि टॅनरी हे काही उद्योग आहेत जे अतिशय गडद रंगाचे दूषित सांडपाणी सोडतात. कृत्रिम रंगांसारखी पर्यावरणात दीर्घकालीन टिकणारी संयुगे विघटनास अत्यंत प्रतिरोधक असतात आणि पेपर प्रिंटिंग, कलर फोटोग्राफी आणि अन्न आणि चामड्याच्या उद्योगांमध्ये त्यांचा उपयोग होतो. यामुळे विद्यमान आणि भविष्यातील पर्यावरणीय प्रदूषण कमी करण्याच्या मार्गावर लक्ष केंद्रित केले आहे. शाश्वत मानवी समाज राखण्यासाठी आपल्याला पर्यावरणीय उपाय आणि हरित

रसायनशास्त्र आवश्यक आहे. रंगांच्या विषारी, कार्सिनोजेनिक आणि इतर आरोग्य-संबंधित प्रभावांबद्दल जागरूकतेत प्रचंड वाढ झाली आहे ज्यांचा पूर्वी विचार केला जात नव्हता.

सेंद्रिय रंग हे सर्वात सामान्य प्रकारचे जल प्रदूषक आहेत, जे प्रामुख्याने छपाई, कापड आणि कागदनिर्मिती प्रक्रियेदरम्यान उत्सर्जित होतात. ग्रीस आणि मेण, चामडे, कापड, फार्मास्युटिकल, खाद्यपदार्थ, सौंदर्यप्रसाधने, केस, फर, प्लास्टिक आणि कागद तसेच सेन्सर, लेझर, फोटोग्राफी, ऑप्टिकल डेटा स्टोरेज, पेंटर आणि ब्राइटनर या सर्वांवर रंग लागू केले आहेत. उच्च जेट ब्लॅक, धुळीचा अभाव, उच्च विद्राव्यता आणि इतर फायद्यांमुळे, अझो रंगांचा वापर आता वारंवार केला जातो. जगाच्या काही भागांमध्ये स्वच्छ आणि ताजे पाण्याची कमतरता, जी घरगुती किंवा औद्योगिक वापराद्वारे मनुष्याच्या क्रियाकलापांमुळे वाढली आहे, हे चिंतेचे जुने कारण आहे. सांडपाणी मुद्रित करणे आणि रंगवणे हे इतर बाबींबरोबरच लोकर आणि रेशीम रंगवण्याचे आणि फिनिशिंगचे काम करणाऱ्या कारखान्यांद्वारे सोडले जाणारे जलीय सांडपाणी आहे. प्रिंटिंग आणि डाईंगच्या सांडपाण्यात रंग, क्षार आणि इतर दूषित पदार्थांचे प्रमाण जास्त असते.

अन्नउद्योगात भरीव प्रगती झाली असली, तरी अन्नपदार्थातील भेसळ हा जागतिक स्तरावर सार्वजनिक चिंतेचा विषय बनला आहे. खरं तर, बाजारात उपलब्ध असलेल्या अन्न उत्पादनांमध्ये कीटकनाशके, प्रतिजैविक, संरक्षक आणि रंगीत घटक यांसारखे अवैध घटक असू शकतात. एकदा सेवन केल्यावर, या विषारी पदार्थांमुळे अवयव निकामी होणे, हृदयरोग आणि कर्करोग यांसारख्या आरोग्यसमस्या उद्‌भवू शकतात ज्यामुळे शेवटी मानवी जीवनाचा कालावधी आणि सामाजिक आरोग्यव्यवस्था बिघडते. सरफेस एन्हांस्ड रमन स्पेक्ट्रोस्कोपी (SERS) हे एक नवीन आणि अतीसंवेदनशील विश्लेषण तंत्र विकसीत झाले असून त्यामध्ये अन्नात असलेले अतिसूक्ष्म घटक जाणून घेण्याची जबरदस्त क्षमता आहे.

कृत्रिम रंग रासायनिक पद्धतीने संश्लेषित केले जातात, विशेषत: पेट्रोलियम किंवा कोळशाच्या डांबरापासून. उत्पादनांना ज्वलंत आणि सुसंगत रंग देण्यासाठी ते विविध उद्योगांमध्ये मोठ्या प्रमाणावर वापरले जातात. अन्न आणि पेय उद्योगात, ते कँडीज, सॉफ्ट ड्रिंक्स आणि बेक केलेल्या पदार्थांचे दृश्य आकर्षण वाढवतात. सौंदर्यप्रसाधनांमध्ये, ते लिपस्टिक, आयशॅडो आणि शॅम्पूसारख्या उत्पादनांमध्ये असे रंग वापरले जातात. फार्मास्युटिकल, कापड आणि प्लास्टिकमध्येही कृत्रिम रंग वापरले जातात.

कृत्रिम रंगांचे प्रकार FDC रंग : हे अमेरिकेमधील खाद्यपदार्थ (food), औषधे (drugs) आणि सौंदर्यप्रसाधनांमध्ये (cosmetics) वापरण्यासाठी अन्न आणि औषध प्रशासनाद्वारे मंजूर करण्यात आले आहेत. FDC (फूड, ड्रग आणि कॉस्मेटिक) रंग हे सिंथेटिक रंग आहेत जे अन्न, औषधे आणि सौंदर्यप्रसाधनांमध्ये वापरण्यासाठी यू.एस. FD द्वारे प्रमाणित केले जातात. ते कोळशाच्या डांबरापासून बनवलेले असतात आणि त्यात जड धातूचे क्षार असतात जे त्वचेसाठी विषारी असू शकतात आणि कर्करोगजन्य असू शकतात. FDC रंगांमध्ये पुढील रंगांचा समावेश आहे-

FDC यलो ५ : टारट्राझिन किंवा ए १०२ म्हणूनही ओळखले जाते, हा अझो प्रकारचा लिंबासारखा पिवळा रंग तयार करतो आणि उष्णता आणि प्रकाशात स्थिर असतो. हा रंग आइसक्रीम, मिठाई, सॉस आणि पेयांमध्ये वापरला जातो.

FDC यलो ६ : सनसेट यलो म्हणूनही ओळखला जातो, हा रंग नारिंगी रंग तयार करतो.

FDC ब्लू १ : याला ब्रिलियंट ब्लू FCF म्हणूनही ओळखले जाते, या कृत्रिम खाद्य रंगात हिरव्या निळ्या रंगाची छटा आहे आणि त्याचा वापर बेक केलेले पदार्थ, मिठाई, मिष्टान्न आणि शीतपेयांमध्ये केला जातो.

FDC ब्लू २ : इंडिगोटीन म्हणूनही ओळखले जाणारे, हा रंग रॉयल निळा रंगाचा आहे परंतु त्याची की स्थिरता कमी आहे आणि सर्व खाद्य रंगांमध्ये कमी विरघळणारा आहे.

FDC रेड ३ : Erythrosine, E127, CI Food Red 14, किंवा CI #45430 या नावानेही ओळखला जातो, हा चमकदार गुलाबी, पाण्यात विरघळणारा डाई कमी pH प्रणालींमध्ये अविद्राव्य आहे आणि त्याची प्रकाशस्थिरता कमी आहे.

FDC रेड ४ : Allura Red म्हणूनही ओळखला जातो, हा रंग नारिंगी लाल रंगाची छटा निर्माण करतो.

डी अँड सी रंग : औषधे आणि सौंदर्यप्रसाधनांमध्ये वापरण्यासाठी मंजूर केले आहेत परंतु खाद्यपदार्थांमध्ये ते वापरता येत नाहीत.

**कृत्रिम रंगांचे फायदे**

१. सुसंगतता आणि चमकदारपणा : कृत्रिम रंग एकसमान देखावा देतात आणि अनेक नैसर्गिक रंगांपेक्षा उजळ, अधिक चमकदार असतात.

२. स्थिरता : प्रकाश, उष्णता आणि आम्लीय किंवा क्षारीय स्थितींमुळे ते सहसा फिकट होत नाहीत, ज्यामुळे ते बराच काळ टिकणाऱ्या उत्पादनांसाठी आदर्श बनतात.

३. स्वस्त उत्पादन : कृत्रिम रंग उत्पादनासाठी सामान्यतः स्वस्त असतात आणि स्थिर पुरवठा सुनिश्चित करून मोठ्या प्रमाणात उत्पादित केले जाऊ शकतात.

आरोग्यविषयक चिंता आणि नियामक पैलू ॲलर्जी आणि संवेदनशीलता : काही व्यक्तींना पिवळा क्रमांक ५ सारख्या विशिष्ट कृत्रिम रंगांची ॲलर्जी किंवा संवेदनशीलता येऊ शकते,

ज्यामुळे अतिसंवेदनशील व्यक्तींना त्रास होऊ शकतो.

लहान मुलांमध्ये अतिक्रियाशीलता : संशोधनातून कृत्रिम रंग आणि मुलांमधील अतिक्रियाशीलता यांच्यातील संभाव्य संबंध सुचवला आहे, त्यामुळे अधिक कठोर नियम आणि लेबलिंग आवश्यकतांची मागणी होत आहे.

कर्करोगजन्यता : काही कृत्रिम रंगांच्या कर्कजन्य असण्याच्या संभाव्यतेबद्दल चिंता व्यक्त केली गेली आहे. उदाहरणार्थ, रेड नंबर ३ (एरिथ्रोसिन) प्राण्यांच्या अभ्यासात कर्करोगाशी संबंधित असल्यामुळे अन्न आणि औषध प्रशासनाने त्यावर अंशतः बंदी घातली आहे.

अन्न आणि औषध प्रशासन (FD), युरोपीयन फूड अँड सेफ्टी असोसिएशन (EFS) आणि इतर नियामक संस्था कृत्रिम रंगांच्या सुरक्षिततेचे मूल्यांकन करतात आणि त्यांच्या वापरासाठी अनुज्ञेय मर्यादा निश्चित करतात. या पदार्थांमुळे आरोग्यास महत्त्वपूर्ण धोका निर्माण होणार नाही याची खात्री करण्यासाठी त्यांना उत्पादकांनी कठोर चाचणी घेणे आवश्यक आहे.

ग्राहक प्राधान्ये आणि उद्योग कल : नैसर्गिक वि. कृत्रिम-आरोग्य आणि निरोगीपणाबद्दल वाढती जागरूकता अनेक ग्राहकांना कृत्रिम रंगांपेक्षा नैसर्गिक रंगांना प्राधान्य देण्यास प्रवृत्त करते. नैसर्गिक रंग फळे, भाज्या आणि खनिजे यांसारख्या स्रोतांमधून प्राप्त होतात.

क्लीन लेबल मूव्हमेंट : क्लीन लेबलिंगकडे कल, जिथे उत्पादनांमध्ये कमी आणि अधिक ओळखण्यायोग्य घटक असतात, त्यामुळे उत्पादकांना नैसर्गिक पर्यायांसह कृत्रिम रंग बदलण्यास प्रवृत्त केले आहे. नैसर्गिक रंगरंगोटीची उच्च किंमत आणि कमी स्थिरता यामुळे हा बदल आव्हानात्मक असू शकतो.


विविध उद्योगांमध्ये उत्पादनाचे आकर्षण आणि सुसंगतता वाढवून कृत्रिम रंग महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. त्यांचे फायदे असूनही, आरोग्यविषयक चिंता आणि ग्राहकांच्या बदलत्या पसंती उद्योगांना नैसर्गिक पर्यायांचा शोध घेण्यास आणि अवलंब करण्यास प्रवृत्त करत आहेत. नियामक निरीक्षण हे सुनिश्चित करणे सुरू ठेवते की ग्राहक उत्पादनांमध्ये वापरलेले कृत्रिम रंग निर्दिष्ट मर्यादेत सुरक्षित आहेत.

आपल्याकडे देवादिकांच्या मूर्तींसाठी जे रंग वापरले जातात ते ठसठशीत, आकर्षक आणि सहजी फिकट न होणारे असे अपेक्षित असतात. विशेषतः श्री गणेश आणि श्री दुर्गामाता यांच्या मोठमोठ्या मूर्ती बनवण्याचा फार मोठा उद्योग देशात आहे. या मूर्तींचे उत्सवानंतर पाण्यामध्ये विसर्जन केले जाते. त्यामुळे मूर्तींसाठी वापरलेले रंग हे जलप्रदूषण करू शकतात. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने यासाठी काही विशिष्ट प्रकारच्या मूर्तींवर बंदी घातली आहे. शाडूच्या मूर्ती वापरून नैसर्गिक रंगांचा त्यात वापर केला उत्सवानंतर पर्यावरणाची जी हानी होते, ती टाळता येईल. धातूच्या मूर्तींची प्रतिष्ठापना केली आणि त्यांचे प्रतीकात्मक विसर्जन घरच्या घरी बादलीत केले तर पर्यावरणपूरक उत्सव साजरा होऊन सर्वांनाच आनंद मिळेल.

**– शरद काळे**

sharadkale@gmail.com

॥ग्रंथाली॥




प्रवरेचा दाता

दादासाहेब रूपवते

मूल्य ३०० रुपये
सवलतीत २०० रुपये

बे दुणे पाच!

सारिका कुलकर्णी

मूल्य २०० रुपये
सवलतीत १२० रुपये



# साहित्य मंदिरात अवतरले कवितेचे इंद्रधनू



**कवी दिनेश अडावदकर, दिनकर गांगल, कौशल इनामदार, अनुपमा कुलकर्णी, मृदुला गडणीस आणि सुभाष कुलकर्णी**

मराठी साहित्य संस्कृती व कला मंडळ वाशी येथील साहित्य मंदिर सभागृहात महाकवी कालिदास दिनानिमित्त दिनेश अडावदकर यांच्या ‘माझे इंद्रधनु’ या काव्यसंग्रहाचं प्रकाशन नुकतंच करण्यात आलं.

ग्रंथाली मुद्रण सुविधा केंद्र निर्मित या पुस्तकाचं प्रकाशन सुप्रसिद्ध संगीतकार कौशल इनामदार आणि ज्येष्ठ साहित्यिक आणि ज्येष्ठ पत्रकार व लेखक दिनकर गांगल यांच्या हस्ते करण्यात आलं.

दिनकर गांगल यांनी यावेळी आपलं मनोगत व्यक्त करताना वाचनातून माणूस कसा ओळखता येऊ शकतो हे फार सुंदर पद्धतीनं स्पष्ट केलं.

वेगवेगळ्या प्रसंगातून कवीला कविता कशी भेटत जाते हे सांगत, कला ही आवडो वा न आवडो पण ती खरी असायला हवी, असं या प्रकाशन सोहळ्याचे प्रमुख पाहुणे सुप्रसिद्ध संगीतकार कौशल इनामदार यांनी यावेळी सांगितलं.

महाकवी कालिदासाच्या साहित्याचा वेध घेत ‘मेघदूत’ या महाकाव्याची व त्याच्या मराठी अनुवादाची वैशिष्ट्यं यावेळी प्रा. मृदुला गडणीस यांनी उलगडली.

कवी दिनेश अडावदकर यांनी या प्रसंगी ‘आषाढ सरी’ ही आपली कविता सादर करून रसिकांची मनं जिंकली.

मंडळाचे संस्थापक अध्यक्ष सुभाष कुलकर्णी, कला मंडळाचे पदाधिकारी दिलीप जांभळे मराठीच्या निवृत्त शिक्षिका प्रा. अनुपमा कुलकर्णी हे मान्यवर यावेळी उपस्थित होते.

अत्यंत रंगलेल्या या दिमाखदार सोहळ्याची सुरुवात मान्यवर अभिजात कवींच्या रचनांवर आधारित ‘घनु बरसे शब्दांचा’ ह्या स्वरार्चना, मुंबई निर्मित संगीतमय कार्यक्रमाने करण्यात आली. भगवान दभडे आणि अर्चना अडावदकर या गायक कलाकारांना पुंडलिक कोल्हटकर, आशिष राणे आणि व्यंकटेश कुलकर्णी या वादकांनी साथसंगत केली.


दीप्ती लेले आणि प्रीती किरकीरे यांच्या समयोचित व रसाळ निवेदनाने कार्यक्रमाची रंगत अधिकच वाढली.

•

ग्रंथाली

माझे इंद्रधनू

दिनेश अडावदकर



मूल्य २०० रुपये

सवलतीत १२० रुपये

# मधुरा इंदापवार लिखित 'नदी वाहते आहे' पुस्तकाचे प्रकाशन




**प्रकाशनसमयी वसंत वाहोकार, डॉ. रवींद्र शोभणे, वि.सा. संघाचे अध्यक्ष प्रदीप दाते, सुप्रिया अय्यर व लेखिका मधुरा इंदापवार**

'जगण्याविषयीची समज मधुराच्या कथेत आढळते. तिच्या लिखाणातून तिचा मानवी स्वभावाचा अभ्यास खोलवर असल्याचे दिसून येते. मला कथालेखनात आशाताई बगे सर्वाधिक भावतात. त्यांच्या कथा सशक्त आहेत. आशाताईंनंतर विदर्भाला तशी सशक्त कथालेखिका म्हणून मधुरा इंदापवार लाभली आहे', असे मत ९७व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. रवींद्र शोभणे यांनी व्यक्त केले.

विदर्भ साहित्य संघ आणि ग्रंथाली यांच्या संयुक्त विद्यमाने मधुरा इंदापवार यांच्या 'नदी वाहते आहे' या कथासंग्रहाचे प्रकाशन त्यांच्या हस्ते करण्यात आले त्यावेळी ते बोलत होते. विदर्भ साहित्य संघाच्या अमेय दालनात झालेल्या या समारंभाचे अध्यक्षपद संघाचे अध्यक्ष प्रदीप दाते यांनी भूषवले. प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ कथाकार, कादंबरीकार सुप्रिया अय्यर, ज्येष्ठ साहित्यिक वसंत वाहोकार आणि लेखिका मधुरा इंदापवार यांची व्यासपीठावर उपस्थिती होती.


वसंत वाहोकार म्हणाले, हा कथासंग्रह मला सर्वार्थाने आवडला आहे. मला या कथांमध्ये गांभीर्य आढळले. संग्रहात कथेचा घाट, संवाद, भाषा यांचा चांगला समन्वय साधला गेला आहे. या संवादाने मनात घर केल्याचे वाहोकार म्हणाले.

प्रदीप दाते यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले. कथाकार मधुरा इंदापवार यांनी, याच सभागृहात झालेल्या कार्यशाळेत कथा लिहिण्याचे बीज रोवले गेले असल्याची भावना प्रास्ताविकात व्यक्त केली. कार्यक्रमाचे संचालन अदिती देशमुख यांनी केले. ●

ग्रंथाली

**नदी वाहते आहे**

**मधुरा इंदापवार**




**मूल्य ३०० रुपये**
**सवलतीत १८० रुपये**

# किरण रोणे लिखित 'लावण्य नक्षत्र' पुस्तकाचे प्रकाशन




**प्रकाशनसमयी सुदेश हिंगलासपूरकर, डॉ. गणेश चंदनशिवे, लेखिका किरण रोणे आणि पै फ्रेण्ड्स लायब्ररीचे पुंडलिक पै**


पै फ्रेण्ड्स लायब्ररीच्या सहकार्याने 'ग्रंथाली' प्रकाशित किरण रोणे लिखित 'लावण्य नक्षत्र' या पुस्तकाचे प्रकाशन शनिवार, २२ जुलै २०२४ रोजी डोंबिवली येथे डॉ. गणेश चंदनशिवे, लोककला अकादमी विभागप्रमुख, मुंबई विद्यापीठ यांच्या हस्ते करण्यात आले. गणेश चंदनशिवे यांनी, ''हे पुस्तक अनेक विद्यापीठांमध्ये अभ्यासक्रमासाठी घेतलं जाऊ शकतं. हा लावणीचा आधुनिक काळातील इतिहास आहे. ही कहाणी आपल्या जीवनाशी निगडित आहे. पठ्ठेबापूराव आणि पवळा यांचं नातं यात दिसतं. यात अण्णाभाऊंची शकुंतला दिसते.' असे म्हणत आजच्या काळातील तरुणीने इतकी अभ्यासपूर्ण कादंबरी लिहिली याबद्दल लेखिकेचे कौतुक केले. त्यांनी याप्रसंगी लावणीचा इतिहासदेखील उलगडून सांगितला. किरण रोणे यांनी 'लावणी' विषयावर का लिहावेसे वाटले, बालपणापासून झालेले वाचनसंस्कार, त्यातून येणारी प्रगल्भता व त्यातून घडणारे लेखन याचे सुंदर विवेचन केले.

पै फ्रेण्ड्स लायब्ररीचे प्रमुख पुंडलिक पै आणि 'ग्रंथाली'चे विश्वस्त सुदेश हिंगलासपूरकर यांनी आपली मनोगते व्यक्त केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रसिका कुसूरकर यांनी केले. रोणे कुटुंबीयांच्या वतीने सुभाष रोणे यांनी आभार मानले. ●

॥ग्रंथाली॥

**लावण्य नक्षत्र**

किरण भरत रोणे




**मूल्य ३०० रुपये**
**सवलतीत १८० रुपये**

# ऐल तटावर पैल तटावर – कथाविशेष भाग २




'ऐल तटावर पैल तटावर' कथाविशेष भाग २ कार्यक्रमात संवाद साधताना सुनंदा भोसेकर आणि राणी दुर्वे

ग्रंथाली-प्रतिभांगण आयोजित 'ऐल तटावर पैल तटावर' या साहित्यविषयक कार्यक्रमाच्या दुसऱ्या भागात कवयित्री सुनंदा भोसेकर व लेखिका राणी दुर्वे यांनी २८ जून २०२४ रोजी कथाविशेषचा दुसरा भाग सादर केला. कथा विशेषच्या पहिल्या भागात सुनंदा व राणी यांनी साठोत्तरी कथाकारांपासून आपल्या मांडणीला सुरुवात केली. पहिल्या पिढीतील गाडगीळ-गोखले, माडगूळकर आदी कथाकार व चौथ्या पिढीतील सुतार, गुरव, कुडू, शिल्पा कांबळे आदी कथाकारांविषयी या दोघींनी विश्लेषण व कथांचे अभिवाचन केले. तर पुढील टप्प्यात म्हणजेच कथाविशेषच्या दुसऱ्या भागात त्यांनी नवकथेच्या मधल्या दोन पिढ्यांच्या कथालेखनाविषयी व स्त्रियांच्या कथालेखनाविषयी मांडणी केली. विवेचन व अभिवाचन या दोन्ही अंगांनी केलेली मांडणी कथा वाङ्मयाच्या विस्तीर्ण अवकाशावर प्रकाशझोत टाकणारी होती.

गूढकथा, विज्ञानकथा, विनोदी कथा अशा विविध स्वरूपाच्या कथांचा धांडोळा या भागात घेण्यात आला. कथालेखनाचा एवढा मोठा अवकाश एका भागातून मांडताना कथालेखकांच्या लेखनाचे टिपलेले काही सूक्ष्म पदर वैशिष्ट्यपूर्ण होते. जसे की रत्नाकर मतकरींविषयी केलेले पुढील भाष्य- 'मतकरींची ओळख गूढकथांपुरती मर्यादित ठेवणे योग्य ठरणार नाही. मतकरींचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी आपली राजकीय विचारसरणी कधी लपवली नाही. किंबहुना आपल्या साहित्यकृतींमधून त्यांनी त्याचा स्पष्टपणे उच्चारदेखील केला.' राणी व सुनंदा यांनी लेखक-लेखिकांच्या लेखनवैशिष्ट्यांची शैली व आशय या दोन्ही अंगांनी केलेली मांडणी उल्लेखनीय होती. जयंत नारळीकर, सुबोध जावडेकर, लक्ष्मण लोंढे व अलीकडच्या काळातील विज्ञान कथालेखक; विनोदी कथालेखन करणारे शंकर पाटील, द. मा. मिरासदार, मुकुंद टाकसाळे, मंगला गोडबोले आदी कथाकारांच्या लेखनाचा ओघवत्या शैलीत वेध घेत कथाविशेषचा भाग दुसरा अधिकाधिक रंगत गेला. विद्याधर पुंडलिक, भारत सासणे, भाऊ पाध्ये, मोनिका गजेंद्रगडकर, जी.ए. कुलकर्णी, जयंत पवार आदी लेखक-लेखिकांच्या कथांमधील काही अंशाचे अभिवाचन राणी व सुनंदा यांनी केले. कुसुमावती देशपांडे, वसुंधरा पटवर्धन, विजया राजाध्यक्ष, सरिता पदकी, गौरी देशपांडे, मेघना पेठे, आशा बगे इत्यादी स्त्रीलेखिकांच्या लेखनामागील सामाजिक पार्श्वभूमी व त्यांचे लेखन या पैलूवरही कार्यक्रमात प्रकाश टाकण्यात आला. 'ऐल तटावर पैल तटावर – कथा विशेष'चे दोन्ही भाग ग्रंथाली-प्रतिभांगण या यूट्यूब चॅनेलवर पाहता येतील. तसेच, हा कार्यक्रम पाहिल्यानंतर प्रेक्षकांनी roopdarshan@yahoo.com या इमेल आयडीवर आपल्या प्रतिक्रिया कळवाव्यात, असे आवाहन राणी दुर्वे व सुनंदा भोसेकर यांनी केले आहे. ●

# ऑफबिट प्रवास भ्रमंतीकाराचा




**सुधीर धर्माधिकारी यांच्याशी संवाद साधताना आत्माराम परब**

ईशा टूर्स आणि ग्रंथाली-प्रतिभांगण आयोजित 'आनंदयात्रा पर्यटनाची' या कार्यक्रमाच्या चौथ्या भागात राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पुरस्कारप्राप्त छायाचित्रकार सुधीर धर्माधिकारी यांच्याशी आत्माराम परब यांनी संवाद साधला.

नोकरीत सेवानिवृत्त झाल्यावर आयुष्यामध्ये एक मोठी पोकळी निर्माण होते असे सर्वसामान्यपणे दिसते. धर्माधिकारी यांनासुद्धा ही पोकळी जाणवली होती. त्यांनी त्यावर मात केली पर्यटन व फोटोग्राफीच्या माध्यमातून.

सुरुवात पर्यटनाने झाली आणि त्यातूनच नव्याने निर्माण झालेला फोटोग्राफीचा छंद जपत असताना, या वयात त्यांनी त्यात नवीन काहीतरी शिकण्याची उमेद बाळगली. फोटोग्राफीत ते प्रावीण्य मिळवत गेले. पुढे त्यांनी अनेक प्रदर्शनांमध्ये सहभाग घेतला. कॉम्पुटर, फोटोशॉप, सोशल मीडिया यांसारख्या नवनवीन बाबी शिकून हौशी छायाचित्रकार ते फोटोग्राफिक सोसायटी ऑफ इंडिया या नामवंत संस्थेच्या सचिवपदापर्यंतचा त्यांचा प्रवास खूपच प्रेरणादायी आहे.

सहल कोणतीही असो त्यामध्ये जीव ओतून सहभाग घेऊन निसर्ग, वाइल्ड लाइफ, पक्षिनिरीक्षण, धार्मिक यात्रा अशा विविध अंगांनी त्यांनी भारतात आणि परदेशात प्रचंड भटकंती केली आणि ते अनुभवसंपन्न झाले. त्यांचा हा प्रेरणादायी प्रवास या मुलाखतीत उलगडला.

रविवार, २१ जुलै २०२४ रोजी ठाण्याच्या स्व. हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे सभागृहात झालेल्या या मुलाखतीत परब यांनी विचारलेल्या नेमक्या प्रश्नांना धर्माधिकारी यांनी दिलखुलास उत्तरे दिली.

'आरंभी अनेक फोटो काढले त्यात दोन जरा बरे आले,' असे सांगत त्यांनी ते अधिकाधिक चांगले येण्यासाठी आत्माराम परब, शर्मा अशा व्यक्तींनी केलेल्या मार्गदर्शनाचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख केला. एका प्रदर्शनातले त्यांचे फोटो पाहून गौतम राजाध्यक्ष यांनी त्यांचे कौतुक केल्याची आठवण त्यांनी सांगितली. धर्माधिकारी सांगतात, 'तेव्हा लक्षात आलं आपल्यात स्पार्क आहे!' त्यांनी भारतातील ८० टक्के जंगले पाहिली, त्यात फोटोग्राफी कशी केली, ६५व्या वर्षी समुद्रकिनारी रांगत आय लेव्हल फोटो कसे घेतले अशी रोचक माहिती दिली. छायाचित्रण करताना ते कसे असावे याबद्दल ते म्हणाले,

'पक्ष्यांचे फोटो असे आले पाहिजेत की त्यांचे आय ब्रो दिसले पाहिजेत. डिटेल महत्त्वाचे, त्यासाठी दिवस दिवस वाट पाहण्याची तयारी हवी... मला सहा वेळा वाघ दिसला नाही... मात्र मी निराश झालो नाही. या निसर्गात बरेच काही आहे, त्याचा आनंद घेतला. निसर्गाचे आणि पर्यावरणाचे रक्षण आपण केले पाहिजे.'

'वयाच्या एक टप्प्यावर स्ट्रीट फोटोग्राफी सुरू केली कारण आता ट्रायपॉड, जड कॅमेरे घेऊन जाणे वयामुळे जमेना, हा सिग्नल आरोग्याचा होता... मी वृद्धांपेक्षा नेहमी तरुणाबरोबर राहतो, कारण ते थकल्याची, कंटाळल्याची कटकट नसते,' हे सत्तरीपुढचे धर्माधिकारी सांगतात तेव्हा त्यांचा फोटोग्राफीबाबत ध्यास आणि प्रामाणिक गुंतणे दिसते.

ही मुलाखत काही दिवसांत ग्रंथाली प्रतिभांगण या यूट्यूब चॅनेलवर पाहता येईल. ●

# अध्ययन अक्षमता या विषयावर डॉ. मोना गजरे यांची मुलाखत




**डॉ. मोना गजरे यांच्याशी संवाद साधताना सुधा तुंबे**

ग्रंथाली-प्रतिभांगण आयोजित दिव्यांग व विशेष व्यक्तींच्या समस्या यावर आधारित 'काहीतरी विशेष' या कार्यक्रमाच्या तिसऱ्या भागात, २५ जुलै २०२४ रोजी बालरोग न्यूरोलॉजिस्ट आणि विकासात्मक विकार विशेषज्ञ डॉ. मोना गजरे यांना आमंत्रित करण्यात आले होते. डॉ. मोना या न्यूरॉलॉजी व विकासात्मक विकार या क्षेत्रात गेली २५ वर्षे कार्यरत असून सायन इस्पितळात त्या अध्यापनदेखील करतात. राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय जर्नल्समधून त्यांचे शोधनिबंध प्रसिद्ध झालेले असून राष्ट्रीय-आंतराष्ट्रीय पातळीवरील विविध सेमिनार्समध्ये त्यांचा सहभाग राहिला आहे. लेखिका सुधा तुंबे यांनी 'अध्ययन अक्षमता' या विषयावर डॉ. मोना यांची मुलाखत घेऊन त्यांना बोलते केले तर ग्रंथाली समन्वयक अश्विनी भोईर यांनी प्रास्ताविक केले.

एखाद्या मुलाला अध्ययन अक्षमता (Learning disability) आहे याचे निदान कसे केले जाते, अशा मुलांशी पालक-शिक्षकांचे नाते कसे असावे, या मुलांचे करिअर, शासनाकडून दिल्या जाणाऱ्या कायदेशीर सवलती, अध्ययन अक्षमता असलेल्या मुलांच्या सक्सेस स्टोरी अशा विविध प्रश्नांवर डॉ. मोना यांनी मनमोकळेपणाने माहिती दिली.

अध्ययन अक्षमता म्हणजे काय, या प्रश्नाला उत्तर देताना डॉ. मोना म्हणाल्या की अशा मुलांना वाचन, लेखन व गणिती संकल्पना समजण्यात अडथळे येत असतात. स्लो लर्निंग व अध्ययन अक्षमता यात फरक आहे व हा फरक बुद्ध्यांक चाचणीतून स्पष्ट होत असतो. त्या असे सांगून म्हणाल्या, की अध्ययन अक्षमता आपल्या मुलाला आहे याचे निदान झाल्यावर पालकांनी सकारात्मक राहून परिस्थितीचा स्वीकार केला पाहिजे व डॉक्टर, समुपदेशक यांच्या मदतीने त्या मुलांना योग्य ती दिशा दाखविली पाहिजे. अशी मुले खरे तर अतिशय सर्जनशील असतात. त्यांच्याकडे काय गुण आहेत त्याकडे विशेषत्वाने लक्ष देऊन त्या गुणांना चालना दिली पाहिजे, असे विचार डॉ. मोना यांनी मांडले. अध्ययन अक्षमता असलेल्या मुलांना, व्यक्तींना शिक्षण घेण्यासाठी प्रोत्साहन म्हणून विविध सवलती व मदत देण्यात, नोकरीमध्ये कायदेशीर तरतुदी राखण्यात संपूर्ण देशात महाराष्ट्र अग्रेसर आहे, असे डॉ. मोना यांनी विशेषत्वाने नमूद केले. श्रोत्यांनी विचारलेल्या प्रश्नांनाही त्यांनी मनमोकळेपणाने उत्तरे दिली. श्रोत्यांमध्ये उपस्थित असलेले सनदी लेखापाल प्रवीण शिंदे यांनी पालकांच्या भूमिकेविषयी मांडलेले विचार अंतर्मुख करणारे होते. ते म्हणाले की प्रत्येक पालकाला असे वाटते की आपले मूल अभ्यासात हुशारच असले पाहिजे, पालकांनी ही मनोभूमिका बदलायला हवी. आपल्या मुलात कोणतीही शारीरिक व मानसिक कमतरता असल्यास, आहे ती परिस्थिती स्वीकारून, मुलाचा कल ओळखून त्या मुलाला योग्य ती दिशा दाखवली पाहिजे. अध्ययन अक्षमता या विषयावरील डॉ. मोना गजरे यांची मुलाखत आपल्याला लवकरच ग्रंथाली-यूट्यूब चॅनेलवर पाहता येईल. ●

# ‘ग्रंथाली-प्रतिभांगण’मध्ये रंगली कवितांची मैफल




**कविता विशेषचा पहिला भाग सादर करताना सुनंदा भोसेकर आणि राणी दुर्वे**

ग्रंथाली-प्रतिभांगण प्रस्तुत ‘ऐल तटावर पैल तटावर’ या कार्यक्रमाच्या चौथ्या भागात कवयित्री सुनंदा भोसेकर व लेखिका राणी दुर्वे यांनी ३० जुलै २०२४ रोजी कविता विशेषचा पहिला भाग सादर केला. राणी यांनी आपले वडील रवींद्र दुर्वे यांच्या ‘याद’ या कवितेच्या वाचनाने कार्यक्रमाची सुरुवात केली. यानंतर साठोत्तरी कालखंडापासूनचा काव्यप्रवास या दोघी जणी विवेचन व काव्यवाचन या दोन्ही अंगांनी उलगडत गेल्या. मर्ढेकर १९३९पासून लिहीत होते आणि १९५६मध्ये त्यांचे निधन झाले. ते साठोत्तरी कवी नसले, तरीही मराठीतील नव्या कवितेचे अग्रदूत मर्ढेकरच आहेत असे विवेचन करून मर्ढेकरांच्या ‘पिपात मेले ओल्या उंदीर, माना पडल्या, मुरगळल्याविण’ तसेच ‘भटकत फिरलो भणंग आणिक, मिळेल तिथे पाणी प्यालो’ या कवितांचे वाचन करण्यात आले.


एक-सव्वा तासाच्या कार्यक्रमात सर्वच कवींच्या काव्याची चर्चा करता येणे अशक्य आहे; काही नवे-जुने या भागात व काही दुसऱ्या भागात सामावण्याचा प्रयत्न करू, तरीही एकूण काव्याचा परीघ मोजणे अपुरेच पडणार आहे, याचे मान आहे हे नमूद करून, या दोघींनी प्रवाही व अभ्यासपूर्ण निवेदन आणि एकापाठोपाठ एक विविध कवींच्या संस्मरणीय कवितांचे वाचन यातून कविता विशेषचा पहिला भाग उत्तरोत्तर रंगत गेला. छंदोबद्ध, लयबद्ध कवितेचे उदाहरण म्हणून सादर केल्या गेलेल्या आरतीप्रभूंच्या ‘सरसर सरसर वाजे, पत्ताच पत्ताच नाही, वाऱ्याशी निरोप आला, आत्ताच आत्ताच नाही’ या कवितेने कर्यक्रमात न्यारीच मजा आणली. कवितेच्या लयीवर सर्वच श्रोत्यांनी ठेका धरत, मान डोलावत कवितेचा आस्वाद घेतला. म.म. देशपांडे, ग.दि. माडगूळकर, इंदिरा संत, कवी अनिल, भा.रा. तांबे, बा.भ. बोरकर, कुसुमाग्रज, दिलीप चित्रे, अरुण कोल्हटकर,कवी म्हणून फारसे दखल न घेतले गेलेले भालचंद्र नेमाडे, आपल्या कवितेतून जळजळीत विद्रोह व्यक्त करणारे नामदेव ढसाळ, दया पवार, ग्रेस, प्रभा गणोरकर, हायकूकार शिरीष पै, अनुराधा पोतदार,मल्लिका अमरशेख, विंदा करंदीकर, वसंत आबाजी डहाके, भारती बिर्जे-डिग्गीकर आदी कवी व कवयित्रींच्या कवितांचे वाचन व कवितेच्या प्रांगणातील विविध प्रवाहांचा वेध घेत राणी व सुनंदा यांनी तब्बल सव्वा दोन तास अभ्यासपूर्ण व रंगतदार कार्यक्रम सादर केला. कार्यक्रमाच्या सुरुवातीस अश्विनी भोईर यांनी प्रास्ताविक करताना कवयित्री सुनंदा भोसेकर यांच्या लवकरच प्रकाशित होणाऱ्या ‘गळ्यावरचा निळा डाग’ या काव्यसंग्रहातील ‘रंगांधळ्यांच्या गावात’ ही कविता सादर केली. तर कवयित्री सुनंदा भोसेकर यांनी ‘एकलीच राहू दे मला’ ही स्वरचित कविता सादर करून ऐल तटावर पैल तटावर या कार्यक्रमाचा कविता विशेष पहिल्या भागाचा समारोप केला. ●

## ग्रंथपान



**चांगदेव काळे**
**९८६९२०७४०३**

**लिंडबर्ग**
**जगावेगळा**
**नीला चांदोरकर**




**अफाट कर्तृत्व आणि व्यक्तिमत्त्व**

'अनेक प्रकारची तंत्रज्ञानविषयक आव्हानं आता अमेरिकेसमोर होती. त्यांना सामोरे जाण्यासाठी लिंडबर्गनं आपलं काम सुरू केलं. वयाच्या ४२ व्या वर्षी पुन्हा एकदा लिंडबर्ग विमानांची चाचणी घेणारा वैमानिक टेस्ट पायलट म्हणून काम करू लागला. तेव्हाही युद्धामुळे जी अपरिमित हानी होते त्यातला मुख्य भाग मानवी संस्कृतीला लागलेला कलंक असतो, हा विचार त्याच्या मनाला पुढली अनेक वर्षं कुरतडत राहिला...'

आयुष्यात स्वप्ने पाहणारी आणि ती प्रत्यक्षात उतरवणारी अनेक नामवंत मंडळी होऊन गेली आहेत. त्यांच्याविषयी आपण पुस्तकांच्या माध्यमातून वाचले आहे, परंतु विद्यालय शिक्षणाला राम राम ठोकून स्वतःच्या ध्येयाकडे वळणारी माणसे विरळच असतात. ती जेव्हा आपले ध्येयसाध्य करतात तेव्हा ती जगावेगळी ठरतात. अशाच जगावेगळ्या ठरणाऱ्यांपैकी एक म्हणजे चार्लस ऑगस्ट लिंडबर्ग! त्यांच्याविषयी लिहिताहेत नीला चांदोरकर.

चार्ल्स लिंडबर्ग ज्यांच्या नावावर अनेक विक्रम नोंद झालेले आहेत, त्यापैकी एक आहे विमानप्रवास आणि त्यासाठी केलेले साहस. न्यू यॉर्कपासून पॅरिसपर्यंत सलग केलेला हा प्रवास आहे ३६१४ मैलांचा. तो पूर्ण केला तोही ३३ तास ३० मिनिटे आणि ३० सेकंद या अवधीत, एकट्याने. एक इंजिन असलेल्या विमानाने. त्या विमानाचे नाव होते 'द स्पिरिट ऑफ सेंट लुईस'. त्यावेळी लिंडबर्गचे वय होते अवघे २०-२१ वर्षे. वयाच्या दहाव्या वर्षी विमान कसरती पाहायला गेलेल्या लिंडबर्गने स्वतःचे स्वप्न त्याचवेळी निश्चित केले आणि आपले संपूर्ण लक्ष त्या स्वप्नावर केंद्रित केले. त्याचा हा परिणाम होता. विमान उडवणे हा एकच ध्यास होता असे नव्हे, तर त्याची सर्वांगीण माहिती मिळवणे आणि त्यावर आधारित आपल्याला हवे असणारे बदल करून त्याने विमान तयार करून घेतले होते. विमानाचे वजन, वाहून नेण्याची क्षमता, इंधनाची क्षमता, विमानाचा वेग, या सर्वांगीण विचारातून ही निर्मिती साकारलेली होती. केवळ हाच विचार त्यांनी या विमानापुरता केला होता असे नाही, तर पुढील संपूर्ण विमानसेवेत यांचा त्यांनी पाठपुरावा केलेला आहे. त्यासाठी विमानांच्या अनेक कारखान्यांना भेटी दिल्या. विमान चालवण्याचे रीतसर प्रशिक्षण घेतले. परवाना मिळवला आणि पुढची प्रवासवाट सुरू केली.

पुढे यश मिळाल्यानंतरदेखील या विमानसेवेचा उपयोग कसा करता येईल, त्याचा विस्तार कसा करता येईल, या दृष्टीने विचार केला. त्यातूनच टपाल वाहतूक या व्यवसायाची मुहूर्तमेढ रोवली गेली. पुढे विमान सेवा अधिक सुदृढ करण्यासाठी विमानांची सेवा कशी असावी, विमान उतरवण्यासाठी विमानतळांची व्यवस्था कशी असावी, यासाठी ही त्यांनी जगभर प्रवास करून आपल्या ध्येयाच्या दिशेने प्रवास केला. यामुळेच ते अमेरिकनांच्या गळ्यातील ताईत ठरले. त्याना सैनिकी सेवेतील कर्नल ही पदवी बहाल करण्यात आली. दुसऱ्या आंतरराष्ट्रीय स्तरावर सुरू झालेल्या युद्धजन्य परिस्थितीच्या वेळी त्यांचे हिटलरशी झालेले मैत्रिपूर्ण संबंध हा एक भाग, तर दुसऱ्या बाजूला युद्धामुळे होणारे परिणाम त्यांच्या नजरेसमोर होते. जागतिक इतिहासाचा, संस्कृतीचा आणि उद्योगजन्य परिस्थितीचा त्यांनी केलेला अभ्यास त्यांच्या पाठीशी होता. त्यामुळेच त्यांचे असे स्पष्ट मत होते की युरोपात होत असलेल्या युद्धाच्या परिस्थितीमध्ये अमेरिकेने ढवळाढवळ करू नये अथवा त्यात सहभागी होऊ नये. केवळ याच कारणास्तव त्यांना अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष रुझवेल्ट यांच्या रोषाला सामोरे जावे लागले. अनेक परिणामांना सामोरे जावे लागले. प्रसिद्धीच्या शिखरावर असलेल्या माणसांना पत्रकार डोक्यावर घेऊन नाचतात त्याचवेळी काही अनपेक्षित घडले तर ते पायदळी तुडवतात, याचा अनुभव लिंडबर्गने घेतला. तरीही लिंडबर्गने आपल्या देशाविषयी असणारा अभिमान आणि युद्धजन्य परिस्थितीत करावयाची देशसेवा यात कुठेही खंड पडू दिला नाही. परिणामी तो साहसवीर ते ब्रिगेडियर जनरल या पदापर्यंत पोहोचले.

लिंडबर्गचे वैशिष्ट्य असे की त्यांनी प्रत्येक खंडात जाऊन देशोदेशीचा अनुभव घेतला. तिथल्या परिस्थितीचा अभ्यास केला. त्यातलाच एक भाग म्हणजे त्यांनी भारताला दिलेल्या भेटीचा. कोलकाता येथे पाहिलेल्या गरीब लोकांच्या अवस्थांकडे पाहून त्यांनी हे मान्य केले की जगात अशी परिस्थिती आपण पाहिलेली नाही.

लिंडबर्गने विमानसेवेबाबत आणि विमानातील अद्यायावततेबाबत संशोधन केले, प्रयोग केले आणि त्यात यशस्वी देखील झाले. त्यामुळेच संशोधक, वैमानिक, लेखक या भूमिकांमध्ये त्यांचा यशस्वी प्रवास ठळकपणे दिसून येतो.

त्याच्या आयुष्यात सहचारिणी म्हणून लाभलेली न मॉरो हीदेखील अनुरूप अशीच होती, लेखक, वैमानिक, विचारांनी प्रगल्भ असलेली, स्वतंत्र विचारांची. दोघांचा संसार उत्तम झाला तरी देखील त्यात अनेक चढउतार पाहायला मिळतात. त्यापैकी एक म्हणजे त्यांच्या मुलाचे अपहरण आणि मृत्यू.

नीला चांदोरकर यांनी लिंडबर्ग यांचे हे चरित्र लिहिले आहे. यासाठी उपोद्घात, मुख्य कथानक आणि उपसंहार अशी मांडणी केलेली आहे. प्रत्येक प्रकरणाला समर्पक असे शीर्षक दिलेले आहे. त्यांचा लेखनक्षेत्रातील प्रदीर्घ अनुभव येथे दृगोचर होतो. संवाद, भाषणे, पत्रलेखन, यांचा परिस्थिती व प्रसंग यास अनुसरून अतिशय नेमकेपणाने उपयोग केलेला आहे.


संदर्भांची यादी पुस्तकाच्या शेवटी दिलेली आहे. या पुस्तका विषयीचे मनोगतदेखील अभ्यासपूर्ण आहे. तसेच अंजली जोशी यांनी दिलेली प्रस्तावना आवर्जून वाचावी अशीच आहे. सतीश भावसार यांनी या पुस्तकाचे मुखपृष्ठ आशयाच्या अथांगतेला साजेसे असेच साकारलेले आहे.

**मूल्य ५०० रुपये । सवलतीत ३०० रुपये**

## ग्रंथपान

**शूटआऊट**

**घन:श्याम भडेकर**



### शब्द आणि फोटो यांचा थरार

'मला ज्या मिरवणुकीबद्दल शंका होती त्या ट्रकवर चढून मालकाला विचारले, की वारांगनांची देवी कोणती? तर त्याला वारांगनांचा अर्थच कळेना. त्या बायांना पाहून माझी जीभच जड झाली. काही विचारावे तर तोंडात बसायचे. भलत्याच बायांचा फोटो आला तर नसती आफत यायची. माझी फार पंचाईत झाली. काही सूचना, यातून मार्ग कसा काढायचा. ठोस माहिती देणारा भरोशाचा कोणी भेटेना. मिरवणुका तर चौपाटीच्या दिशेने पुढे सरकत होत्या. थोड्याच वेळा सर्वच देवींचे विसर्जन होईल आणि मी फोटो काढला नाही तर नवलकर माझे विसर्जन करतील.'

वृत्तपत्रात आपण अनेकदा अनेक प्रकारचे फोटो पाहतो. बातमीचे गांभीर्य आणि वैशिष्ट्ये यावर या फोटोंची निवड ठरते. ही निवड अर्थातच त्या वृत्तपत्राचा संपादक करत असेल तरीसुद्धा प्रत्यक्षात असे फोटो मिळवण्यासाठी जे फोटोग्राफर प्रयत्न करतात ते फार महत्त्वाचे ठरतात हे निश्चितच. फोटो काढणे वाटते तितके सोपे नाही. प्रसंगांची वेळ कधीही उद्भवू शकते. रात्र-दिवस, सकाळ-संध्याकाळ असे कुठलेही बंधन बातमीला नसते. स्थळकाळ हासुद्धा फार महत्त्वाचा असतो. फोटोग्राफर म्हणून जी मंडळी काम करतात त्यांना या सगळ्या अग्निदिव्यातून कसे पार पडावे लागते. त्याचे साधे कारण अशा स्वरूपाचे अनुभव येणाऱ्या वृत्तपत्रीय क्षेत्राशी आपला संबंध नसतो. त्यातून लिखित स्वरूपात असे अनुभव आपल्यासमोर तुलनेने अगदीच अल्प स्वरूपात उपलब्ध असल्याने आपण या क्षेत्रापासून दूर अंधारात राहतो. या अंधारावर प्रकाश टाकणारे पुस्तक नुकतेच वाचनात आले. त्याचे लेखक आहेत घन:श्याम भडेकर.

पत्रकारिता या क्षेत्रामध्ये उतरल्यानंतर फोटोग्राफर म्हणून काम करताना आपले कौशल्य, आपला दृष्टिकोन आणि प्रसंगांची नेमकी नस ओळखून त्या अनुषंगाने फोटो काढण्याची कला कशाप्रकारे वृद्धिंगत होत गेली आहे आणि अनुभवाला आली आहे त्याचे सुंदर चित्रण या 'शूटआउट'मधून आपणास पाहावयास आणि अनुभवास मिळते. पुस्तकाचे शीर्षक आणि मुखपृष्ठ पाहून आपला गोंधळ होण्याची शक्यता आहे, परंतु मुखपृष्ठाच्या तळाला दिलेली ओळ पहा, 'जेव्हा मी फोटो काढतो, तेव्हा ती घटना अजरामर होते.' ही घोषवाक्य असावे अशी ओळ आहे.

भडेकरांनी जेजे स्कूल ऑफ आर्टमधून कलाविषयक अभ्यासक्रम पूर्ण केलेला आहे. त्यांनी १९८० ते ८४ या कालावधीत श्री साप्ताहिकात वृत्त-छायाचित्रकार-बातमीदार म्हणून आपल्या कारकीर्दीला सुरुवात केली. तिथून पुढे त्यांनी महाराष्ट्रातून प्रकाशित होणाऱ्या जवळपास सर्वच मराठी वृत्तपत्रांसाठी वार्ताहर-छायाचित्रकार म्हणून काम केलेले आहे. या सर्वच कारकिर्दीच्या काळात काम करत असताना किती विविध प्रकारच्या अनुभवांना ते सामोरे गेलेले आहेत, त्यासाठी त्यांनी केलेली अग्निदिव्ये कशी विलक्षण होती, यांचा थरार म्हणजे 'शूटआउट'!

'शूटआउट'शी संबंधित असणारे अंडरवर्ल्डचे करीम लाला, हाजी मस्तान, राजेंद्र निकाळजे, अनिल परब, अमर नाईक यांच्याशी थेट संवाद करणारे भडेकर प्रमोद नवलकर, नीळकंठ खाडिलकर, मनोहर जोशी, बाळासाहेब ठाकरे, उद्धव ठाकरे यांच्याशीही तितक्याच मनमोकळेपणाने संवाद साधताना दिसतात. याउलट अग्नितांडव, उसळलेली दंगल, पोलिसांनी केलेले फायरिंग, २६/११चा दहशतवादी हल्ला, यांचे फोटो टिपताना प्रत्यक्ष त्या ठिकाणी जाऊन आपल्या जिवाची पर्वा न करता नेमका फोटो मिळवण्यासाठी केलेली धडपड पाहून आपल्या अंगावर काटा येतो. ज्या ठिकाणी पोलिसांना जमावाने लक्ष केलेले आहे अशाही ठिकाणी भडेकरांनी जाऊन फोटो घेतलेले आहेत. इतकेच नव्हे तर प्रत्यक्ष राजीव गांधी, इंदिरा गांधी, एसएम जोशी यांचे आणि विधानभवन येथील फोटो मिळवण्यासाठी त्यांनी केलेल्या त्यांच्या कौशल्याचा वापर, त्यासाठी सहन करावा लागलेला मनस्ताप हे आपल्यासाठी वेगळेच अनुभव आहेत. संगीतकार सी. रामचंद्र यांच्या अंतिम काळातील फोटोवरून भडेकर यांना कोर्टाचासुद्धा मनस्ताप सहन करावा लागलेला आहे. कधी कधी त्यांची फसगतदेखील झालेली आहे. हे सगळे खरे असले तरी त्यांनी घेतलेल्या फोटोंमुळे अनेकांना न्यायदेखील मिळालेला आहे. आज इगतपुरी येथील मनशांती मिळवून देणारे अध्यात्म केंद्र म्हणून ओळखले जाणारे विपश्यना केंद्र हे एकेकाळी शवविच्छेदन व कत्तलखान्याचे ठिकाण होते. हे परिवर्तन केवळ भडेकरांच्या फोटोग्राफीमुळेच शक्य झालेले आहे. सार्वजनिक दवाखाने, पोलीस स्टेशन, चौपाटीवर होणारे गणपतीचे विसर्जन, यांच्यात जे बदल करण्यात आलेले आहेत त्यांचे पूर्व फोटो भडेकरांनी वृत्तपत्रातून प्रकाशित केल्यानंतरच! सुप्रसिद्ध गायिका मुबारक बेगम यांना शासन दरबारी मिळवून दिलेला न्याय, कुंदा जगन कोरडे यांचा हरवलेला दीपक शोधून काढण्यासाठी केलेला यशस्वी प्रयत्न, गंमत म्हणून गोव्याच्या कलंगुट बीचवर काढलेल्या फोटोमुळे ओढवलेली आपत्ती, ठाण्याच्या साहित्य संमेलनाच्या वेळी महापौरांच्या बैलगाडीच्या उधळलेल्या बैलांची गोष्ट, यासारखी अनेक उदाहरणे आहेत. यापैकी ठक्कर कुटुंबातील हत्याकांडाला योग्य न्याय मिळवून देण्यासाठी केलेली पराकाष्ठा हा तर शोधपत्रकारितेचा मोठाच पुरावा आहे. सुप्रसिद्ध शिल्पकार हटकर यांचा गणपती प्रत्यक्ष साकारताना काढलेला फोटो हा त्यांचा एकमेव असा फोटो आहे.

प्रत्येक अनुभवाची माहिती देताना फोटो इतकेच नेमकेपण त्यांनी शब्दांमध्ये देखील दाखवलेले आहे. त्यामुळे घटनेचे मूल्य अगदी चपखलपणे दाखविण्यात ते यशस्वी झालेले आहे. यशस्वी पत्रकार म्हणून त्यांची ही शैली त्यांच्या बिरुदावर शिक्कामोर्तब करते. ही शैली मनमोकळी, प्रसन्न आणि खुसखुशीत आहे. 'शूटआउट' हे भडेकर यांचे या क्षेत्रातील चरित्र म्हणता येईल. त्यांची एकूणच कारकीर्द यशस्वी अशीच आहे. त्यासाठी त्यांना अनेक सन्मान मिळालेले आहेत. त्यांच्या या कौशल्याबाबत आणि यशाबाबत विजय कुवळेकर, ज्येष्ठ पत्रकार व साहित्यिक, मधु कांबळे, ज्येष्ठ पत्रकार - लोकसत्ता, विजय सूर्य, साहाय्यक पोलीस आयुक्त यांनी भरभरून लिहिलेले आहे, जे आवर्जून वाचावे असे आहे. या क्षेत्रात असणाऱ्यासाठी आणि येऊ पाहणाऱ्या उत्साही फोटोग्राफोरांसाठी हे पुस्तक संदर्भ ठरावे. या पुस्तकाला लाभलेल्या सुंदर मुखपृष्ठाची रचना सुनील नाईक यांनी केलेले आहे.

**मूल्य ३०० रुपये । सवलतीत १८० रुपये**

# ग्रंथपान

## व्यासंग आणि विचार

**संकलन**

**धनंजय गांगल, अरुण जोशी**



### व्यासंगाचे वैचारिक तत्त्वज्ञानातिष्ठित विश्व

'भारतातील समाजव्यवस्थेचे व्यवच्छेदक लक्षण जातिव्यवस्था हे होते. ब्रिटिश येण्यापूर्वी (आणि मोगल आल्यानंतरही) जातिव्यवस्थेच्या उतरंडीवरच समाज उभा होता. औद्योगिक व आधुनिक समाजाची उभारणी मात्र जातिव्यवस्थेवर होऊ शकत नाही. जातींमुळे समाजात उभे आणि आडवे छेद जातात आणि तरीही वीण उसवत नाही.'

'व्यासंग आणि विचार' या पुस्तकातील हा एक परिच्छेद. यावरून कुमार केतकर यांच्या व्यासंगाची आणि त्यांच्या वैचारिकतेची कल्पना येऊ शकते. अर्थात कुमार केतकर म्हणजे कुणी नवलेखक योजनेतील अनुदानित लेखक नाहीत. समोर आलेल्या बातम्या एडिट करून छापणारे पत्रकार नाहीत. दिसेल त्या विषयांवर लेखन करून पुस्तकांची संख्या वाढवणारे लेखक नाहीत. भाष्य कर म्हटले की वेळ मारून नेणारे मंचीय वक्ते नाहीत. दिसणारे कुठलेही पुस्तक वाचून त्यावर आपली मते मांडणारे व्यावसायिक परीक्षक नाहीत. निवडून दिलेच आहे तर विमानवाऱ्या करणारे संसदभाऊ नाहीत. ते कोण आहेत हे समजून घ्यायचे असेल तर त्यांनी आतापर्यंत केलेल्या पत्रकारितेचा, त्यांनी लिहिलेल्या लेखांचा आणि पुस्तकांचा, त्यांनी आतापर्यंत गाजवलेल्या संसदीय भाषणांचा, व्यासपीठावर उभा राहिल्यानंतर ते बोलू लागतात त्या वाणीचा, आपण अभ्यास करण्याची आवश्यकता आहे. तेव्हाच कुमार केतकर यांच्या चौफेर व्यासंगाचा, सखोल विचारांचा, चिंतनशील अभ्यासाचा, परखड विवेचनाचा, स्पष्ट आणि संदर्भासह प्रचंड ओघवत्या वक्तेपणाचा, त्यांच्या ठोस भूमिकांचा, आणि तात्त्विक वैचारिकतेचा आपल्याला थोडाफार अंदाज येऊ शकेल. याला अपवाद असू शकतील अशी अनेक सहकारी, मित्र, अभ्यासक, केतकर यांना पूर्ण ओळखून आहोत, असे ठामपणे सांगू शकतील, याबाबत शंका आहे. असे हे हिमनगासारखे भासणारे व्यक्तिमत्त्व. अगदीच लहानशी ट्रेलर वजा व्यासंग आणि विचारांची झलक पाहायची असेल तर 'व्यासंग आणि विचार' हा धनंजय गांगल आणि अरुण जोशी यांनी संकलन व संपादन केलेला लेखसंग्रह जिज्ञासूंनी आवर्जून वाचावा.

अरुण साधू हे त्यांचे पत्रकारितेतील सहबंधू आणि मित्र. अरुण साधू हे आजच्या पिढीतील लेखक म्हणून सर्वमान्य असे नाव. त्यांच्या लेखनाचा, वैचारिकतेचा, अभ्यासाचा, वाचनाचा एकूण धांडोळा घेताना ते जसे श्रेष्ठ होते तसेच ते कुठे कमी पडत होते याही बाजूकडे कुमार केतकर आपले लक्ष वेधतात. त्यांच्या स्वभावातील अनेक पैलू उलगडून दाखवतात आणि त्यांच्या लेखन झपाट्याबाबत ते लिहितात, 'त्यांची पात्रंच त्यांचं भवितव्य ठरवतात आणि आजूबाजूची परिस्थिती ही तीच निर्माण करतात. साधूंच्या डोक्यात फक्त थीम असते. केंद्र कल्पना असते. पुढचं काम पात्रांचं'. (अरुण साधू : आमच्या पिढीचे लेखक)

'माणूस' हे नियतकालिक चालवण्यामागची भूमिका स्वतःचे विचार जगाला सांगण्यासाठी नव्हती तर विचारांच्या अभिनिवेशातून शत्रुत्व निर्माण होण्याऐवजी रचनात्मक संवादाचे वातावरण निर्माण व्हावे म्हणून माजगावकरांनी हे नियतकालिक सुरू केले होते. जे काही करायचे, मग ते प्रत्यक्ष कार्य असो वा विचार, त्याचे उद्दिष्ट सुसंस्कृत, प्रगल्भ समाज व राष्ट्र उभे करणे हेच आहे, ही श्रीगमांची भूमिका होती. माजगावकर यांच्या विषयीची आणि माणूस नियतकालिका विषयीची महती 'मनस्वी माणूस' या लेखात केतकर नेमकेपणाने सांगतात.

इंदिरा गांधी यांच्यावर लिहिलेले 'ज्वालामुखीच्या तोंडावर' हे पुस्तक आपणास माहीत आहे. याच्या पूर्वतयारीसाठी केतकर पी.एन. हक्सर यांना भेटले, तेव्हा त्यांना ते कसे भावलेले याचे वर्णन 'दीपस्तंभ' या लेखात वाचताना प्रत्यक्ष आपण त्यांना भेटतो आहोत असेच वाटत राहते. पु.ल. देशपांडे, सुनीताबाई, नारायण सुर्वे, विजय तेंडुलकर, बर्ट्रान्ड रसेल, मारिया पुझो, महात्मा गांधी, जे कृष्णमूर्ती, डायना, यांच्याविषयीचे लेख वाचताना 'माणूस समजून घेणे म्हणजे काय', याचा सातत्याने प्रत्यय येत राहतो. नुसते व्यक्तिस्तोम नाही, तर त्यांच्या कर्तृत्वाचा आणि त्याच्या कालखंडाचा थोडक्यात घेतलेला धांडोळा खूप मोठ्या आवाक्याचे दर्शन घडवतो. विज्ञान, टेक्नॉलॉजी, माध्यम-माहितीक्रांती, जीवनसंघर्ष, आत्महत्येचे मानसशास्त्र, हिटलरचे क्रौर्य आणि मानसिकता, अशा विविध आणि चौफेर विषयांवर लिहिलेले लेख आपणास या संग्रहात वाचावयास मिळतात. प्रत्येक लेखाचे शीर्षकही आपणास भावल्याशिवाय राहत नाही. एकूण २६ लेखांचा यात समावेश आहे.

कुमार केतकर यांनी लिहिलेले लेखन वाचणे म्हणजे एक बौद्धिक मेजवानीच होय. भाषेवर असलेले प्रभुत्व, तर्कशुद्ध तत्त्वज्ञानातिष्ठित मांडणी, यामुळे नुसता वाचनाचा आनंद मिळत नाही तर एक मोठे विश्व आपल्यासमोर खुले झाले आहे असेच वाटत राहते. लेखात आलेले अनेक पुस्तकांचे संदर्भ ही त्यांच्या व्यासंगाची प्रचीती देतात असे नाही तर ते जिज्ञासू वाचक व अभ्यासकांसाठीसुद्धा संदर्भ ग्रंथांची यादी उपलब्ध करून देतात.

'व्यासंग आणि विचार' हा त्यांच्या पूर्वप्रकाशित 'बदलते विश्व', 'एडिटर्स चॉईस' आणि 'ओसरलेले वादळ' या पुस्तकांमधील निवडक लेखांचा संग्रह आहे. त्याला निमित्त आहे केतकर यांचा अमृतमहोत्सवी वाढदिवस. त्यावेळी कोव्हिडकाळ असल्याने त्याचे प्रकाशन डिजिटल माध्यमातून झाले होते. याशिवाय त्यांची 'त्रिकालवेध, विश्वामित्रांचे जग, शिलंगणाचे सोने, मोनालिसाचे स्मित, कथा स्वातंत्र्याची, ज्वालामुखीच्या तोंडावर' इत्यादी साहित्य प्रकाशित आहे.


या लेखसंग्रहाचे सुंदर मुखपृष्ठ साकार केले आहे सतीश भावसार यांनी.

**मूल्य १५० रुपये । सवलतीत १०० रुपये**

# ग्रंथपान

## चार्ल्स डार्विन

**श्यामला पेंडसे**




**एक प्रांजळ स्वकथन**

'कधी कधी धर्माबद्दलची माझी मते अगदी टोकाला जातात; तरीही देवाला नाकारणारा असा मी नास्तिक नाही. सर्वसाधारण विचार केल्यास आणि जसा मी वयाने वाढतो आहे ते विचारात घेतल्यास, माझी धर्माबद्दलची मन:स्थिती 'देव आहे की नाही' (Agnostic) अशा संभ्रमात असलेल्या माणसासारखी आहे.'

चार्ल्स डार्विन हे नाव आपल्याला एक शास्त्रज्ञ म्हणून परिचयाचे आहे. उत्क्रांतिवादाचा सिद्धांत मांडणारे सुप्रसिद्ध जीवशास्त्रज्ञ, 'उत्क्रांतिवादाचा जनक' असे आपल्या मनावर ठसलेले आहे. यातून आपल्या नजरेसमोरचे चित्र असे स्पष्ट होते, की अहोरात्र जीवशास्त्र, निसर्ग आणि भूगोल याच्याशी समरस असलेले एक व्यक्तिमत्त्व म्हणजे चार्ल्स डार्विन! प्रत्यक्षात त्यांचे आत्मचरित्र वाचल्यानंतर मात्र असे लक्षात येते, की ते केवळ उत्क्रांतिवादाचे जनक होते असे नाही, तर एक व्यक्ती म्हणून, एक कौटुंबिक जबाबदारी पाळणारा पालक म्हणून, मित्रांच्या सोबत वावरणारा मित्र म्हणून, समाजात वावरताना सामाजिक दायित्व सांभाळणारा आणि धर्माविषयी मते स्पष्ट करणारा असा एक बहुआयामी चार्ल्स डार्विन, अशी त्यांची ओळख आपल्याला होते.

मोठ्या माणसांची आत्मचरित्रे वाचत असताना आपण नेहमीच त्यांच्या कार्याविषयी समजून घेण्याबाबत उत्सुक असतो. ते कार्य पार पाडत असताना कोणत्या स्तरातून आणि परिस्थितीतून जातात आणि आपल्या ईप्सितापर्यंत कसे पोहोचतात ही जिज्ञासा आपल्याला टाळता येत नाही. अशी मोठी माणसे फक्त स्वतःभोवतीच वलयांकित असतात की इतरांच्याही विशेषतः कुटुंबातील सदस्यांच्या वाट्याला त्यांचे व्यक्तिमत्त्व किती प्रमाणात आलेले असते, याचीही जिज्ञासा आपल्याला असते. चार्ल्स डार्विन यांच्या बाबतीत हा प्रश्न उपस्थित होत नाही. याचे अगदी साधे कारण असे की, सदरचे लेखन हे त्यांनी इतरांसाठी व प्रसिद्धीसाठी केलेले नाही. आपल्या मनाचा आणि व्यक्तिमत्त्वाचा विकास कसा केला, हे आपल्या पश्चात वाचताना, मुलांना आणि नंतर त्यांच्या मुलांनाही मजा वाटेल. म्हणजे कसा विचार करत, काय काम करत, कसे काम करत, याचे ज्ञान त्यांना व्हावे यासाठी हे लेखन केलेले आहे. गमतीचा भाग असा, की सदरचे लेखन करताना त्यांनी अतिशय त्रयस्थ आणि तटस्थपणे भूमिका घेतलेली आहे. त्यांच्याच शब्दांत सांगायचे तर, 'माझ्या या आत्मचरित्रात्मक आठवणी लिहिताना मी असा विचार केला की, मी आधीच मृत्यू पावलो आहे आणि दुसऱ्या एका जगात राहतो आहे. तिथून मी माझ्या घालवलेल्या आयुष्याचे विहगावलोकन करतो आहे. असा विचार केल्यामुळे मला माझ्या आयुष्याबद्दल लिहिणे फारसे जड गेले नाही.'

चार्ल्स डार्विन यांचे हे सलग आत्मचरित्र नसून आठवणींचा एक कोलाज आहे. मात्र हा कोलाज वाचत असताना कुठेही अहंपणाने थोरवी पुढे आलेली नाही. तर बालपणापासूनचा एकूण आढावा घेत असताना आपली बौद्धिक क्षमता, स्मरणशक्ती, आपल्यात असलेले दोष, अपयश आणि वाया गेलेले दिवस, आलेल्या अडचणी, या सगळ्यांचा प्रांजळपणे व मोकळेपणाने उल्लेख केलेला आहे. या काळात भेटलेले सहकारी, केलेला जगभराचा प्रवास, आपल्या सिद्धांतासाठी केलेले प्रयोग, यात असलेल्या आपल्या मर्यादा, आज सिद्ध केलेला सिद्धांत व मांडलेली मते कालांतराने कालबाह्य झाली तर ती स्वीकारण्याची वृत्ती, आपल्याच विचारावर ठाम राहण्याचा दुराग्रह न ठेवता त्यात निरीक्षणानुसार आढळलेले सिद्धांत मान्य करण्याची व नव्याने त्यांची मांडणी करण्याची तयारी. या सगळ्याच विषयी त्यांच्या मनाचा मोकळेपणा दिसून येतो. स्वतःविषयी ते लिहितात, 'मला असलेली शास्त्रीय विषयांची आवड, संशोधनासाठी लागणारी पराकोटीची सहनशीलता आणि चिकाटी, प्रत्येक विषयासाठी घेतलेली मेहनत आणि चिवटपणे केलेले निरीक्षण, त्यानंतर जमविलेले माहिती आणि यासाठी लागणारी सर्वसाधारण बुद्धिमत्ता आणि नाविन्य शोधण्याचे कल्पकता माझ्याकडे होती. सर्वसाधारण गुण असणारा मी अत्यंत महत्त्वाच्या बाबींसंबंधी संशोधकांना, शास्त्रज्ञांना माझे मुद्दे पटवून देऊ शकलो, हे सर्व विस्मयचकित करणारे आहे.' त्यांचे विविध छंद, घोडेस्वारी, साहित्याचे वाचन करण्याची आवड, याबद्दल माहिती मिळाली.

या आत्मचरित्राची मांडणी तीन विभागांत केलेली आहे. पहिल्या भागात त्यांचे आत्मचरित्र आहे. दुसऱ्या भागात त्यांचा मुलगा सर फ्रान्सिस डार्विन यांनी आपल्या तीर्थरूपांच्या दैनंदिन जीवनाविषयी 'भूतकाळातील रम्य आठवणी' लिहिल्या आहेत आणि तिसऱ्या भागात 'चार्ल्स डार्विन यांचा धर्म/धर्माबद्दलची मते' याविषयी लिहिलेले आहे. आत्मचरित्राचा मूळ आराखडा चार्ल्स डार्विन यांचा आहे हे खरे. तरीदेखील त्यावर सर फ्रान्सिस डार्विन यांनी संस्करण केलेले आहे. असे करताना त्यांनी मूळ आराखडा यात कुठलाही बदल न करता केवळ कौटुंबिक आणि वैयक्तिक अशाच काही घटनांचा उल्लेख टाळलेला आहे. अशा या संस्कारित केलेल्या आत्मचरित्राचा अनुवाद श्यामला पेंडसे यांनी केलेला आहे. वैज्ञानिक संशोधन, प्रयोग आणि सिद्धांत या सगळ्याच बाबी सर्वसामान्यांना समजतील असे नाही याचे भान ठेवून लेखिकेने हा अनुवाद केलेला आहे. या पुस्तकाला सुप्रसिद्ध लेखक अवधूत परळकर यांची अभ्यासपूर्ण प्रस्तावना लाभलेली आहे. या प्रस्तावनेत संपूर्ण पुस्तकाचे नेमकेपणे सांगताना अनुवादिकेविषयी लिहिले आहे, की 'अनुवादकाची अनुवादाची गुणवत्ता ७० टक्के उत्तम दर्जाची आहे; आणि ज्या आस्थेने त्यांनी हे काम हाती घेतलं, ज्या परिश्रमानं त्यांनी ते तडीस नेलं, हे लक्षात घेता या अनुवादप्रकल्पासाठी त्यांना शंभर गुण द्यावे लागतील.'


श्यामला पेंडसे यांचे तीन लघुकथा संग्रह, एक गूढकथा संग्रह आणि तीन अनुवादित पुस्तके प्रकाशित आहेत.

हेमंत जोशी यांनी या पुस्तकाचे आशय संपन्न मुखपृष्ठ साकारलेले आहे.

**मूल्य २५० रुपये । सवलतीत १५० रुपये**

# बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या सॅन होजे येथील अधिवेशनाची क्षणचित्रे


















RNI No. MAHMAR/2013/50137
Published on 10th of Every Month.

Postal Registration No. MCW/310/2022-2024
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001 on 10th & 11th of Every Month.




मुद्रक, प्रकाशक, संपादक : सुदेश राजाराम हिंगलासपूरकर यांनी ग्रंथाली विश्वस्त संस्थेच्या वतीने, 'शब्द रुची' हे मासिक इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाऊस, ४२, जी.डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ४०००३१ येथे छापून ग्रंथाली विश्वस्त संस्थाच्या वतीने, वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली नं. ९, तळमजला, जे. के. सावंत मार्ग, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, माटुंगा (प), मुंबई ४०००१६ येथे प्रकाशित केले.